११६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
ग्रं. नं. ३७५

४१

REFBK-0001637

श्री सयाजी साहित्यमाला.

वा. क्र. १६३८

दा. क्र. १८३४

श्रीसयाजी साहित्यमाला-पुष्प ४१ वें.

( चरित्र-गुच्छ )

# महाराजा शिवाजी.

लेखक

सीताराम वासुदेव पेंडसे, बी. ए. ( मुंबई ).

एम्. सी. पी., एफ्. आर. सी. आय् ( लंडन ).

डिप्लोमेट इन पेडॅगॉजी, लंडन युनिव्हरसिटी; रसतरंगिणी, शिशुसंमेलनोत्सव, संस्कृत वाङ्मयाचा इतिहास इत्यादि ग्रंथांचा कर्ता.

REFBK-0001637

कापडीपोळ, रावपुरा-बडोदें.

बडोदरा. लक्ष्मीविलास प्रेस कं. लि. भाउकालेनी गलीमां प. छोटालाल लालभाईए प्रकाशकने माटे छाप्युं. ता. २१-१०-१९

सन १९१९

संवत १९७६

किंमतः—कापडी बांधणी रु. १।=, साधी बांधणी रु. १

श्री.

# जाहिरात.

आपल्या देशी भाषेच्या साहित्याची अभिवृद्धी करण्याच्या सदुद्देशानें श्रीमंत सरकार महाराजा साहेब सर सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर, जी. सी. एस. आय्., जी. सी. आय्. ई, ह्यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे तिच्या व्याजातून " श्री सयाजी साहित्य-माला" नामक ग्रंथमालेंत विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत आहेत.

हें पुस्तक स्वतंत्र आहे, आणि तें रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बी. ए., यांचेकडून वरील मालेंतील चरित्र–गुच्छांत पुष्प ४१ वें म्हणून तयार करवून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बडोदें. ता. २२-१०-१९.

(Sd) ज. पु. जोशीपुरा. भा. म.

(Sd) A. B. Clarke. विद्याधिकारी बडोदें राज्य.

## श्री. वा. पेंडसे यांनीं केलेले ग्रंथः—

**गद्यग्रंथ.**

| | | | |
|---|---|---|---|
| * | १ | संस्कृत वाङ्मयाचा इतिहास. | किं. रु. २– ८–० |
| † | २ | गद्यसुमन–हार. | ०–१०–० |
| † | ३ | बडोदें राज्याचा इतिहास ( सचित्र ) | ०– ८–० |
| | ४ | हिंदुस्थानाचा इतिहास ( सचित्र ) छापत आहे. | |
| * | ५ | स्वित्झरलंद ,, | |
| * | ६ | इटाली. ,, | |
| † | ७ | बडोदें राज्याचा भूगोल नकाशांसह. | ०– २–६ |
| † | ८ | हिंदुस्थानाचा भूगोल. ,, | ०– ६–० |
| | ९ | पृथ्वीचा भूगोल. ,, छापत आहे. | |

**काव्यग्रंथ.**

| | | | |
|---|---|---|---|
| † | १ | रसतरंगिणी, आवृत्ति दुसरी (मॅक्मिलन आणि कंपनी, मुंबई). | १– ८–० |
| † | २ | काव्यकलिकागुच्छ, आवृत्ति ६ वी. | ०– ५–० |
| | ३ | शिशुसंमेलनोत्सव. ( डे. व्ह. ट्रा. सोसायटीकडून झाला बक्षीस मिळालें आहे ). | ०– ४–० |
| | ४ | श्रीमज्जयसिंह–विवाह. ( श्री. सरकार महाराज गायकवाड यांच्याकडून झाला खास उत्तेजन मिळालें आहे ). | ०–१०–० |
| | ५ | पद्यसुमांजलि | ०– ८–० |

---

* हीं पुस्तकें " श्री सयाजी साहित्यमालें " तील आहेत.

† हीं पुस्तकें बडोदें राज्यांतील शाळांसाठीं, व रसतरंगिणी वऱ्हाडांत-टेक्स्ट बुकें म्हणून मंजूर झालीं आहेत, व सर्व पुस्तकें लायब्ररीच्या व इनामासाठीं मंजूर झालीं आहेत.

# प्रस्तावना.

'श्री सयाजी साहित्यमालें" तील "बालज्ञानमाले" साठीं श्री. छत्रपति शिवाजी महाराजांचें लहानसें चरित्र लिहिण्यासाठीं मे. रा. रा. विद्याधिकारी साहेबांनीं मला आज्ञा केली. त्या आज्ञेला अनुसरून चरित्र लिहिण्यास सुरवात केली. परंतु पुस्तक मोठें झालें, म्हणून तें मुख्य मालेंत प्रसिद्ध करण्याचें ठरलें. ह्याप्रमाणें प्रस्तुत चरित्र लिहिण्याचा व प्रकाशित करण्याचा योग आला आहे,

प्रस्तुत चरित्र मुख्यतः ना. किंकेडकृत "मराठ्यांचा इतिहास" ( History of the Maratha People ), प्रो. जदुनाथ सरकारकृत "शिवाजी व तत्कालीन स्थिती" ( Shivaji and his Times ), प्रो. रॉलिनसनकृत " शिवाजी " ( Shivaji the Maratha ), प्रो. भाटेकृत " सज्जनगड व रामदास, " इत्यादि अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्या व इतर माहितीच्या आधारानें लिहिलें आहे. सामान्य जनांस व विशेषतः विद्यार्थी वर्गास उपयुक्त व्हावें हा ह्या पुस्तकाचा, किंबहुना " श्री सयाजी साहित्यमाले " चा, प्रमुख हेतु असल्यामुळें तदनुसार सरळ वृत्तान्त देण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या नृपाग्रणींच्या कृपाप्रसादानें व अत्यंत उदार आश्रयानें " श्री सयाजी साहित्यमाला " अस्तित्वांत आली, व जींत " संस्कृत वाङ्मयाचा इतिहास " हें प्रथम पुष्प गुंफण्याचा मान मला मिळाला, व हें चरित्र लिहिण्याचा योग आला, त्या श्री. सयाजीराव महाराजांचें दीर्घायु व अभीष्ट चिंतून अंतःकरणपूर्वक आभार मानितों. तसेंच मे. रा. रा. विद्याधिकारी साहेबांनीं प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची संधी मला दिली त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें.

बडोदें, आश्विन व. १३ सं. १९७५
ता. २१ आक्टोबर १९१९

सी. घा. पेंडसे.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | शिवाजीच्या वेळची परिस्थिति ... ... ... | १ |
| २ | शिवाजीचा वंश, जन्म व बाळपण ... ... ... | १० |
| ३ | शिवाजीचें शिक्षण ... ... ... ... | १६ |
| ४ | स्वराज्यस्थापनेचा प्रारंभ ... ... ... ... | २३ |
| ५ | शत्रूंचा पाडाव व स्वराज्यविस्तार ... ... ... | ३५ |
| ६ | पितृघातक्यांचा सूड, व पितृभेट ... ... ... | ४९ |
| ७ | मोगलांशीं सामना ... ... ... .. | ५९ |
| ८ | संतसमागम व उपदेशाची प्रेरणा ... ... ... | ८२ |
| ९ | राज्याभिषेक ... ... ... ... ... | ९५ |
| १० | कर्नाटकावर स्वारी ... ... ... ... | १०३ |
| ११ | मोगलांशीं पुन्हा सामना; शेवटचें आरमारी युद्ध ... ... | ११७ |
| १२ | देहावसान; चारित्र्य; शील; राज्यव्यवस्था ... ... | १२४ |

श्री

# महाराजा शिवाजी

(इ. स. १६२७-१६८०)

## भाग १ ला.

### शिवाजीच्या वेळची परिस्थिति.

आपली मूळ जन्मभूमि जो महाराष्ट्र देश त्याला ज्यानें महान् परिश्रम करून व अनेक अडचणी सोसून नांवारूपास आणिलें, आणि ज्यानें मराठापद्पादशाही स्थापून हिंदुस्थानाच्या इतिहासांत आपल्या जन्मभूमीला एक महत्वाचें स्थान प्राप्त करून दिलें, तो शिवाजी नामक महापुरुष केव्हां होऊन गेला, त्या वेळची परिस्थिति कशी होती व तींतून त्यानें आपल्या मातृभूमीचा उद्धार कसा केला, त्यानें कोणकोणतीं कामें केलीं इत्यादि गोष्टींचा म्हणजे त्या महापुरुषाच्या चरित्राचा विचार करण्यापूर्वी त्या वेळची म्हणजे शिवाजीच्या जन्म समयीं आपल्या महाराष्ट्राची परिस्थिति कशी होती तें आपण पहिल्या प्रथम पाहूं.

ग्रंथ संग्रहालय ठाणे १६३८

इसवी सनाच्या बाराव्या शतकापूर्वी आंध्र, पल्लव, चालुक्य, पांड्य, चोल, चेरा इत्यादि महान् हिंदु राज्यांची दक्षिणेंत सत्ता होती. पुढें त्यांच्या आपसांतील यादवीमुळें व मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें त्यांचा ऱ्हास होत गेला. कालांतरानें दिल्लीच्या मुसलमान राजांनीं हळुहळू आपली सत्ता दक्षिणेंत वाढविली व वर्चस्व स्थापन केलें. महमद तघलकानें तर वारंगळ जिंकून थेट दक्षिण कोंकण व द्वारसमुद्र किंवा म्हैसूर पर्यंत आपली सत्ता बसविली होती. परंतु महमद तघलकाच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्यानें कैदेंत ठेवलेला वारंगळचा राजा कृष्णदेव पळून गेला व त्यानें विजयानगरच्या राजाच्या मदतीनें बंड उभारून वारंगळ काबीज केलें व पुन्हां आपलें राज्य स्थापिलें. पुढें दक्षिणेंतील सर्व मुसलमान व हिंदु सरदारांनीं महमदाविरुद्ध बंड करून दक्षिणेंत आपली सत्ता बसविली.

ह्याच सुमारास म्हणजे चौदाव्या शतकाच्या मध्यकालांत जाफरखान किंवा हसन ह्या नांवाचा एक गुलाम आपल्या पराक्रमानें व कर्तबगारीनें नांवारूपास आला होता. दक्षिणेंतील सरदारांनीं महमद तघलघाविरुद्ध जें बंड केलें होतें त्यांत त्यानें मोठा पराक्रम गाजविला व दक्षिणेंतील मुसलमानी राज्यसत्ता हस्तगत करून घेतली, आणि स्वतः अल्लाउद्दिन हसन गंगु बाहमणी ही पदवी धारण करून आपल्या राज्यास बाहमणी हें नांव देऊन गादीवर बसला. ह्या राज्याला त्यानें हें नांव देण्याचें कारण असें कीं, पूर्वी तो एका गंगाधर अथवा गंगू नांवाच्या ब्राह्मण ज्योतिषाजवळ नोकर होता. त्या ब्राम्हणानें पुढें तूं राजा होशील असें भाविष्य केलें होतें, आणि

तें खरें ठरलें तर आपण गंगु ब्राम्हणी हें नांव धारण करूं व राज्यालाही तेंच नांव देऊं असें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें घडलें म्हणून आपल्या राज्याला ब्राम्हणी अथवा बाहमणी हें नांव हसननें दिलें.

हें ब्राम्हणी अथवा बाहमणी राज्य अल्लाउद्दिन हसनानें इ. स. १३४७ त स्थापिलें व त्याचा पुढें त्यानें पुष्कळ विस्तार केला. हें राज्य सुमारें १७० वर्षेपर्यंत चाललें. पण पुढें पुष्कळ बंडाळी माजून त्याचा शेवट झाला व त्यांतून खालील पांच स्वतंत्र राज्यांचा उदय झाला:—

( १ ) युसफ आदिलशाह नामक सरदारानें विजापुरास इ. स. १४८९ त अदिलशाही राज्य स्थापिलें, तें सुमारें २०० वर्षे पर्यंत स्वतंत्र चाललें होतें. शेवटीं इ. स. १६८६ त औरंगजेबानें तें जिंकून मोगल साम्राज्यास जोडून दिलें.

( २ ) अहमदनगरास मलिक अहमदानें निजामशाहीची इ. स. १४८७ त स्थापना केली. पुढें महान पराक्रमी अकबर बादशहानें त्यावर स्वारी केली त्या वेळीं चांदबिबी नामक वीरस्त्रीनें मोगल सैन्याला स्वपराक्रमानें घुडकावून लावून राज्याचा बचाव केला. ह्याच राज्यांत पुढें मलिक अंबर नांवाचा प्रसिद्ध योद्धा व मुत्सद्दि होऊन गेला. त्यानें जहांगिर बादशाहाच्या सैन्याचा पराभव अनेक वेळां करून राज्य राखिलें. शेवटीं इ. स. १६३६ त शहाजहानानें अहमदनगर जिंकिलें व आपल्या राज्यास जोडिलें.

( ३ ) दक्षिणेच्या पूर्व भागांत गोवळकोंडा येथें कुत्ब-उल्-मुल्क नामक सरदारानें कुतुबशाहीची संस्थापना इ. स. १५१२ त

सारांश शिवाजीच्या जन्मसमयीं दक्षिणेंत कशा प्रकारची परिस्थिति होती तें वरील संक्षिप्त विवेचनावरून दिसून येईल. बहुतेक सर्व दक्षिणेवर ब्राह्मणी राज्यापासून उद्भवलेल्या विजापुर, अहमदनगर वगैरे मुसलमानी राजांची व मोगल राजांची सत्ता होती. नांव घेण्यासारखें एकही हिंदुराज्य नव्हतें. जे थोडे बहुत हिंदु आणि मराठे सरदार होते ते आपआपल्या जहागिरी संभाळून मुसलमानांच्या दरबारीं नोकर किंवा त्यांचे जहागिरदार म्हणून राहात होते.

वर जीं बाहमणी राज्यांतून उदय पावलेलीं पांच राज्यें सांगितलीं, त्यांपैकीं गोळकोंड्याचें राज्य जुन्या वारंगळ म्हणजे तेलंगण प्रांतांत, व विजापुरचें कानडी मुलखांत होतें. वऱ्हाड व बेदर प्रांतील कांहीं भाग महाराष्ट्रीय वस्तीचा व बाकीचा हिंदी भाषा बोलणारांचा होता. परंतु अहमदनगरचा सर्व भाग केवळ महाराष्ट्रीय वस्तीचा होता. ह्याच अहमदनगरच्या राज्यांत मराठ्यांनीं राज्यक्रांति घडवून आणिली. ह्याच राज्याच्या हद्दींतील जुन्नर भागांतील एका किल्यांत मराठासाम्राज्यसंस्थापक शिवाजीचा जन्म झाला होता व त्यांतील पुणें गांवीं शिवाजीचें बाळपण गेलें होतें. शिवाजीचा आजा मालोजी व बाप शाहाजी हे दोघेही अहमदनगरच्या दरबारीं सरदार होते व त्या राज्याची इभ्रत आणि वर्चस्व तसेंच स्वातंत्र्य कायम राखून त्याचा विस्तार करण्यांत शाहाजीनें फार महत्वाची मदत केली होती. आणि शेवटीं ह्याच अहमदनगरच्या जहागिरदारीचें जूं झुगारून देऊन शिवाजीनें स्वतंत्र राज्यस्थापनेचा प्रारंभ केला होता.

येथवर शिवाजीच्या जन्मकालापूर्वीची राजकीय परिस्थिति कशी होती तिचें विवेचन केलें. आतां त्या वेळची धार्मिक व सामाजिक परिस्थिति कशी होती तिचें थोडक्यांत निरीक्षण करूं.

दक्षिणेंत जरी प्रथम मुसलमान व नंतर मोगल साम्राज्याची सत्ता बसून वाढली, तरीसुद्धां हिंदुत्वाची ज्योत जळतच होती. मुसलमानांनीं हिंदुसाम्राज्याचा नाश करून त्याबरोबरच हिंदुधर्माचा नाश करण्याचाही प्रयत्न केला. पहिल्यांत म्हणजे हिंदुसाम्राज्याचा नाश करण्यांत त्यांना पुष्कळसें यश मिळालें, परंतु दुसऱ्या म्हणजे हिंदु धर्माचा नाश करण्याच्या प्रयत्नांत त्यांना यश तर मिळालें नाहींच, परंतु उलट त्या प्रयत्नामुळें धर्मजागृतीला विशेष जोर येऊन तिच्यामुळें मुसलमानी साम्राज्यच उलट नाश पावलें. तें कसें तें आपण पाहूं.

इ. स.च्या तेराव्या शतकांत दक्षिणेंत ज्ञानदेव—ज्यानें ज्ञानेश्वरी नांवाचा प्रख्यात तत्वज्ञानविषयक ग्रंथ लिहिला—नामक महान् साधुपुरुष होऊन गेला. मुसलमानांच्या सुळसुळाटामुळें व अज्ञानामुळें जो धर्मदृष्टीनें भेदभाव उत्पन्न झाला होता, व त्यामुळें जी हिंदुधर्माची अवनति होत होती, ती अटकविण्यासाठीं त्यानें धर्मजागृति उत्पन्न केली. ईश्वरापाशीं कोणत्याही प्रकारचा भेद नाहीं, अमुक उच्च व अमुक नीच ही भावना असत्य आहे, सर्वांनीं समानभावानें एकमेकाशीं वर्तन ठेविलें पाहिजे, आपला धर्मच खरा आहे, इत्यादि तत्वांचें प्रत्यक्ष वर्तन व बोध करून समर्थन केलें. त्याचा समजावर फार उत्तम परिणाम होऊं लागला. त्यानें प्रसिद्ध वारकरीपंथ नांवाचा

भक्तिपंथ स्थापिला. ह्या पंथाचा अनेक लोकांनीं स्वीकार केल्यामुळें तो इतका लोकप्रिय झाला कीं त्याचें कित्येक मुसलमानांनींही अवलंबन केलें. अशा प्रकारची धर्मजागृति होऊन तिला नवीन जोम आल्यामुळें ज्ञानदेवानें प्रतिपादलेल्या उच्च धर्मतत्त्वांचा समाजावर दृढ परिणाम होत गेला, आणि चौदा पंधरा व सोळा ह्या शतकांत त्यांचा सारखा प्रसार होत गेला.

ज्ञानदेवानंतर नुसत्या उच्च जातींतच नव्हे परंतु माळी, महार इत्यादि हलक्या जातींत, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष मुसलमानांत देखील ह्या भक्ति पंथाचे महान् साधु पुरुष उदयास आले. त्यांनीं आपल्या कवनांनीं आणि वक्तृत्वानें समाजाला उपदेश करून धर्मजागृतीबरोबरच ऐक्याची दृढ भावना समाजांत उत्पन्न केली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या ऐक्य भावनेंतून एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. ह्या धर्मजागृतीबरोबरच महाराष्ट्रांत विद्येचा प्रसार होत गेला, मराठी काव्याचा उदय होऊन नामदेव, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास वगैरे महान् कवि व साधु पुरुष एकामागून एक निर्माण झाले, आणि त्यांनीं आपल्या काव्यकृतीनें धर्मप्रसार व पर्यायानें विद्याप्रसार केला.

दक्षिणेंतील मुसलमान राजे आपल्या मध्य आशियांतील जन्मभूमीपासून फार दूर व सुटे पडल्यामुळें आणि मोंगल साम्राज्यापासून ते निराळे होऊन स्वतंत्र झाल्यामुळें, त्यांना आणि त्यांतल्या-त्यांत अहमदनगरच्या राजांना आपल्या राज्यकारभारांत महाराष्ट्रीयांची मदत घेतल्याशिवाय चालेनासें झालें. त्यांना आपल्या दरबारीं

नुसते मराठे सरदारच नव्हे, परंतु असंख्य महाराष्ट्रीय कारकून, चिटणीस, व मराठे शिपाई दाखल केल्याशिवाय भागेनासें झाल्यामुळें महाराष्ट्रीयांचा तेथें चांगलाच प्रभाव भासूं लागला. एकीकडे जसजशी ही स्थिति दृढ होत गेली, व तीमुळें आणि मुसलमानी राजांच्या ऐशआरामी व रंगेलपणामुळें त्यांचें लक्ष राज्यकारभारांत कमी होत गेलें, तसतसे दुसरीकडे महाराष्ट्रीय साधुसंतांनीं केलेल्या धर्मजागृतीमुळें हिंदु लोक स्वधर्माभिमानी व शूर होत गेले आणि त्यांच्यामध्यें ऐक्यभाव कर्तबगारी इत्यादि गुण वाढत जाऊन ते अधिक कर्तृत्ववान होत गेले.

अशा परिस्थितींत मोगल बादशाहांनीं आणि विशेषतः औरंगजेबानें दक्षिणच्या मुसलमानी राज्यांचा नाश करण्याचा व आपलें वर्चस्व स्थापण्याचा जोराचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं दक्षिणेंतील मुसलमानी सत्ता मात्र फारच कमजोर झाली, परंतु मोगल सत्ता बसविण्याचे प्रयत्न व्हावे तसे सफळ झाले नाहीं. ह्यामुळें अगोदरच मुसलमानी जुलमाला कंटाळून गेलेल्या आणि स्वतंत्र होण्यासाठीं आतुर झालेल्या मराठे लोकांना ज्यास्तच फूस मिळाली. दक्षिणेंतील मराठे वीरांना ही एक उत्तम संधी उपलब्ध झाली. आपल्या धर्माचा अभिमान, ऐक्य, शौर्य, आणि स्वाभिमान इत्यादि गुणांचा महाराष्ट्रांत प्रादुर्भाव झाल्यामुळें स्वराज्य स्थापण्यास अत्यंत अनुकूल परिस्थिति उत्पन्न झाली. अशा परिस्थितींत एका उत्तम कार्यक्षम, बुद्धिवान आणि शूर मार्गदर्शक नायकाची उणीव होती. ती शिवाजी सारख्या पराक्रमी, कार्यधुरंधर, बुद्धिशाली वीरानें दूर केली, आणि त्यामुळें मराठी साम्राज्य अस्तित्वांत आलें.

# भाग २ रा.

## शिवाजीचा वंश, जन्म व बाळपण.

मागें सांगितलेंच आहे कीं शिवाजीचा बाप शाहाजी व आजा मालोजी भोंसले हे अहमदनगरच्या दरबारीं सरदार होते. भोंसले हे उदेपुरचा राणा लक्ष्मणसिंग ह्याचा नातू सज्जनसिंग ह्याचे वंशज होते. ह्या कुळाचा मूळ पुरुष देवराजजी ह्याचें उदेपुरच्या राण्याशीं पटेनासें झाल्यामुळें दक्षिणेंत गेला, आणि तेथें त्यानें आणि त्याच्या वंशजांनीं भोंसलें हें आडनांव आपल्या उदेपुरच्या भोसावत नांवाच्या जहागिरीवरून धारण केलें. ह्या कुळांतील देवराजजीचा वंशज बाबाजी ह्यानें दौलताबादेजवळील वेरूळ गांवची पाटिलकी विकत घेतली व तेथें तो राहिला. त्याला मालोजी व विठोजी असे दोन मुलगे होते. त्यांतील मोठा जो मालोजी तो इ. स. १५५० त जन्मला होता.

अहमदगरच्या निजामशाही दरबारीं लखोजी जाधवराव नांवाचा एक दहाहजार घोडेस्वारांचा मनसबदार सरदार होता त्याच्या पदरीं मालोजी भोंसले नोकरीस राहिला होता. लखोजीच्या कुटुंबांतील मनुष्यांशीं मालोजीचा गाढ परिचय व घरोबा झाला होता. इ. स. १५९९ सालीं रंगपंचमीच्या दिवशीं लखोजीच्या कुटुंबांतील मंडळी व नोकर सण साजरा करण्यासाठीं एकत्र जमलीं होतीं, त्या वेळीं लखोजीची लहान मुलगी जिजाबाई व मालोजीचा पांच वर्षांचा

मुलगा शाहाजी एकमेकांशीं रंग खेळत असतांना लखोजीनें पाहिली. लखोजीनें मोठ्या प्रेमानें "हें जोडपें किती सुंदर व योग्य दिसतें" असें ह्मणून दोघांना मांडीवर बसविलें व त्यानें आपल्या मुलीला विनोदानें विचारलें कीं "तूं ह्या मुलाशीं लग्न लावशील?" ह्यावरून शाहाजीचा लखोजीच्या मुलीशीं विवाह करण्याचें नक्कीं झालें असें मालोजीनें जाहीर केलें. परंतु आपल्यापेक्षां मालोजी हलका आहे असें मानून, थट्टेनें जें ह्मटलें तें खरें ह्मणून मानणें गैरशिस्त आहे असें सांगून, लखोजीनें मालोजीचें ह्मणणें नाकबूल केलें. ह्यामुळें रागावून मालोजी लखोजीची नोकरी सोडून चालता झाला.

आपली मानखंडना झाल्याबद्दल मालोजीला फार वाईट वाटलें व त्यानें लखोजीच्या बरोबरीचा होण्याचा व त्याच्या मुलीशींच शाहाजीचें लग्न लावण्याचा निश्चय केला, व त्या मार्गाला तो लागला. कर्मधर्मसंयोगानें लूटबीट करून म्हणा, किंवा दंतकथेप्रमाणें श्री भवानी देवीच्या कृपाप्रसादानें म्हणा, मालोजीला मोठा द्रव्यलाभ झाला, आणि लखोजी इतका श्रीमंत होऊन इ. स. १६०४ त तो परत आला. आपल्या सारखा मालोजीचा दर्जा झालेला पाहून लखोजी जाधवरावानें मालोजीच्या मागणीप्रमाणें जिजाबाईचें शाहाजीबरोबर इ. स. १६०४ त लग्न केलें. मालोजीचें शौर्य, कर्तबगारी वगैरे गुण पाहून त्याला पांच हजार स्वारांची मनसब आणि पुणें व सुपें ह्या परगण्यांची जहागीर व चाकण आणि शिवनेरी हे किल्ले निजामशाहानें दिले. मालोजी इ. स. १६१९ त निवर्तला.

मालोजीच्या मरणसमयीं शाहाजी चांगला मोठा झाला होता. तो आपल्या बापासारखाच शूर होता. त्याला आपल्या बापाची जहांगीर मिळाली. मोगल बादशाहानें अहमदनगरावर स्वारी केली त्या वेळीं लखोजी वगैरे बहुतेक मोठमोठे सरदार मोगलांना जाऊन मिळाले. परंतु शाहाजीनें मोठा पराक्रम करून एकनिष्ठेनें मालिक अंबरास मदत केली. पुढें शाहाजीनें खानजहान लोदीचा पक्ष घेऊन मोगलांशीं लढाई केली. परंतु खानजहानाचा पराभव होऊन त्याचा नाश झाल्यामुळें इ. स. १६३० त शाहाजीला मोगल बादशाह शाहाजहानाला शरण जाणें भाग पडलें. बादशाहानें त्याचा पराक्रम पाहून खूष होऊन पुणें व सुपें परगण्यांची त्याची जहागीर चालू ठेविली एवढेंच नव्हे, परंतु त्याला अहमदनगरचा वजीर फत्तेखान ह्याच्या खासगी मिळकतीपैकींही कांहीं मुलूख दिला. परंतु पुढें फत्तेखान शाहाजहानाला शरण गेला, तेव्हां शाहाजहानानें शाहाजीला दिलेला त्याचा भाग शाहाजीकडून परत घेऊन फत्तेखानाला दिला. बादशाहाच्या ह्या वर्तनानें शाहाजीला राग येऊन त्यानें मोगल बादशाहाची नोकरी सोडिली, आणि विजापुरचा त्या वेळचा पेशवा मुरार जगदेव ह्याच्या मदतीनें विजापुरच्या दरबारीं (इ. स. १६३७) नोकरी स्वीकारून शाहाजी राहिला.

ह्यापूर्वीं शाहाजीनें स्वतःच्या हिंमतीवर अहमदनगरचें राज्य राखण्याचा अनेक वेळां बहादुरीनें लढून प्रयत्न केला होता. त्यांत त्याला म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. शेवटीं इ. स. १६३६ त महमद अदिलशाहानें मोगलांशीं तह केला त्यांत शाहजीला आपल्या

दरबारांतून काढून टाकून पकडून देण्याचा करार केला. त्या दगलबाजीमुळें शाहाजीला अदिलशाहाशीं विरोध करणें भाग पडलें व त्यामुळें त्याला मोगल व विजापुरकर हे दोघे शत्रु झाले होते. तथापि जराही न डगमगतां त्यानें मोठ्या मर्दुमकीनें दोन्ही सैन्याच्या हल्ल्याना धूडकावून लावून त्यांस त्रास देण्याचा सपाटा चालविला होता. शेवटीं कल्याण जवळ माहुली गांवीं खान झामन व रणदुल्लाखान ह्यांच्या पुढें इ. स. १६३६ त त्यानें हार खालली व त्याला तह करणें भाग पडलें. त्यानें अहमदनगरच्या बाळ राजाला मोगलांस सोंपून देण्याच्या अटीवर त्याला पुणें व सुपे हे परगणे, व विजापुरच्या दरबारीं नोकरी स्वीकारण्याची परवानगी मिळाली. ह्यामुळें इ. स. १६३१ त अहमदनगरचें राज्य मोगलांनीं खालसा केलें. वऱ्हाड व बेदर हीं पूर्वींच खालसा झालीं होतीं. त्यामुळें दक्षिणेंत फक्त विजापुर व गोवळकोंडा हींच कायतीं बाहमणी राज्याचीं अवशिष्ट संस्थानें शिवाजीच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं राहिलीं होतीं.

शाहाजी अहमदनगरला मदत करण्यांत व मोगलांशीं लढण्यांत गुंतला होता त्या धामधुमीच्या काळांत त्यानें जिजाबाईला जुन्नर जवळच्या शिवनेरी किल्यात ठेविली होती. तेथें तिला इ. स. १६२३ त संभाजी नांवाचा मुलगा झाला. पुढें चार वर्षांनीं म्हणजे इ. स. १६२७ च्या एप्रील महिन्याच्या १० व्या तारखेस जिजाबाईनें शिवाजीला जन्म दिला. शिवाजीच्या जन्मासंबंधीं पुष्कळ दंतकथा आहेत. त्याच्या जन्मापूर्वीं त्याच्या भावी मोठेपणाविषयीं

शाहाजीला पुष्कळ दृष्टांत व शकुन झाले होते, तसेंच शिवाजी हा शिवाचा अवतार होता अशा बद्दलच्या पुष्कळ दंतकथा त्या वेळच्या बखरींतून आढळतात. कसेंही असो, शिवाजीची कारकीर्द एकाद्या महान् अवतारी पुरुषाला योग्य अशीच झाली ह्यांत शंका नाहीं.

जरी शिवनेरीच्या मजबूत किल्यांत शाहाजीनें जिजाबाई व शिवाजीला ठेविलें होतें तरी शिवाजीचें बाळपण अनेक संकटें व भीतींतच गेलें. एकतर शाहाजीचा सासरा लखोजी जाधवराव मोगलांस जाऊन मिळाला होता व शाहाजी मोगलांविरुद्ध लढत होता त्यामुळें मोगल बादशाहाचा शाहाजीवर डोळा होताच. त्यामुळें एकदांतर इ. स. १६३३ त म्हालदारखान नामक मोगल सरदारानें जिजाबाईला पकडून कैद केलें. अशा भयंकर संकटांत सुद्धां न डगमगतां ह्या वीरमातेनें शिवाजीला लपवून ठेविण्याचा प्रयत्न केला. त्यांत तिला यश मिळालें; परंतु तिला मात्र कोंडाणा किल्यांत कैदेंत राहावें लागलें. इ. स. १६३६ पर्यंत शिवाजीचा पत्ता लावण्यासाठीं मोगलांनीं अटोकाट प्रयत्न केले, परंतु जिजाबाईच्या युक्तीमुळें ते सर्व व्यर्थ गेले. पुढें इ. स. १६३६ त शाहाजीनें मोगलांशीं तह केला व जिजाबाई आणि शिवाजी निर्भय झालीं. तथापि शिवाजीचें त्याच्या पित्याकडून प्रत्यक्षपणें लालनपालन व रक्षण होण्यासारखी स्थिति नव्हती. कारण इ. स. १६३० त मोहिते घराण्यांतील तुकाबाई नामक मुलीशीं शाहाजीनें दुसरें लग्न केलें होतें, त्यामुळें नाराज व निरुत्साह झाल्यामुळें जिजाबाईचा शाहाजीशीं फक्त तात्पुरताच वरवर संबंध राहिला होता.

शिवाजी १० वर्षांचा झाला तेव्हां त्या वेळच्या चालीप्रमाणें त्याचें लग्न करण्यासाठीं इ. स. १६३७ त जिजाबाई त्याला घेऊन विजापुरास गेली. तेथें त्याचें विठोजी मोहिते ह्याची मुलगी सईबाई हिच्याशीं लग्न झालें. केवळ दहा वर्षांच्या वयांत देखील ह्या मुलाच्या भावी मोठेपणाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. विजापुरास असतांना त्यानें गोवधाविरुद्ध बरीच धामधूम केली. लहापणापासूनच शिवाजीला मुसलमानांविषयीं तिरस्कार वाटत असल्यामुळें त्यानें भर दरबारांत ठरींव दरबारी पद्धतीप्रमाणें बादशाहाला मुजरा करण्याचें साफ नाकारिलें. शिवाजीला तसेंच जिजाबाईला शाहाजीनें मुसलमानांची नोकरी करणें हें आवडत नव्हतें. असा हा मुलगा एकादे वेळीं असल्या स्वभावानें व वर्तनानें आपणावर संकट आणील असें वाटल्यानें शाहाजीनें इ. स. १६३८ त जिजाबाईला शिवाजीसह परत आपल्या पुणें व सुपें येथील जहागिरीवर पाठवून दिलें, आणि जहागिरीची व्यवस्था करण्यांत तिला साहाय्य व शिवाजीला शिक्षण देण्यासाठीं आपला विश्वासु नोकर दादोजी कोंडदेव ह्या नांवाच्या ब्राह्मणास तिच्याबरोबर पाठविलें.

# भाग ३ रा.

## शिवाजीचें शिक्षण.

त्या वेळचें पुणें हल्लींच्या पुण्याहून फारच निराळ्या प्रकारचें होतें. त्या वेळचें पुणें ह्मणजे मुठेच्या तीरावर असलेल्या थोड्याशा झोंपड्यांचें गांव होतें. मुळा व मुठा ह्यांच्या संगमावर तें वसलेलें असल्यामुळें त्याला एक प्रकारचा पवित्रपणा आल्यामुळें त्याला पुणें (पुण्यपत्तन) हें नांव प्राप्त झालें. शिवाजीच्या वेळीं पुण्याच्या आसमंतांतील प्रदेश डोंगरी व उजाड होता; आणि अहमदनगर व विजापुर ह्यांच्यामध्यें, तसेंच हीं दोन राज्यें व मोगल बादशाह ह्यांच्यामध्यें सतत लढाया होत, असल्यामुळें सर्व मुलूख उध्वस्त झाला होता. नुसती मालमत्ता जाण्याचीच नव्हे परंतु स्वतःच्या जीवाचीही भीति वाटत असल्यामुळें डोंगरी मुलुखांतील रानटी लोकांखेरीज त्या प्रान्तांत फारशी वस्ती नव्हती.

अशा स्थितींत जिजाबाई, शिवाजी व त्यांचा विश्वासु नोकर दादोजी हीं पुण्यास आपल्या जहागिरीची व्यवस्था करण्यासाठीं आपल्या जहागिरींत राहण्यास आलीं. सामान्य प्रतीचीं माणसें तर हताश होऊन हें काम सोडून चालतीं झालीं असतीं. परंतु आपल्या सवतीसह शाहाजीजवळ राहण्यापेक्षां मरण बरें असें मानणारी जिजाबाई सारखी मानी स्त्री, शिवाजी सारखा परवशतेला तुच्छ

मानणारा मुलगा व दादोजी सारखा चतुर, धोरणी व स्वामीनिष्ठ नोकर, ह्यांना असल्या प्रदेशांत राहण्याची जराही काळजी किंवा भीति वाटली नाहीं. दादोजी चांगला अनुभवी असून त्याला जमाबंदी कामाची उत्तम माहिती होती. त्या माहितीचा उपयोग त्यानें ही जहागीर सुधारण्याच्या कामीं केला. त्यानें लागवडी करतां मोफत जमिनी देण्याचें सुरू करून आजूबाजूच्या डोंगरी मुलखांतील शेतकरी आकर्षून पुष्कळ जमिनी लागवडीस आणिल्या. शिकारी लोकांना बक्षिसें देऊन हिंस्र पशूंचा त्रास कमी केला. पण जेव्हां जिकडे तिकडे लागवड होऊन शेती उत्तम स्थितीस आलेली दिसूं लागली तसतसा चोर व लुटारू लोकांचा उपद्रव ज्यास्त वाढूं लागला. त्यांचा पाडाव करून लोकांचें रक्षण करण्यासाठीं दादोजीनें एक लहानसें सैन्य तैयार केलें. अशा रीतीनें आपली जहागीर भरभराटीस आणलेली पाहून शाहाजी खुश झाला व त्यानें विजापुरच्या दरबाराकडून आपणास मिळालेली नवीन जहागीरही दादोजीच्या ताब्यांत दिली. त्यांत त्यानें ठिकठिकाणीं आंबराया लावून उत्पन्न वाढविलें, आणि पुणें व शिरवळ ह्यांच्यामध्यें एक खेडें वसवून त्याला आपला स्वामी शिवाजी ह्याच्या नांवावरून “ शिवापुर ” असें नांव दिलें.

असो; ह्याप्रमाणें एकीकडे शाहाजीच्या जहागिरीची अशी व्यवस्था चालली असतां आपला चरित्रनायक काय करीत होता तें पाहूं. ह्या वेळीं शिवाजी सुमारें ११ वर्षांचा होता. अगदीं लहानपणांतच अनेक संकटें व धरपकडीची धास्ती ह्यांतून कसाबसा तो

निसटून हल्लींच्या ह्या स्थितीला आला होता. शिवाजी जात्याच फार पाणीदार होता. तशांतून असल्या अडचणींमुळें तो ज्यास्तच धीट व साहसी झाला होता. त्याचा बांधा मजबूत, चेहरा लांबट, कपाळ भव्य, डोळे अत्यंत पाणीदार, व हात आजानुबाहु म्हणजे ढोंपरापर्यंत लांब असे होते. मुसलमानी अमलाखालीं अनेक बरेवाईट प्रकार पाहिल्यामुळें लहानपणापासूनच त्याच्या मनामध्यें स्वदेश-प्रीति व स्वधर्माभिमान जागृत होऊन आपल्या लोकांच्या उद्धाराच्या कल्पना उत्पन्न झाल्या होत्या. दादोजी पूर्ण स्वामीनिष्ठ व कर्तव्य-परायण असल्यामुळें त्यानें जहागिरीच्या सुधारणेच्या व्यवस्थे-बरोबरच आपला धनी जो शिवाजी त्याच्या शिक्षणाचीही उत्तम व्य-वस्था केली होती. त्यानें त्याच्या वयाचीं अनेक मुलें जमा करून त्यांच्या सहवासांत शिवाजीला व त्यांनां शिपाईगिरीची उत्तम तालीम देण्याची व इतर शिक्षणाचीही संपूर्ण तजवीज केली होती. शिवा-जीच्या बाळपणच्या सहाध्यायांमध्यें तानाजी मालुसरे, बाजी फसलकर व येसाजी कंक हे होते, ते पुढें त्याचे अत्यंत विश्वासु मित्र, उत्तम वीर, व सेनानायक म्हणून प्रसिद्धीस आले. शिक्षणा बरोबरच आजूबाजूच्या प्रदेशाची—ज्याला मावळ व कोंकण म्हणतात त्याची—प्रत्यक्ष माहिती असणें हें शिपाईगिरीच्या व युद्धकलेच्या ज्ञाना इतकेंच महत्वाचें आहे असें जाणून त्यानें तशी माहिती शिवाजीला देण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळें शिवाजी आपल्या सहाध्यायांसह मावळ व कोंकण प्रांतांत वरच्यावर फिरावयास जाई व त्या योगानें त्यानें त्या भागांतील प्रदेशाचें

फार बारकाईनें निरीक्षण करून चांगली माहिती मिळविली होती.

नुसती जहागिरीची व्यवस्था करून व शिवाजीला युद्धकलेचें शिक्षण देऊन दादोजी स्वस्थ बसला नाहीं. तो स्वतः उत्तम विद्वान् ब्राह्मण असल्यामुळें तो शिवाजीला ज्ञानदेवादि साधुसंतांच्या ग्रंथांवर प्रवचनें करून व रामायण-महाभारतादि पुराणांतील वीररसप्रधान प्रसंगांच्या कथांचें विवेचन करून चांगली माहिती देत असे. ह्यामुळें शिवाजी व त्याचे बाळमित्र ह्यांच्या मनांत उत्पन्न झालेली स्वदेशप्रीतीची व स्वधर्माभिमानाची ज्योत अधिकच प्रज्वलित होत गेली.

परंतु ह्या पेक्षांही अधिक महत्वाच्या गोष्टींनीं शिवाजीच्या मनावर फार खोल परिणाम झाले होते. एकतर पुणें, व त्याच्या आसमंतांतील पंढरपुर, आळंदी वगैरे साधुसंतांचीं वसतिस्थानें, आजूबाजूचे भागांतून जाणाऱ्या यात्रेकरू वारकऱ्यांच्या झुंडी, चौफेर पसरलेला वनश्रीचा गंभीर देखावा, ठिकाठिकाणीं टेंकड्यावरून दिसणारे किल्ले, इत्यादि गोष्टींनीं शिवाजीच्या मनावर अत्यंत स्फूर्तिकारक परिणाम झाला होता. तशांत आपल्या पतीपासून दूर अशा ह्या एकांतवासांत जिजाबाईला काय तो शिवाजीच आशेचा व सुखाचा आधार राहिला होता. तिचें शिवाजीवर फार प्रेम होतें, व ती त्याचे फार लाडही करी. तथापि आपण देवगिरीच्या यादव वंशाचे व उदेपुरच्या राण्याचे वंशज आहों हें कधींही विसरतां कामा नये, ह्याचीही त्याला ती तितकीच जाणीव वरचेवर करून

देऊन त्याला स्फुरण व उत्तेजन देई. शिवाजी उत्तम वीर व्हावा तसाच तो उत्तम धर्मशीलही व्हावा, ह्यासाठीं पुराणांतील वीरश्रीच्या कथांबरोबरच कथेकरी व पुराणिकांच्या साह्यानें, तसेंच स्वतः ही अनेक गोष्टी सांगून तिनें त्याच्या मनांत उत्तम धर्मतत्वें बिंबविलीं होतीं. अशा ह्या वीरमातेच्या काळजीनें व गृहशिक्षेनें, तिच्या स्वतःच्या उपदेशानें आणि तिनें शिवाजीच्या मनांत जी स्वदेशप्रीति व स्वधर्माभिमान जागृत केला त्यांच्या योगानें शिवाजीच्या मनावर चिरस्थायी संस्कार होऊन त्याला आपल्या वयाच्या आठराव्या वर्षींच महत्कार्य करण्यायोग्य अशी कार्यक्षमता प्राप्त झाली.

ह्या अवधींत दादोजीनें मोठ्या चातुर्यानें व कर्तबगारीनें तो सर्व मुलूख आबाद करून भरभराटीस आणल्यामुळें आणि त्यानें कुळारकीची चांगली सोइस्कर व्यवस्था केल्यामुळें त्या सर्व मुलखांतील मावळे लोकांची भक्ति त्यांचा धनी जो शिवाजी त्याच्यावर बसली. शिवाजीनें आजूबाजूच्या सर्व डोंगरी मुलखात फिरून बारकाईनें माहिती करून घेतल्यामुळें, तसेंच त्याच्या धाडशी स्वभावामुळें, व मनमिळाऊपणामुळें तो त्या लोकांना इतका प्रिय झाला कीं ते त्याच्यासाठीं तो सांगेल तें करण्यास तत्पर झाले. घोड्यावर बसण्यांत, निशाण मारण्यांत आणि पट्टा खेळण्यांत शिवाजीनें अत्यंत प्राविण्य संपादन केल्यामुळें त्याचें विशेषच वजन पडूं लागलें. अशा रीतीनें सर्व दृष्टींनीं एका मोठ्या लोकनायकाला योग्य असे गुण शिवाजीमध्यें उत्तम विकास पावल्यामुळें अल्पवयांतच स्वराज्य स्थापनेची बिकट कामगिरी करण्याची स्फूर्ति त्याला झाली, ह्यांत नवल काय ?



श्री छत्रपति महाराजा शिवाजी.

अहमदनगरच्या म्हणजे ज्यांत महाराष्ट्रीयांची मोठी वस्ती होती त्या राज्याचा एके काळचा चालक जो शाहाजी त्याचा पुत्र ह्या दृष्टीनें, तसेंच लखोजी जाधवरावाचा नातू आणि फलटणच्या प्राचीन वंशांतील एक नजीकचा वंशज ह्या दृष्टीनें शिवाजी हा मराठ्यांचा नेता होण्यास स्वाभाविकच लायक होता, हें उघड आहे. आठरा वर्षांचा होऊन वयांत आल्यावर आपल्या भावी कारकीर्दीची दिशा ठरविण्याचा प्रश्न स्वाभाविकपणें शिवाजीच्या मनांत उत्पन्न झाला. त्या वेळच्या सरदारांप्रमाणें जहागिरीची व्यवस्था करून, बादशाहांना खुष ठेऊन वैभवांत राहून मजा मारणें हा एक मार्ग, किंवा तसें न करतां परवशतेचें जोखड झुगारून देरून स्वतंत्र होऊन स्वराज्यस्थापना करणें व आपल्या लोकांचें, आपल्या धर्माचें व आपल्या देशाच्या स्वतंत्रतेचें परकीयांच्या जुलमापासून रक्षण करणें हा दुसरा मार्ग, असे दोन मार्ग शिवाजीला खुले होते. ह्यांतील पहिल्या मार्गाचें अवलंबन करणें शिवाजीला गमलेंच नाहीं. अर्थात् त्यानें दुसऱ्या मार्गाचेंच अवलंबन केलें. ह्यांशिवाय दादोजीनें तिसराच एक मार्ग सुचविला होता. तो असा कीं, शाहाजीच्या हाताखालीं विजापुरच्या दरबारीं नोकरी घ्यावी व तेथें स्वपराक्रमानें मोठ्या पदवीस चढावें. परंतु विजापुरच्या दरबारची स्थिति किती कमंताकत झाली होती, वरच्या भपक्याखालीं कशी कीड लागत चालली होती, दरबारीं किती अंदाधुंदी व अव्यवस्था माजून राहिली होती, तें शिवाजीला पूर्णपणें ठाऊक होतें. केव्हांना केव्हां तरी आपसांतील तंट्यांमुळें विजापुरचा नाश लवकरच होईल असें शिवाजीला वाटत होतें.

आणि त्यानें जो स्वराज्यस्थापनेचा विचार मनांत आणिला होता त्याला विजापुरची ही स्थिति एक प्रकारें अनुकूलच वाटण्यासारखी होती.

सारांश, सर्व परिस्थितीचा पूर्ण विचार करून त्यानें स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. हा निश्चय तो सोळा वर्षांचा असतानांच केला होता असें त्यानें त्या वेळीं तयार केलेल्या एका शिक्क्यावरून समजतें. शिवाजीच्या वेळच्या परिस्थितीचा विचार केला तर हें स्वराज्यस्थापनेचें काम किती बिकट होतें तें सहज समजेल. कारण जवळ जवळ तीन शतकेंपर्यंत बहुतेक सर्व महाराष्ट्र परवशतेंत असल्यामुळें जनतेमध्यें स्वातंत्र्याची कल्पना नष्टप्राय झाली होती. जनतेच्या हाडीं माशीं खिळलेल्या ह्या संवईला नाबूद करून त्यांच्यामध्यें स्वातंत्र्याची कल्पना उत्पन्न करणें जवळ जवळ अशक्यच होतें. तशांत शिवाजीला ह्या कामीं साहाय्य करण्यासारखा बलवान मराठा सरदारही कोणी नव्हता. घोरपडे, मोरे, माने, सावंत वगैरे जे थोडेबहुत प्रबळ सरदार होते त्यांचें ध्येय म्हणजे विजापुरच्या दरबारीं आपलें घोडें पुढें ढकलून आपली भरभराट करून घेणें, किंवा आपल्या शेजाऱ्याचा पाडाव करून त्याची मालमत्ता गिळंकृत करणें, ह्या पलीकडे कांहींच नव्हतें. स्वातंत्र्य किंवा स्वराज्य ह्याची कल्पना तर त्यांच्या गांवीं नव्हती. ह्यामुळें कोणाकडून कसलीही मदत मिळण्याची आशा न ठेवितां केवळ स्वतःच्या हिंमतीवर सैन्य उभारून, त्याच्या अंगीं आपल्या प्रत्यक्ष कृतींनीं स्फुरण चढवून त्याच्याकडून हें स्वराज्यस्थापनेचें

बिकट काम शिवाजीला करून द्यावयाचें होतें. हें करण्यांत त्याला नुसत्या आपल्या जातभाईंशींच नव्हे परंतु आप्तांशींही लढणें प्राप्त होतें, एवढेंच नाहीं पण खुद्द आपल्या पित्याचीही इतराजी करून द्यावी लागणार होती, हें उघड आहे. परंतु ह्या सर्व बाबतींचा त्यानें खोल व दूरवर विचार करून, आपल्या बाळपणच्या मित्रांशीं, दादोजीशीं, व जिजाबाईशीं वरचेवर वाटाघाट व उहापोह करून मग निश्चय केला, आणि तो केल्यावर त्यापासून जराही भ्रष्ट न होता त्यानें तो तडीस नेला.

---

# भाग ४ था.

## स्वराज्यस्थापनेचा प्रारंभ.

मागें सांगितलेंच आहे कीं शिवाजीनें सोळा वर्षांच्या वयांतच म्हणजे इ. स. १६४२ त आपल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला सुरुवात केली होती. त्यानें एक शिक्का तयार केला होता, एवढेंच नव्हे, परंतु त्यानें मावळांतील रोहिडेश्वराच्या देवालयांत आपल्या तर्फेनें पुजारी नेमिला, आणि अशा रीतीनें आजूबाजूच्या डोंगरी मुलखांतील लोकांची प्रीति संपादन करून विजापुरच्या दादाजी देशपांडे नामक कासदाराला वश करून घेतला होता. परंतु त्यानें आपल्या प्रयत्नांची खरी सुरुवात इ. स. १६४६ त तोरणा किल्या-वर छापा घालून केली. पहिलाच बार उडविण्यासाठीं तोरणा पसंत

करण्यांत त्यानें मोठी दूरदृष्टि व चातुर्य वापरिलें, यांत शंका नाहीं. कारण तोरणा किल्ला त्याच्या जहागिरीच्या दक्षिण सरहद्दीवर असल्यामुळें जर शत्रूकडून उलट छापा आला तर तेथून येणार, हें उघड होतें. शिवाजीनें आपले मित्र तानाजी, येसाजी व बाजी आणि सुमारे एक हजार सशस्त्र मावळे ह्यांच्यासह तोरण्यावर छापा घातला व तोरण्याच्या किल्लेदाराला लांच देऊन वश करून किल्ला काबीज केला, आणि अशा रीतीनें आपल्या भावी यशाचें तोरण तोरणा घेऊन बांधिलें. किल्ला हस्तगत होतांच त्यानें त्याची दुरुस्ती व तटबंदी करून दक्षिणची नाकेबंदी केली. ही तटबंदी करण्यासाठीं खणीत असतां शिवाजीला द्रव्य सांपडलें. त्याचा त्यानें युद्धसामग्री विकत घेऊन जमा करण्याच्या कामीं उपयोग केला. किल्लेदारानें शिवाजीच्या ह्या वर्तनाबद्दलची सर्व हकीकत विजापुरच्या दरबारीं कळविली. परंतु त्यापूर्वींच शिवाजीनें असें कळविलें होतें कीं किल्लेदार परवानगी शिवाय किल्ला सोडून चालता झाला होता, सबब अशा अविश्वासु अमलदाराच्या ताब्यांत किल्ला ठेविण्यापेक्षां आपल्यासारख्या विश्वासु व दक्ष मनुष्याच्या ताब्यांत असलेला बरा. हें विजापुरच्या दरबाराला पटलें व शिवाजीकडून त्या किल्ल्याच्या बाबतींत पूर्वींपेक्षां ज्यास्त उत्पन्न मिळूं लागल्यामुळें विजापुर दरबारानें तो त्याच्या जहागिरींत दाखल करून दिला. ह्या कृत्याच्या धाडशी व युक्तिबाजपणामुळें शिवाजीची कीर्ति सर्व मावळभर पसरून त्याला साहाय्य करण्यासाठीं मोरो पिंगळे, दत्ताजी गोपीनाथ, आण्णाजी दत्तो, निराजी

पंडित, रावजी सोमनाथ, रघुनाथपंत, गंगाजी मंगाजी वगैरे तरुण मंडळी,-जी पुढें चांगली नांवारूपास आली,-शिवाजीला मिळाली. हे सर्व ब्राह्मण असून दादोजीनें नेमिलेल्या कारकुनांचे मुलगे होते. ह्याप्रमाणें शिवाजीच्या प्रयत्नांना अधिक जोर आला. परंतु दादोजी-सारख्या जुन्या स्थितींत राबलेल्या व परवशतेंत वाढलेल्या वयस्क मनुष्याला हें शिवाजीचें कृत्य आवडलें नाहीं. तशांत शिवाजीनें आणखी सैन्य सज्ज करून तोरण्यापासून सहा मैलांवरील मोरबाड नांवाचा किल्ला छापा घालून हस्तगत केला व त्याला राजगड हें नांव दिलें. त्यामुळें तर दादोजीला विशेष राग आला, व त्यानें शिवाजीला पुष्कळ दोष दिला. परंतु शिवाजीनें त्याला न जुमानतां त्यानें राजगड किल्ल्याची झपाट्यानें तटबंदी सुरू केली. शिवाजी ऐकत नाहीं असें पाहून दादोजीनें शाहाजीला सर्व हकीकतीचें पत्र लिहिलें.

ह्या वेळीं विजापुर दरबाराचें सर्व लक्ष दक्षिणेचा जितका मुलूख जिंकतां येईल तितका जिंकून काबीज करण्याकडे लागलें होतें. त्या कामावर शाहाजी व रणदुल्लाखान ह्यांची नेमणुक करण्यांत आली होती. त्यांनीं बेंगरूळ ( बेंगलोर ) चा राजा केंप गौड ह्याचा पाडाव केला. पुढें रणदुल्लाला परत बोलावण्यांत येऊन शाहाजीला प्रमुख सेनापति नेमण्यांत आलें. ह्या कसलेल्या वीरानें कोलार, बाळापुर व सिरा परगणे काबीज केले, ते विजापुर दरबारानें शाहाजीला जहागीर म्हणून बक्षिस दिले. पुढें शाहाजीनें तंजावर, मदुरा व त्रिचनापल्ली येथील राजांवर सरशी करून त्यांना विजापुरचे मांडलिक होण्यास

भाग पाडले. ह्याप्रमाणें दक्षिण काबीज करून तेथील कारभार सुव्यवस्थित करण्यांत शाहाजी गुंतला असल्यामुळें त्यानें दादोजीच्या पत्राकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. परंतु विजापुर दरबाराला मात्र शिवाजीचें वर्तन अयोग्य वाटून त्यांनीं त्याबद्दल शाहाजीकडून जबाब मागितला. शाहाजीनें दरबाराला संतोषकारक जबाब देऊन शिवाजीला राजगडाची तटबंदी न करण्याविषयीं लिहिलें. शाहाजीचें शिवाजीच्या वर्तनाकडे दुर्लक्ष होत आहे, शिवाजी ऐकत नाहीं, आणि त्यामुळें त्या उभयतांचें पुढें कसें होईल ह्याविषयीं भीति, इत्यादि अनेक प्रकारच्या काळजीमुळें दादोजीच्या मनावर परिणाम होऊन तो आजारी पडला व त्याची प्रकृति ढासळत चालली. शिवाजीनें त्याची उत्तम सुश्रूषा केली. तथापि गुण न येतां दादोजी इ. स. १६४७ त मरण पावला. मरण्यापूर्वीं त्यानें आपल्या सर्व ताबेदार लोकांस शिवाजीला आपला धनी मानून त्याची एकनिष्ठेनें सेवा करण्यास सांगितलें आणि जामदारखान्याच्या किल्या शिवाजीला सोंपून दिल्या. तसेंच शिवाजीनें आरंभिलेल्या कार्याबद्दल त्यानें पर्यायानें संमति व्यक्त केली आणि त्याला आशीर्वाद देऊन देह सोडिला. ह्यामुळें सर्वांच्या मनावर फार चिरस्थायी परिणाम झाला. दादोजी वारला त्या वेळीं फक्त चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा, व सुप्याचा किल्लेदार आणि शाहाजीच्या दुसऱ्या बायकोचा भाऊ संभाजी मोहिते हे दोघे त्यावेळीं हाजर नव्हते. दादोजीनें जहागिरीची सर्व व्यवस्था शिवाजीला सोंपल्याचें फिरंगोजीनें मान्य केल्या मुळें शिवाजीनें त्याला त्याच्या जागेवर कायम केलें आणि त्याच्या

ताब्यांत आणखी कांहीं गांवें सोंपिलीं. परंतु संभाजी मोहित्यानें शिवाजी हा जहागिरीचा धनी आहे असा शाहाजीकडून हुकूम आल्याखेरीज शिवाजीचें वर्चस्व मानण्याचें नाकारिलें. शिवाजीनें तीनशें शेलके मावळे घेऊन संभाजीवर एकदम छापा घातला व त्याला त्याच्या अनुयायांसह कैद करून जे आपल्या नोकरींत राहण्यास कबूल होते त्यांस ठेऊन घेऊन बाकीच्यांना संभाजीसह बेंगलोरास शाहाजीकडे रवाना करून दिले. ह्याप्रमाणें शिवाजीनें पुण्याच्या जहागिरीवर आपली संपूर्ण सत्ता बसवून आपले स्वराज्यस्थापनेचे प्रयत्न अधिक जोरानें सुरू केले.

तोरणा व राजगड हस्तगत करून शिवाजीनें आपल्या मुलखाची दक्षिण सरहद्द किल्लेबंदी करून सुरक्षित केली होती. त्यांच्या पलीकडे बारा मैलांवर कोंडाणा नांवाचा किल्ला होता. तो ज्याच्या हातांत असेल त्याला मुठेचें सर्व खोरें व थेट चाकणपर्यंतच्या पुण्याच्या प्रदेशावर निर्भयपणें वावरतां येईल हें शिवाजीच्या लक्षांत येऊन यानें तेथील मुसलमान किल्लेदाराला लांच देऊन कोंडाणा हस्तगत केला व त्याला सिंहगड हें नांव दिलें; आणि त्यांहूनही अधिक महत्वाचा व मजबूत नाकेबंदी करण्याला योग्य असा पुरंदरचा किल्लाही किल्लेदाराच्या गृहकलहाचा फायदा घेऊन किल्लेदाराच्या तिन्ही मुलांना आपल्या नोकरींत ठेऊन हस्तगत करून घेतला. त्याची तटबंदी करण्याचें काम त्या कामीं निष्णात झालेल्या मोरो पिंगळ्यावर सोंपून त्याला त्याचा किल्लेदार नेमिलें.

ह्याप्रमाणें आपल्या मुलखाची सर्व दक्षिण सरहद्द शत्रूंच्या स्वाऱ्या व हल्ले ह्यांपासून सुरक्षित करण्यांत तोरण्यांत मिळालेलें सर्व द्रव्य व आपल्या मुलखाचें उत्पन्न शिवाजीनें खर्च केलें, त्यामुळें द्रव्य-प्राप्तीच्या मार्गाचा तो विचार करूं लागला व कोंकण प्रांताकडे नजर फिरविली. हा प्रांत विजापुरच्या ताब्यांत असून त्यावर कल्याण येथें मुलाणा अहमद हा विजापुर सरकारचा सुभा कारभार चालवीत होता. कल्याणाहून वसुलाची मोठी रक्कम मुलाण्यानें विजापुरास रवाना केल्याची खबर शिवाजीला लागली. शिवाजीनें तीनशें घोडे-स्वारांनिशीं सुप्याहून एकदम कुच करून बोर घाटांत खजिन्याच्या गाड्यांवर व त्याच्या रक्षक सैन्यावर अचानक हल्ला करून सर्व खजिना लुटला. ह्या कृत्यानें शिवाजीनें विजापुर सरकाराशीं उघड उघड वैर केल्यासारखें झालें. परंतु त्याची काळजी न करतां शिवाजीनें लोहगड, राजमाची, रायरी इत्यादि अत्यंत महत्वाचे असे नऊ किल्ले हस्तगत करून घेतले. ह्या कामीं शिवाजी गुंतला असतां दुसरी-कडे त्याचा एक अत्यंत विश्वासु अधिकारी आबाजी सोनदेव ह्यानें खुद्द कल्याणावर हल्ला करून मुलाणा अहमदास कैद केलें. ह्या विज-यानें शिवाजी खुश होऊन कल्याणास गेला. तेथें आबाजीनें मुला-ण्याची अत्यंत सुंदर मुलगी शिवाजीकडे नजर म्हणून पाठविली. तिला पाहून " माझी आई जर हिच्यापेक्षां अर्धी सुंदर असती तर मीही जरा कमी कुरूप झालों असतों " असें म्हणून तिचा आई प्रमाणें सत्कार करून तिला तिच्या बापासह मानपानानें व इतमानानें विजापुरास रवाना केलें. ह्या धर्मशील व पवित्र वृत्तीनें शिवाजीची



कल्याणचा सुभा मुलाणा ह्याची मुलगी शिवाजीला नजर करण्यांत आली तो प्रसंग.

अधिक छाप पडून त्याची कीर्ति वाढली. शिवाजीनें थोड्याच अवधींत सावंतवाडीपर्यंतचा सर्व कोंकणप्रांत काबीज केला. त्यामुळें मुसलमानी जुलमी अमलाला कंटाळलेली हिंदु प्रजा खुश होऊन शिवाजीची लोकप्रियता वाढली. ह्याच वेळीं शिवाजीनें कोंकणांतील एका मनुष्यापासून एक हजार रुपये देऊन प्रख्यात भवानी तरवार विकत घेतली, ती तो नेहमीं आपल्या जवळ ठेवी व तिची पूजा करी. हल्लींहीं ती तरवार सातार्‍याच्या राजाजवळ आहे असें म्हणतात. ह्याच वेळीं त्याच्या भावी सिंहासनाचें स्थान जो रायगड तो शिवाजीनें काबीज केला.

ह्या सर्व गोष्टींची खबर विजापुरच्या दरबारीं कळली त्यावरून विजापुरच्या बादशाहाला फार राग आला आणि त्यानें शिवाजीची निर्भत्सना करून त्याला एकदम विजापुरास येऊन हाजर होण्यास हुकुम केला, व शाहाजीलाहीं शिवाजीला कबजांत ठेवण्यासाठीं फरमान झालें. आपण जिंकिलेला मुलूख जहागीर म्हणून आपणास देण्यास बादशाह तयार असेल तर आपण विजापुरास जाऊन हाजर होऊं, असा शिवाजीनें बादशाहास जबाब लिहिला; आणि मी आतां कांहीं लहान मूल नाहीं, मला माझें बरें वाईट कळतें, आणि मी व माझें नशीब पाहून घेऊं; असें शिवाजीनें शाहाजीस त्याच्या पत्राचें उत्तर लिहिलें. शिवाजीचें ह्मणणें बादशाह महमद अदिलशाहाला मान्य होणें अशक्य होतें. सैन्य पाठवून शिवाजीला पकडून आणावें अशी सल्ला शाहाजीनें दिली, ती योग्य असतांही ती मान्य न करून शाहाजीचीच शिवाजीला

फूस आहे, व त्याच्या सांगण्यावरूनच शिवाजीनें हें सर्व केलें व करितो, असें मानून बादशाहानें शाहाजीला कैद करण्याचा निश्चय केला, व त्याला शाहाजीचा हेवा करणाऱ्या मुसलमान सरदारांचा दुजोरा मिळाला. शाहाजीला पकडून कैद करण्याचें कार्य कशा रीतीनें तडीस न्यावें ह्या चिंतेंत बादशाह होता, व तो प्रयत्न यशस्वी न झाला तर शाहाजी बंड करील ही त्याला धास्ती वाटत होती. त्या वेळीं बाजी घोरपडे नांवाचा एक महत्वाकांक्षी व शाहाजीचा मत्सर करणारा मराठा सरदार विजापुरच्या दरबारीं होता. ह्या कुळांतील एका मनुष्यानें घोरपड नांवाच्या जनावरास त्याच्या कंबरेला दोर बांधून त्याला किल्ल्याच्या भिंतीवर चढून वरती चिटकून राहण्यास शिकवून तयार केलें होतें व ह्या घोरपडीचा किल्ल्याच्या तटांवर चढून किल्ले सर करण्याच्या कामीं उपयोग करण्यांत येऊं लागल्यामुळें ह्या कुळास घोरपडे हें नांव प्राप्त झालें होतें. ह्या बाजी घोरपड्यानें शाहाजीस पकडून आणण्याचें कबूल केलें. त्यानें शाहाजीस मेजवानी देण्याच्या मिषानें बोलावून कपटानें कैद करून बादशाहाच्या स्वाधीन केलें. बादशाहानें शाहाजीला एका भिंतींत एक कोनाडा करून त्यांत ठेऊन कोनाडा बुजवून टाकून शाहाजीला जीवंत पुरून टाकण्याची तजवीज चालविली. कोनाड्याचें दार विटा व चुना ह्यांनीं बांधून टाकून फक्त शाहाजीचें तोंड दिसूं शकेल इतकें बाकी ठेविलें, व आपल्या मुलाला बंड करण्यास आपणच फूस दिली, असें कबूल करून शिवाजीला पकडून बादशाहाच्या ताब्यांत देण्याचें शाहाजीनें कबूल केलें

तरच त्याला जीवदान मिळेल अशी बादशाहानें त्यास धमकी दिली.

आपल्या बापावर आलेल्या ह्या मृत्युसंकटाची खबर शिवाजीला मिळाली तेव्हां त्यास फार धास्ती वाटून दुःख झालें. परंतु बापाची सुटका करण्यासाठीं विजापुर दरबारच्या स्वाधीन व्हावें तर ते आपणास फांसावर चढविल्याशिवाय राहणार नाहींत, आणि तसें न केलें तर आपला बाप विनाकारण जिवास मुकणार, असें विलक्षण कोडें शिवाजीला पडलें. परंतु आपल्या अचाट बुद्धिचातुर्यानें हें कोडें सोडवून आपल्या बापाचें व आपलें रक्षण करण्याची एक विलक्षण युक्ति शिवाजीनें काढिली. त्यानें विजापुरच्या बादशाहाला मोगल बादशाह शाहाजहान ह्याची मदत मिळवून शह दिला. विजापुरच्या राज्याचा नाश करून तें काबीज करण्याची संधी शाहजहान पाहात होता. शिवाजीनें मदत मागितली ती त्याला दिल्यास तें कार्य अधिक सुलभ रीतीनें तडीस जाईल असें वाटून शाहाजहानानें शिवाजीला मदत देण्याचें खुशीनें कबूल केलें, व विजापुरच्या दरबारीं असलेल्या आपल्या वकिलाला शाहाजीची मुक्तता करून घेण्यास शाहाजहानानें फरमाविलें, व शाहाजी आपल्या दरबारचा एक उमराव आहे असें जाहीर करून त्याला बहुमानाचा पोषाख पाठवून दिला. अशा स्थितींत शाहाजीला मारलें तर शिवाजी मोगल बादशाहाचें वर्चस्व कबूल करील, एवढेंच नव्हे, तर आपल्या उमरावाला मारिल्याबद्दल मोगल बादशाहा आपल्यावर सूड उगवील अशी धास्ती विजापुरच्या बादशाहाला उत्पन्न

झाली. शेवटीं विजापुरच्या दरबारीं असलेले शाहाजीचे दोस्त मुरार जगदेव व रणदुल्लाखान ह्यांनीं शाहाजीला सोडून देण्याची बादशाहास सल्ला दिली, आणि शाहाजीची सुटका झाली. अशा रीतीनें विजापुरच्या बादशाहास शरण न जातां, तसेंच स्वतःला कमीपणा किंवा मानहानी होईल असें न करतां मोगल बादशाहाची मदत घेऊन विजापुर दरबाराला बिनतोड शह देऊन शाहाजीची मुक्तता करून घेण्यांत शिवाजीनें जें बुद्धिकौशल्य योजिलें तें खरोखर अलौकिक होय.

आतां शिवाजी व विजापुर दरबार ह्यांच्यामधील परस्पर संबंध साहजिकच फार नाजूक झाला होता हें उघड आहे. शिवाजीनें जर अधिक धामधूम केली तर विजापुरचा महमद अदिलशाह शाहाजीला मारून टाकल्या खेरीज राहणार नाहीं, आणि अदिलशाहानें जर शाहाजीच्या जिवाला नुकसान केलें तर शिवाजी मोगल बादशाहाची मदत घेऊन विजापुरावर चाल केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी उभयतां शिवाजी व महमद अदिलशाह ह्यांस भीति वाटत होती. त्यामुळें कांहीं एक न करतां दोघेही तटस्थ राहिले. तथापि महमद अदिलशाहानें शिवाजीला पकडून कैद करण्यासाठीं गुप्त कारस्थान रचिलें. शिवाजीनें कोंकण प्रांताचा जो भाग काबीज केला होता त्यांत पुण्यापासून पन्नास मैलांवरील महाड हें गांव हें एक महत्वाचें ठाणें होतें, व तेथें तो वरचेवर जात असे, हें विजापुर दरबारास माहीत होतें. तेथें शिवाजी गेला आहे अशी एक संधी पाहून त्याच्यावर एकदम हल्ला करून त्यास कैद

करून आणण्यासाठीं बाजी शामराज नांवाच्या एका मनुष्याला महमद अदिलशाहानें हुकूम केला. विजापुरच्या दरबारीं चंद्रराव मोरे राजे ह्या नांवाचा एक मोठा प्रबळ मराठा सरदार होता. महाडाच्या पूर्वेस जावळी म्हणून एक गांव आहे तेथें त्याचें मुख्य ठाणें होतें. हा चंद्रराव जावळीचा एक स्वतंत्र संस्थानिकच होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याला ह्या कारस्थानांत सामील करून घेऊन, बाजी शामराजाला जावळीच्या प्रदेशांत दबा धरून राहण्यास व त्याला जरूर ती मदत करण्यास चंद्ररावास अदिलशाहानें सांगितलें; त्याप्रमाणें चंद्ररावानें कबूल केलें. शिवाजीला ह्या सर्व कारस्थानाची आपल्या हेराकडून बातमी लागली, आणि त्यानें बाजी शामराजावर एकदम अचानक हल्ला करून त्याला त्याच्या साथीदारांसुद्धां पळवून लाविलें. ह्याप्रमाणें हें कारस्थान फसलें.

चार वर्षैपर्यंत प्रथम सक्त कैदेंत व नंतर नजर कैद्याप्रमाणें राहिल्यावर इ. स. १६५३ त शाहाजीला खरी मुक्तता मिळाली, व त्याला आपल्या दक्षिणेंतील जहागिरीची व्यवस्था करण्यासाठीं बेंगलोरास जाण्याची महमद अदिलशाहानें परवानगी दिली. बेंगलोरास जाऊन शाहाजीनें दक्षिणेंतील बंडाळी मोडिली. ह्या बंडाळींत शाहाजीचा वडील पुत्र जो संभाजी त्याचा मुस्तफाखान नामक कनकगिरीच्या किल्लेदारानें अफझुलखानाच्या चिथावणीनें दगलबाजीनें खून करविला होता. त्याचा शाहाजीनें सूड उगवून कनकगिरी काबीज केला. तथापि आपल्या प्रिय मुलाच्या मारेकऱ्यांना सुद्धां शाहाजीनें मोठ्या उदारपणानें जीवदान

दिलें. मात्र ज्या बाजी घोरपड्यानें दगलबाजीनें आपणास पकडून आपल्या जिवावर भयंकर संकट आणिलें होतें त्याचा सूड घेण्याचा शाहाजीचा निश्चय झाला होता. परंतु महमद अदिलशाहाच्या मध्यस्तीनें बाजी घोरपडे व शाहाजी ह्यांनीं एकमेकांचें स्वतः कोणतें नुकसान करावयाचें नाहीं असें ठरविलें होतें ह्मणून शाहाजीनें स्वतः सूड घेण्याचा विचार रहीत केला. तथापि त्याच्या मनांतील वैराग्नि शमला नव्हता. शाहाजीनें ह्याविषयीं शिवाजीला एक पत्र लिहिलें त्याचा आशय असा होता कीं " तूं जें कार्य आरंभिलें आहेस तें पार पाडण्याची काळजी घे. परमेश्वरकृपेनें तुझ्या शत्रूंच्या बायका सदैव आपल्या दुःखाश्रूंनीं न्हावोत. परमेश्वरकृपेनें तुझे हेतु सफळ होवोत, आणि तुझा उत्कर्ष होवो. माझ्यावर बाजी घोरपड्यानें किती उपकार केले आहेत तें ध्यानीं आणून तूं त्याच्याशीं सौजन्यानें वागल्याखेरीज राहणार नाहींस." ह्या पत्रावरून आपल्या आरंभिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याविषयीं आपल्या पित्याची पूर्ण संमति आहे असें जाणून शिवाजीला फार समाधान वाटलें. तसेंच शेवटच्या वाक्याचा लाक्षणिक अर्थही त्याला सहज समजला, आणि त्यानें संधी मिळतांच बाजी घोरपड्यावर सूड उगविण्याचा निश्चय केला.

# भाग ५ वा.

## शत्रूंचा पाडाव व स्वराज्यविस्तार.

जावळीच्या चंद्ररावाविषयीं मागें हकीकत दिली आहे, तीवरून जावळी प्रांत राजकीय दृष्टीनें किती महत्वाचा होता तें दिसून येईल. चंद्रराव मोरे राजे ह्याच्याशीं मैत्री करण्याचा, व तें तो न मानील तर त्याला आपला अंकित करण्याचा व अशा रीतीनें जावळी काबीज करण्याचा शिवाजीनें निश्चय केला. प्रथम मैत्री करण्याचें शिवाजीनें त्याच्याशीं बोलणें सुरू केलें, परंतु त्याला तें मान्य झालें नाहीं; आणि परवशता ज्याच्या आंगीं खिळली होती अशा चंद्ररावाला मुसलमानांशीं फटकून राहून स्वतंत्र होणें ही गोष्ट मान्य तरी व्हावी कशी ? ह्यासाठीं शिवाजी स्वतः जावळीस गेला होता. त्याला दगलबाजीनें पकडून विजापुरास पाठविण्याचा मोऱ्यानें घाट घातला. परंतु शिवाजी तशाच तयारीनें गेला होता. त्याला ह्या काव्याचा सुगावा लागतांच आपल्यावर घातलेल्या मारेकऱ्यांचा पाडाव करून शिवाजी निसटून गेला. इतकें झालें तरीही शिवाजीनें मोऱ्याशीं लढाई सुरू केली नाहीं; व एकदां शेवटला प्रयत्न करून पाहावा ह्या हेतूनें त्यानें राघो बल्लाळ अत्रे व संभाजी कावजी हे आपले दोन वकील मोऱ्याकडे बोलणें करून त्याच्याशीं दोस्ती करण्यासाठीं पाठविले. तथापि मोऱ्यानें दिवसगत करून शेवटीं नाहीं म्हटलें. तेव्हां शिवाजीनें पुरंदरास जाण्याच्या मिषानें मोठ्या सैन्यासह

कुच केलें, व रात्रीं दिशा फिरवून महाबळेश्वरावर चालून जाऊन छापा घालून त्यांत प्रवेश केला. मध्यंतरीं अत्रे व संभाजी कावजी ह्यांचें बाळाजी मोऱ्याशीं बोलणें चाललें असतां दोघेही हातघाईवर आले आणि त्यांनीं मोरे आणि त्याचा भाऊ ह्या दोघांचा वध केला. ही गोष्ट शिवाजीला समजतांच तो जावळीवर चाल करून गेला. त्याला बाळाजी मोऱ्याचे दुसरे भाऊ मिळाले. शिवाजीनें बाळाजीचा प्रधान हनमंतराव व त्याचे मुलगे ह्यांचा पराभव करून जावळी हस्तगत केलें. बाळाजी मोऱ्याच्या मुलांना व त्याच्या जप्यत असलेल्या सैन्याला आपल्या नोकरींत ठेवून शिवाजीनें ह्या विजयाचा संपूर्ण फायदा घेतला. त्यानें वांसोटा किल्ला काबीज केला. शिवाजीला जावळीस मोऱ्यांनीं जमवून ठेविलेला मोठा खजिना मिळाला. त्या द्रव्यांतून त्यानें महा. बळेश्वराच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला आणि प्रतापगडाची तटबंदी केली. ह्याप्रमाणें शिवाजीनें आपल्याशीं दगलबाजी करणाऱ्या चंद्र-राव मोरे राजे ह्या प्रबळ शत्रूचा संपूर्ण नाश करून जावळीचा सर्व मुलूख हस्तगत केला. शिवाजीनें प्रतापगडावर आपल्या कुलदेवता भवानीचें भव्य मंदिर बांधिलें. भवानीचें मूळ स्थान तुळजापुर होतें. परंतु तें शत्रूच्या मुलखांत होतें दरसाल तेथें जाणें शिवाजीला धोक्याचें वाटलें म्हणून त्यानें ह्या गडावर तिचें मंदिर बांधिलें व त्यानें प्रताप गाजवून हा किल्ला घेतला म्हणून त्याला प्रतापगड हें नांव दिलें.

ह्याप्रमाणें मोरे घराण्याचा पाडाव झाल्यामुळें त्यांच्या ताब्यां-तील गोळेवाडीचा गोळे नांवाचा मराठा सरदार स्वतंत्र होण्याची



भवानी.

(प्रतापगडावरील मंदिरांतील मूर्ति.)



रायगडावरील शिवाजी महाराजांचा राजमहाल.

तयारी करूं लागला. त्याच्यावर हल्ला करून शिवाजीनें गोळेवाडी काबीज केली. ह्या हल्ल्यांत गोळ्याची सून हातीं लागली तिला शिवाजीकडे नजर म्हणून पाठविण्यांत आली. तिला पाहून "ही इतकी सुंदर आहे कीं हिच्यां पोटीं आलों असतों तर बरें झालें असतें" असें म्हणून तिला वस्त्राभरणें देऊन शिवाजीनें मोठ्या इतमामानें तिची तिच्या आप्तांकडे रवानगी केली, अशी एक गोष्ट कित्येक बखरींत आढळते. ही आणि मुलाणा अहमदाच्या मुलीची गोष्ट अगदीं सारखी आहे, त्यामुळें कदाचित् एकाच गोष्टीचीं हीं दोन रूपांतरें असण्याचा संभव आहे. मुलाण्याच्या मुलीची गोष्ट मात्र विशेष प्रचलित आहे, तितकी ही नाहीं.

इ. स. १६५६ त महमद अदिलशाह मरण पावला व विजापुरच्या गादीवर त्याच्या मागून त्याचा एकोणीस वर्षांचा मुलगा अल्ली अदिलशाह गादीवर बसला. ह्या वेळीं शाहजहानाचा मुलगा औरंगजेब दक्षिणचा मोगलांचा सुभा होता. विजापुरचें राज्य काबीज करण्यासाठीं तो वाट पहात होता. अल्ली अदिलशाह हा खरा मुलगा व वारस नाहीं, व दिल्लीच्या मोगल बादशाहाच्या संमतीशिवाय तो गादीवर बसला, हें त्याचें कृत्य गादी बळकावून बसण्यासारखें आहे, असें कारण दाखवून औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली. अल्ली अदिलशाह अगदीं शरण जाण्याच्या बेतांत होता, इतक्यांत शाहाजहान अजारी पडल्याची खबर औरंगजेबाला मिळाली, त्यामुळें तो विजापुरचा वेढा उठवून दिल्लीस चालता झाला, आणि अशा रीतीनें अल्ली अदिलशाहावर आलेलें संकट अनायासें टळलें.

औरंगजेबाबरोबर मोगल सैन्य दिल्लीकडे गेल्यानें व दिल्लीच्या गादीविषयीं भावाभावांत तंटे उपस्थित होऊन त्यांत औरंगजेब वगैरे मोगल शाहाजादे गुंतून गेल्यामुळें, आणि दक्षिणेंतील आणि परराज्यांतील सरदारांमध्यें तंटेबखेडे उपस्थित होऊन विजापुर दरबार कमताकत झाल्यामुळें, शिवाजीला विजापुरच्या मुलखावर हल्ले करण्यास उत्तम संधी मिळाली. शिवाजीनें इ. स. १६५९ त जंजिऱ्यावर स्वारी करण्याची तयारी केली. दक्षिणेंतून इराणच्या अखाताकडे जी मालाची ने आण गलबतें करीत त्यांचें रक्षण करण्यासाठीं मलिक अंबरानें जंजिरा येथें एक किल्ला बांधून व आरमार ठेऊन त्याच्यावर एका हबशी सरदाराची त्यानें नेमणूक केली होती. ह्यामुळें जंजिरा हें एक महत्वाचें आरमारी ठाणें बनलें होतें. अहमदनगरचें राज्य बुडाल्यावर जंजिरा विजापुर दरबाराच्या ताब्यांत गेलें व त्या दरबाराकडून फत्तेखान नामक अफगाण सरदाराची (कोणी ह्मणतात हा शिद्दी होता) नेमणूक झाली होती. हें फार महत्वाचें ठाणें आपल्या ताब्यांत असावें अशा हेतूनें शिवाजीनें एक सैन्य सज्ज करून त्यानें त्या वेळीं नेमलेला आपला पेश्वा शामराज निळकंठ रांजेकर ह्याला जंजिऱ्यावर स्वारी करण्यासाठीं पाठविलें. अशा महत्वाच्या स्वारीचें नायकत्व आपण स्वतः न करतां शामराजाकडे सोंपिलें ही शिवाजीनें मोठी चूक केली, आणि शिवाजीच्या ह्या वेळपर्यंतच्या कारकीर्दींत हीच पहिली चूक होय. शामराज फारसा अनुभवी नसल्यानें तें कार्य तडीस गेलें नाहीं, एवढेंच नव्हे, परंतु फत्तेखानानें त्याचा

पराभव करून त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला. शिवाजीनें शामराजाकडून पेश्वाई काढून घेऊन मोरोपंत पिंगळ्याला दिली व राघोबल्लाळ अत्रेला सेनापति नेमून त्याला फत्तेखानावर पाठविलें. त्यानें फत्तेखानाचा पराभव करून त्याला जंजिऱ्याच्या किल्याकडे पळ काढण्यास लाविलें. शिवाजीनें इ. स. १६५९ चा सर्व पावसाळा नवीन सैन्य सज्ज करून जंजिऱ्यावर पुन्हां स्वारी करण्याच्या तयारींत गाळिला.

परंतु त्याला जंजिऱ्याचा नाद तात्पुरता सोडून देऊन त्याच्या कारकीर्दींतील एका अत्यंत महत्वाच्या व आणिबाणीच्या प्रसंगाकडे लक्ष देणें भाग पडलें. शिवाजीचा पेश्वा शामराज ह्याच्या पराभवाची वार्ता विजापुर दरबाराला कळतांच अली अदिलशाहाला विशेष उत्साह वाटला. त्यानें आपल्या आईच्या सल्ल्यानें शिवाजीचा नाश करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानें आपल्या दरबारच्या सर्व सरदारांस जमा करून शिवाजीवर चाल करून जाऊन त्याचा पाडाव करण्याचें काम करण्यास कोण तयार आहे, असें विचारतां अफझुलखान नामक सरदारानें तें काम करण्याचें कबूल केलें. अफझुलखान हा एक उंच धिप्पाड व बलवान् पुरुष होता. त्याचा बाप हा अली अदिलशाहाचा मामा असून भटारखान्यावर कामदार होता. ह्याच अफझुलखानाच्या चिथावणीनें शिवाजीचा वडील भाऊ संभाजी ह्याचा कनकगिरीच्या किल्लेदारानें वध केला होता. अफझुलखान वाईचा सुभेदार असल्यामुळें त्याला त्या मुलखाची चांगली माहिती होती. ह्यामुळें अली अदिलशाहानें अफझुलखानावर ही कामगिरी सोंपिली,

व त्याच्या हाताखालीं बारा हजार घोडेस्वार, तोफा, दारूगोळा वगैरे सर्व प्रकारची सामग्री देऊन रवाना केलें; आणि शिवाजीला जिवंत पकडून आणण्यास व तसें न जमलें तर निदान मेलेला तरी आणण्यास फर्माविलें. शिवाजीला नुसता जिवंतच काय परंतु त्याला आपल्या घोड्यावर बसवून विजापुरास आणीन अशी अफझुलखानानें फुशारकी मारिली, व तो इ. स. १६५९ च्या सप्टेंबर महिन्यांत निघाला, तो शिवाजीच्या ताब्यांतील दक्षिण सरहद्दीवरच्या किल्ल्यांकडून सरळ तुळजापुरावर चाल करून गेला. तेथें शिवाजीच्या पवित्र भवानीच्या मूर्तीचा नाश करण्याचा त्यानें प्रयत्न केला, परंतु पुजाऱ्यानें मूर्ति केव्हांच लांबवून लपवून ठेविल्यामुळें त्याचा प्रयत्न सफळ झाला नाहीं. त्यामुळें रागावून त्यानें गाय मारवून तिचें रक्त सर्व मंदिरभर शिंपडिलें. ह्या दुष्ट कृत्यानें मराठे अधिकच चवताळले. इकडे अफझुलखान चाल करून येत आहे असें पाहून, जावळीचा मुलूख अधिक बिकट असल्यामुळें तेथें शत्रूशीं दोन हात करण्यास अधिक सुलभ होईल ह्या हेतूनें शिवाजीनें राजगडाहून जावळीकडे कुच केलें. अफझुलखानाला हें कळतांच त्यानेंही पंढरपुरावरून जाऊन वांईकडे मोर्चा फिरविला. पंढरपुरास त्यानें मंदिरें भ्रष्ट करून विठोबाची मूर्ति भीमा नदींत फेंकून दिली. वांईस गेल्यावर त्यानें शिवाजीला पकडून ठेविण्यासाठीं एक पिंजरा करविला.

ह्या सर्व प्रकारांची तसेंच दगलबाजीनें फसवून शिवाजीला कैद करून विजापुरास घेऊन जाण्याच्या अफझुलखानाच्या काव्याची

सर्व खडा न खडा बातमी शिवाजीला त्याचा विश्वासु हेर विश्वासराव प्रभु ह्याच्याकडून मिळाली. शिवाजी प्रतापगडावर शक्य ती सर्व तजवीज करून राहिला होता. वांईहून अफझुलखानानें शिवाजीशीं बोलणें लावण्यासाठीं आपला वकील कृष्णाजी भास्कर ह्यास प्रतापगडास शिवाजीकडे पाठविलें. शिवाजीनें एके रात्रीं त्याची एकांतांत गुप्तपणें गांठ घेतली, व त्याला आपल्या हिंदुत्वाचें स्मरण देऊन शपथेवर खानाचा खरा हेतु काय आहे तें सांगण्यास सांगितलें. अफझुलखानाचा दगलबाजी करण्याचा बेत आहे, व त्यासाठींच त्यानें शिवाजीला वांईस भेटण्याकरितां बोलाविलें आहे, इत्यादि गोष्टी कृष्णाजीनें कबूल केल्या. हें ऐकून घेऊन शिवाजी परत आपल्या मुक्कामावर आला. त्याला झोंप लागल्यावर स्वप्नांत भवानीचा दृष्टांत झाला व तिनें अफझुलखानानें केलेल्या अत्याचारांबद्दल त्याचा सूड उगविण्याची शिवाजीला आज्ञा केली. सकाळीं उठतांच पुढें काय करावयाचें तें त्यानें नक्की केलें, व अफझुलखानाचा दगलबाजी करण्याचा इरादा असला तर त्याचें प्रायश्चित्त त्याला भोगावें लागेल असें मनांत निश्चित करून शिवाजी पुढील तयारीस लागला. अफझुलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर ह्याच्या बरोबर " वांईस येण्याची मला भीति वाटते. खानाची मजवर जर खरी कृपादृष्टि असेल तर त्यांनींच जावळीस यावें " असा निरोप देऊन, त्याच्या बरोबर आपला विश्वासु अमलदार पंतोजी गोपीनाथ ह्याला आपल्या तर्फें खानास आमंत्रण देण्यास पाठविलें, व एक पंधरवड्यानंतर येण्याची विनंति करण्यास सांगितलें. कृष्णाजी गेल्यावर शिवाजीनें प्रख्यात रडतोंडी

घाटांतून प्रतापगडापर्यंत नवीन रस्ता करविला, व ठिकठिकाणीं खानाच्या सैन्यासाठीं अन्नसामग्री ठेऊन खानाच्या खास बरदास्ती-साठीं उत्तम व्यवस्था केली. आणि रस्त्याच्या दुतर्फा परंतु रस्त्या-पासून थोड्याशा अंतरावर ठिकठिकाणीं गर्द झाडींत दबा धरून बसण्यासाठीं आपलें सैन्य ठेविलें.

कृष्णाजीनें वांईस जाऊन शिवाजीचा निरोप खानास सांगि-तला व " शिवाजी भितरा आहे, आपणास येऊन भेटण्याची त्याची हिंमत नाहीं, आपण जावळीस जाऊन त्याला आश्वासन दिलें तर तो विजापुरास आपल्याबरोबर येण्यास तयार होईल " इत्यादि अधिक सांगून खानाला खुष केलें. स्वतःच्या तसेंच आपल्या सैन्याच्या सामर्थ्याविषयीं खानाची खातरी असल्यामुळें त्यानें शिवाजीचें आमंत्रण स्वीकारल्याबद्दल शिवाजीला निरोप पाठविला, आणि पंधरवडा पुरा होतांच खान जावळीकडे सैन्यासह निघाला. थोड्याच दिवसांत तो आपल्या फौजेसह शिवाजीनें तयार ठेविलेल्या पाहुणचाराचा यथेच्छ उपभोग ठिकठिकाणीं घेत घेत व मजा मारीत मारीत रडतोंडीच्या घाटानें कोयनेच्या खोऱ्यांत उतरून तेथून थेट प्रतापगडाच्या पायथ्याशीं पार नामक गांवीं येऊन पोहों-चला व तेथें छावणी देऊन तळ दिला. अफझुलखान येऊन पोहोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं भेट घेण्याचें ठरलें. भेटीसाठीं प्रतापगडाच्या तटापासून सुमारें अर्ध्या मैलाच्या अंतरावर खास मंडप उभारून शृंगारण्यांत आला होता.

भेटीच्या दिवशीं सकाळीं शिवाजीनें रोजच्या क्रमाप्रमाणें स्नान करून न्याहारी केली, आणि दुपारीं नेहमींप्रमाणें वामकुक्षी केली. संध्याकाळापूर्वीं त्यानें भवानीच्या मंदिरांत जाऊन तिची प्रार्थना केली. नंतर आपले विश्वासु मित्र तानाजी मालुसरे, पेश्वा मोरो पिंगळे, व नेतोजी पालकर ह्यांना विजापुरच्या सैन्याच्या दोन्ही बाजूंवर व पिछाडीवर आपलें सैन्य सज्ज करून ठेवण्यास व शिंग फुंकतांच विजापुरच्या सैन्यावर एकदम हल्ला करण्याची तजवीज करण्यास सांगून रवाना केलें. नंतर आपल्या सल्लागारांस जमा करून जर आपण ह्यांतून सुरक्षित पार न पडलों तर, आपल्या मागें आपला मुलगा संभाजी ह्याला आपला वारस व नेतोजी पालकरास त्याचा रक्षक व जहागिरीचा चालक मान्य करण्यास सांगून शिवाजी आपल्या आईची भेट घेण्यास गेला. अफझुलखानाची भेट न घेण्यासाठीं जिजाबाईनें शिवाजीस पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु त्याचा निश्चय अढळ आहे, असें पाहून तिनें त्याला आशीर्वाद दिला, व आपला भाऊ संभाजी ह्याच्या वधाबद्दल सूड घेण्यास बजाविलें. आईचा आशीर्वाद घेऊन तो आपल्या महालांत पोषाख करण्यासाठीं परत आला. जर खानानें दगलबाजी केली तर आपलें रक्षण व्हावें ह्यासाठीं त्यानें अंगांत भरजरी आंगरख्याखालीं चिलखत घातलें, डोक्याला चिलखताचा टोप घालून त्यावर पागोटें गुंडाळिलें, आणि डाव्या हातांत त्याचें प्रसिद्ध वाघनख व उजव्या अस्तनींत विंचू नांवाची कट्यार छपवून ठेविली. ह्याप्रमाणें सज्ज होऊन जिवबा महाले, व संभाजी कावजी, आणि आणखी तिसरा

एक अशा तीन विश्वासू साथीदारांसह अफझुलखानास भेटण्यासाठीं निघाला.

ह्या अवधींत अफझुलखान पालखींत बसून आपला दिवाण कृष्णाजी भास्कर व कांहीं शेलके सशस्त्र अनुयायी ह्यांसह प्रतापगडाकडे निघाला. शिवाजीला जर खरोखर फसवायचा असेल तर हे अनुयायी बरोबर घेतल्यानें तो हेतु सिद्धीस जाणार नाहीं, असें कृष्णाजीनें सांगितलें, तें अफझुलखानास पटल्यामुळें शिवाजीप्रमाणें फक्त तीनच अनुयायी बरोबर ठेऊन बाकीच्याना त्यानें परत पाठवून दिलें. ह्या तीन अनुयायात सैयद बंदा नामक प्रख्यात तरवारबहादूर शिपाई होता. तो दिसतांच त्याला आपण फार भितों सबब त्याला मागें ठेऊन द्यावा व आपणही आपल्याबरोबरच्या एकाला परत पाठविण्यास तयार आहों, असें शिवाजीनें खानास कळविलें. त्याप्रमाणें सैयद बंदा मागें राहिला. थोड्या वेळानें अफझुलखान मंडपांत येऊन दाखल झाला व शिवाजीही येऊन पोहोंचला. शिवाजीजवळ हत्यार नाहीं असें पाहून कांहींतरी कुरापत काढून त्याच्यावर तुटून पडण्यास ही संधी ठीक आहे, असें अफझुलखानास वाटून, "केवळ एका शेतकऱ्याच्या पोरानें एवढें वैभव कसें व कोठून संपादन केलें" असें त्यानें शिवाजीला विचारिलें. त्याला "अफझुलखानासारख्या एका स्वैपाक्याच्या पोराला त्याची पंचाईत काय" असा शिवाजीनें रागानें टोमणा मारिला. त्याबरोबर क्रुद्ध होऊन खानानें आपल्या डाव्या हातानें शिवाजीची गर्दन पकडून आपल्या बगलेंत दाबून धरिली आणि उजव्या हातानें शिवाजीच्या पोटांत तरवारीचा वार



**महाराजा शिवाजी.**

( हें चित्र एका फार जुन्या फ्रेंच पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें आहे. )



**अफझुलखान.**

करण्याचा प्रयत्न केला; परंतु चिलखतामुळें तरवार अटकली. खानानें शिवाजीची मान मुरगळून त्याच्या पोटांत पुन्हां तरवार खुपसण्यासाठीं उजवा हात उचलला. शिवाजीला जवळ जवळ मूर्च्छा आली. तथापि असल्या भयंकर स्थितींतही त्यानें अवसान सांवरून आपल्या देवतेचें स्मरण करून मोठ्या प्रसंगावधानानें आपला डावा हात खानाच्या कंबरेच्या बाजूनें खानाच्या पोटाकडे फिरवून त्याच्या पोटांत वाघनख खुपसलें. त्याबरोबर खानाला वेदना उत्पन्न होऊन त्याची मिठी सुटली. इतक्यांत शिवाजी सुटा होऊन त्यानें त्याच्या पाठींत विंचू खुपसला. खानानें खालीं पडतां पडतां शिवाजीवर तरवारीचा वार केला, परंतु चिलखतामुळें त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. शिवाजीनें जिवबा महाल्याची तरवार घेऊन खानाच्या डाव्या खांद्यावर वार केला. खान जमिनीवर पडला व मदतीसाठीं ओरडला त्याबरोबर सैयद बंदा आपल्या साथीदारांसह धांवून आला. त्यांनीं अफझुलखानाला पालखींत घालून पारला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु शिवाजी व महाले ह्यांनीं त्यांचा पाडाव करून त्यांस ठार केलें. संभाजी कावजीनें मरणोन्मुख झालेल्या खानाचें शीर कापून शिवाजीकडे आणिलें.

शिवाजीनें ठरविल्याप्रमाणें शिंग फुंकतांच शिवाजीची दबा धरून राहिलेली सेना एकदम खानाच्या फौजेवर तुटून पडली, व खानाच्या फौजेचा धुव्वा उडाला. जे शरण आले त्यांना शिवाजीनें बचाविलें व त्यांत जे मराठे होते त्यांना आपल्या पदरीं नोकर ठेविलें. ह्याप्रमाणें शिवाजीच्या जिवावरचा प्रसंग टळून खानाचा व त्याच्या सैन्याचा

संपूर्ण नाश होऊन शिवाजीला मोठा विजय मिळाला. खानाची सर्व छावणी, तींतील खजिना, युद्धसामग्री, हत्ती, घोडे व तोफा, हीं सर्व शिवाजीच्या हातीं लागलीं. ह्या विजयाप्रीत्यर्थ ह्या लुटींतून त्यानें आपल्या सैन्यास बक्षिसें वांटलीं. पंतोजी गोपीनाथाला हिवरे गांव इनाम दिलें. खानाच्या दगलबाजीच्या हेतूची बातमी देणाऱ्या आपल्या विश्वासराव नामक हेराला एक मोठी रक्कम बक्षीस दिली. नंतर अफझुलखानाचें शीर एका हातांत घेऊन शिवाजी जिजाबाईला भेटण्यास गेला. तिनें त्याला आशीर्वाद व धन्यवाद देऊन संभाजीच्या वधाबद्दल सूड उगविल्याबद्दल त्याला शाबासकी दिली. शिवाजीनें अफझुलखानाचें शीर भवानीला बळी ह्मणून अर्पण करून त्या टेंकडीवर पुरविलें व त्यावर एक बुरूज बांधवून त्याला अफझुलबुरूज हें नांव दिलें. मंडपाचा सोन्याच्या कळसाचा खांब शिवाजीनें महाबळेश्वराच्या मंदिराला दिला. आणि जेथें अफझुलखानाचें धड पडलें होतें तेथेंच तें पुरवून त्या ठिकाणीं त्याची कबर बांधविली. हीं सर्व चिन्हें अजून आहेत. तसेंच अफझुलखानाची तरवारही शिवाजीच्या साताऱ्च्या वंशजांजवळ अजून आहे. ह्या एका महाप्रबळ शत्रूचा शिवाजीनें मोठ्या पराक्रमानें व शिताफीनें नाश केला, आणि त्याच्या दगलबाजीचें त्याला प्रायश्चित्त दिलें.

शिवाजीनेंच विश्वासघात करून अफझुलखानाचा वध केला, असा कित्येक लेखक त्याला दोष देतात. ह्या गैरसमजाला कारण काफीखान नामक मुसलमानानें लिहिलेला वृत्तांत होय. ह्या काफी-

खानाच्या वृत्तांतावर भिस्त ठेवून ग्रांट डफनें शिवाजीच्या आंगीं विश्वासघातकीपणाचा दोष लाविला आहे. परंतु असें म्हणण्याला आधार जो काफीखानाचा वृत्तांत तोच विश्वासनीय नाहीं. कारण एकतर काफीखानानें शिवाजीला दुष्ट काफर, बदमाश कुत्ता, अशा प्रकारच्या शिव्या घटकोघटकीं दिल्या आहेत. त्यावरून त्याचें मन शिवाजी विषयीं मुळींच निःपक्षपाती नव्हतें व तो त्याचा द्वेष्टा होता, हें उघड दिसतें, ह्यावरून, तसेंच खरा प्रकार काय घडला हें सांगण्याला अफझुलखानाच्या परिवारापैकीं कोणीही मुसलमान जीवंत सुटला नसल्यामुळें हा प्रकार स्वतः पाहिलेला असा मुसलमानांतर्फेचा कोणीही हा वृत्तांत सांगेल असा राहिला नव्हता. त्यामुळें काफीखानाच्या वृत्तान्ताला विश्वसनीय आधार नाहीं, आणि म्हणून तो एकपक्षीय द्वेषमूलक आहे हें उघड होतें. ज्या उपलब्ध व विश्वसनीय बखरी आहेत त्यांत अफझुलखानाचाच दगलबाजी करण्याचा इरादा होता व त्यानेंच प्रथम शिवाजीवर घाला घातला, असा उल्लेख आहे; आणि तोच अधिक विश्वसनीय आहे, ह्यांत शंका नाहीं. आतां कित्येक असें म्हणतील कीं दगलबाजी करण्याचा इरादा शिवाजीचा नव्हता तर मग त्यानें अफझुलखानाला बोलावण्याचें काय कारण होतें ? परंतु एकंदर हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, बोलावण्याची व भेटीची कल्पना मूळ शिवाजीची नव्हती. ती खानानेंच काढिली व त्यानेंच प्रथम शिवाजीला वांईस बोलाविलें, व त्याला पकडण्यासाठीं पिंजराही तयार केला होता. ह्या एवढ्या एकाच गोष्टीवरून विश्वासघात करण्याचा

खानाचा हेतु होता हें स्पष्ट दिसतें. शिवाय प्रतापगडावर तटबंदीच्या व आजूबाजूच्या बिकट प्रदेशाच्या साहाय्यानें खानाशीं सामना करण्याचा शिवाजीनें बेत केला होता. परंतु जेव्हां खानानें त्याला वांईस बोलाविलें तेव्हां शत्रूच्या तावडींत जाणून बुजून जाण्यापेक्षां आपल्याच मुलखांत असणें हें अधिक शहाणपणाचें आहे, व जर खानाची भेटण्याची इच्छा कसेल तर त्यानेंच येथें यावें, म्हणजे जरी दगलबाजी त्यानें केली तरी ती टाळण्यास व स्वरक्षण करण्यास अडचण पडणार नाहीं, असें शिवाजीला वाटून त्यानें खानाला उलट आमंत्रण केलें, हें उघड दिसतें. ह्यावरून शिवाजीच्या पदरीं विश्वासघाताचा किंवा दगलबाजीचा दोष बांधणें कधींही वास्तविक होणार नाहीं. आतां घटकाभर असें मानिलें कीं शिवाजीचाच विश्वासघात करण्याचा इरादा होता. तथापि आपल्या भावाचा ज्यानें दगलबाजीनें वध करविला होता, ज्यानें हिंदूंच्या अत्यंत पवित्र मंदिरांचा दुष्टपणानें विध्वंस केला व असेच दुसरे अत्याचार केले, त्याचा त्याच रीतीनें व नीतीनें नाश करण्याचा जर शिवाजीनें घाट घातला असेल, तर त्यावरून शिवाजीचें वर्तन दोषार्ह झालें, असें म्हणणें फारसें वास्तविक होणार नाहीं. कसेंही असो ह्या प्रकारानें शिवाजीच्या उज्ज्वल कीर्तीला कमीपणा येण्यासारखें कांहीं झालें नाहीं.

# भाग ६ वा.

## पितृघातक्यांचा सूड, व पितृभेट.

अफझुलखानाच्या वधाची व त्याच्या सैन्याच्या नाशाची खबर विजापुरास कळतांच दरबारांत हाहाकार उडाला, व सर्वांची धाबीं दणाणलीं. इकडे शिवाजी स्वस्थ बसला नाहीं. त्यानें आपल्या वाढलेल्या फौजेच्या साह्यानें जिकडे तिकडे धुमाकुळ माजविला. त्यानें दळवी नामक विजापुरच्या दरबारच्या मराठा सरदाराची जहागीर काबीज करून त्याला हुसकून लाविलें. अण्णाजी दत्तोनें कोल्हापुर नजीकचा पन्हाळा किल्ला काबीज केला. पवनगड, वसंतगड, रांगणा व नंतर खेळणा, ज्याला शिवाजीनें विशाळगड हें नांव दिलें, असे एकामागून एक किल्ले हस्तगत करण्याचा शिवाजीनें सपाटा चालविला. अली आदिलशाह घाबरून जाऊन त्यानें मिरजचा किल्लेदार रुस्तम जमानखान ह्याला शिवाजीवर चालून जाण्यास सांगितलें. परंतु शिवाजीनें त्याच्या सैन्याचा तेव्हांच धुव्वा उडवून त्याला परत हटवून लावलें, एवढेंच नव्हे, परंतु शिवाजी आपले घोडदळ एकत्र करून मुलूख लुटून उध्वस्त करीत करीत थेट विजापुर राजधानीवर चाल करून गेला. तेथून लवकरच परत फिरून सर्व जमविलेलें द्रव्य विशाळगडावर ठेऊन कोंकणांत उतरला व राजापुराहून खंडणी म्हणून मोठी रक्कम उघरवून तेथून दाभोळचा किल्ला हस्तगत करून राजगडास परत गेला.

आपल्या ताब्यांतील जवळ जवळ सर्व महत्वाचे किल्ले घेतल्याबद्दल, मुलूख लुटल्याबद्दल, आणि विशेषेंकरून अफझुलखान व त्याच्या सैन्याच्या नाशाबद्दल सूड उगविण्याचा अली आदिलशाहानें निश्चय केला. आपल्या दरबारीं एकही सरदार ह्या कामाला लायक नाहीं असें पाहून त्यानें सिद्दी जोहार नामक एका भाडुती शिपायाला सलाबतजंग ही पदवी देऊन त्याला सेनापति नेमून अफझुलखानाचा मुलगा फझल महमद, जो आपल्या बापाच्या वधाबद्दल शिवाजीवर सूड उगविण्यासाठीं जळफळत होता, त्याला त्याच्या मदतीस देऊन, त्याच्या बरोबर १०००० घोडेस्वार, १४००० पायदळ व उत्तम तोफखाना देऊन शिवाजीवर चालून जाण्यास सज्ज केलें. त्याबरोबरच जंजिऱ्याच्या फत्तेखानाला कोंकणप्रांतावर चालून जाण्यास हुकूम केला. सावंतवाडीच्या सावंतांनीं नैरुत्येकडून शिवाजीला त्रास देण्याचें कबूल केलें. सावंतवाडी हें फार जुनें संस्थान कोंकणांत असून तें विजयानगरच्या उत्कर्षाच्या वेळीं त्याचा एक भाग होतें. पुढें तें विजापुरच्या ताब्यांत गेलें. ह्या वंशांतील माग सावंत, खेमसावंत व सोमसावंत ह्या पराक्रमी पुरुषांनीं तें स्वतंत्र केलें होतें. पुढें इ. स. १६४१ त लखम सावंत गादीवर आला. त्यानें सावंतवाडीच्या एका भागाचा मालक कुडाळचा देसाई ह्याचा खून केला. त्यामुळें त्याची सर्व प्रजा त्याच्या विरुद्ध बिथरली. तेव्हां त्यानें इ. स. १६५० त शिवाजीचा मांडलिकपणा पत्करून आपलें रक्षण करून घेतलें. शिवाजीनें त्याला सरदेसाई ही पदवी देऊन आपला मांडलिक ह्या नात्यानें सर्व कोंकण

९५३७


प्रांत त्याच्या हवालीं केला होता. लखम सावंत मोठा कपटी, धूर्त व घरसोडी स्वभावाचा होता. त्यानें ही संधी पाहून विजापुर दरबाराचें वर्चस्व मान्य करून शिवाजीवर चालून जाण्याचें पत्करिलें.

ह्याप्रमाणें तिन्हीं बाजूंनीं शत्रू चाल करून येत आहेत असें पाहून शिवाजीनेंही आपल्या सैन्याचे तीन भाग करून एकावर राघो बल्लाळाला नेमून फत्तेखानावर पाठविलें, बाजी फसलकराला दुसरें सैन्य देऊन लखम सावंतावर चाल करून जाण्यास रवाना केलें, आणि पन्हाळगडाची उत्तम नाकेबंदी करून व त्याच्या रक्षणासाठीं जय्यत सैन्य ठेऊन आपण पन्हाळ्यावर राहिला, आणि नेतोजी पालकराला सैन्यानिशीं शिद्दी जोहाराला सर्व बाजूंनीं हैराण करण्यास पाठवून दिलें. अंदाजाप्रमाणें प्रारंभीं शिवाजीला यश मिळालें खरें, परंतु थोड्याच दिवसांत पारडें फिरलें. नेतोजी पालकराला यश मिळालें नाहीं, व शिद्दी जोहार त्याला हटवीत हटवीत व सर्व वाटांची नाकेबंदी करीत पन्हाळ्यापर्यंत येऊन त्यानें किल्ल्याला वेढा दिला. इकडे फत्तेखानानें आपल्या लढाऊ जहाजांच्या साह्यानें राघो बल्लाळाला मागें हटविलें, व सावंतवाडीवर चालून गेलेल्या बाजी फसलकराचा पराभव होऊन तो मारला गेला. अशा संकटमय स्थितींत शिवाजी सांपडला, व पन्हाळा पडला तर त्याच्या सर्व आशांचा व त्याचा नाश होईल अशी स्थिति प्राप्त झाली. परंतु त्या अचाट बुद्धिशाली महापुरुषाचें प्रसंगावधान किंवा धैर्य सुटलें नाहीं. त्यानें शरण येऊन तह करण्यास कबूल आहों व त्यासाठीं प्रत्यक्ष भेट घेऊन बोलणें करण्याची आपली इच्छा शिद्दी

जोहारास कळविली. शिद्दीनें तें मान्य केलें व दोघांच्या भेटी होऊन वाटाघाट झाली. कांहीं मुद्दे बाकी राहिले ते दुसऱ्या दिवशीं नक्की करण्याचें ठरवून शिवाजी पन्हाळ्यावर परत गेला. पन्हाळा पडणार अशी आतां वेढा देणारांची खात्री झाल्यामुळें त्यांचा पाहारा रात्रीं शिथिल झाला व पहारेकरी झोंपी गेले. मुसलमानांचें सैन्य खानपानांत मग्न होऊन गेलें. ही संधी साधून शिवाजीनें शेलक्या तुकडीसह पन्हाळ्यांतून मध्यरात्रीं निसटून आडमार्गानें विशाळगडाकडे कूच केलें. पहाटे शिवाजी निसटल्याची बातमी कळतांच फजल महमद व त्याच्या मागून शिद्दी जोहार त्याचा पाठलाग करण्यासाठीं घोडदळ घेऊन निघाले. फजलच्या सैन्यानें शिवाजी विशाळगडापासून साहा मैलांवर असतांना त्याच्या सैन्याची पिछाडी गांठली. शिवाजीनें मोठें प्रसंगावधान वापरून आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या करून एक बाजी प्रभू देशपांडे ह्याच्या हाताखालीं देऊन त्याला पिछाडीस राहण्यास व शेवटपर्यंत लढण्यास सांगून, दुसऱ्या तुकडीसह आपण विशाळगड गांठण्यासाठीं कूच करूं लागला, व सुरक्षित पोंचतांच पांच तोफांच्या आवाजानें तें ध्वनित करण्यांत येईल असें ठरविलें. बाजी देशपांडे हा प्रभु जातीचा असून तो पूर्वीं चंद्रराव मोऱ्याच्या पदरीं होता व त्याच्या तर्फेनें तो शेवटपर्यंत शिवाजीविरुद्ध लढला होता. परंतु जेव्हां मोऱ्यांचा पाडाव होऊन नाश झाला तेव्हां त्यानें शिवाजीच्या पदरीं नोकरी स्वीकारिली होती. बाजीनें ही कामगिरी खुशीनें पत्करिली, व फजल महमदाच्या सैन्याशीं बहादुरीनें लढून त्याला पुढें सरकूं न

देतां लढतां लढतां बाजी जखमी होऊन पडला. इतक्यांत तोफांचे पांच आवाज त्यानें ऐकिले व आपला धनी सुरक्षित पहोंचल्याचें जाणून त्या स्वामीनिष्ठ वीरानें आनंदानें प्राण सोडिले. त्याच्या अनुयायांनीं त्याचें प्रेत विशाळगडावर नेलें, व सर्व सैन्य व्यवस्थित रीतीनें विशाळगडावर पोंचलें.

शिवाजी शिद्दीजोहाराच्या हातावर तुरी देऊन निसटला, व जरी पुढें शिद्दीनें विशाळगडाला वेढा दिला, तरी त्यांत त्याला यश मिळालें नाहीं, म्हणून अली अदिलशाहानें त्याला परत बोलावून घेतलें व आपण स्वतः सैनापत्य पत्करिलें. त्यानें पन्हाळा सर केला, व विशाळगड व रांगणा ह्यांशिवाय आजूबाजूचे सर्व किल्ले हस्तगत केले, आणि पावसाळ्यांत कृष्णेच्या कांठीं चिमुलगी गांवीं तळ देऊन राहिला. इकडे शिवाजीनें कोंकणांतील दंडा राजपुरी नामक बंदरावर हल्ला करून पुष्कळ द्रव्य लुटलें, व तेथें असलेले इंग्रज व्यापारी जंजिऱ्याच्या फत्तेखानाला मदत करतात असा संशय घेऊन त्यांस कैद केलें. त्यांच्या जवळून मोठी रक्कम दंड म्हणून वसूल करून शिवाजीनें त्यांस सोडिलें. नंतर शिवाजीनें जंजिऱ्याला वेढा घातला. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं, व त्याला स्वप्नांत वरुणदेवतेचा दृष्टांत झाला, त्यांत त्या देवतेनें जंजिरा तुला हस्तगत होणार नाहीं, व तूं त्याच्या जवळच दुसरें एक बंदर तयार कर, असें सांगितलें. त्याप्रमाणें शिवाजीनें जंजिऱ्याचा वेढा उठविला, व त्याच्या जवळच सिंधुदुर्ग नांवाच्या बेटाला तटबंदी करून तें त्यानें आपल्या लढाऊ जहाजांचें ठाणें केलें. वरील कारणाशिवाय शिवाजीला हा वेढा उठ-

विण्यास दुसरें एक कारण झालें. तें असें कीं, सावंतवाडीच्या सावंतांनीं विजापुरच्या आणि मुधोळच्या बाजी घोरपड्याच्या सैन्याची जर मदत मिळेल तर शिवाजीवर सरशी करून त्याचा पाडाव करूं असें अली अदिलशाहास सुचविलें. त्यानें तें मान्य करून आपलें सैन्य पाठविलें. ही बातमी कळल्यामुळें शिवाजीनें जंजिन्याचा वेढा उठविला व शत्रूंच्या फौजा एकत्र होऊन चाल करण्यापूर्वींच तो विशाळगडास परत आला. ह्या वेळीं बाजी घोरपडे मुधोळला आहे असें शाहाजीकडून शिवाजीला (इ. स १६६१ त) कळलें. शिवाजी ताबडतोब २००० घोडेस्वारांनिशीं गुप्तपणें विशागडावरून निघून मुधोळवर चाल करून गेला. घोरपड्यानें शाहाजीशीं दगलबाजी करून त्याचा नाश करण्याचें कृत्य केलें होतें त्याचा सूड घेण्याची ही संधी शिवाजीला मिळाली व त्यानें भयंकर सूड घेतला. बाजी घोरपडे आपल्या अनुयायांसह शौर्यानें लढला, परंतु तो व त्याचे मुलगे व अनुयायी लढाईंत मारले गेले. शिवाजीनें सर्व मुधोळ लुटून उध्वस्त केलें व पुष्कळ लूट मिळविली. ही सर्व खबर शिवाजीनें पत्र लिहून शाहाजीला कळविली.

इकडे शिद्दी जोहारानें बंड केल्यामुळें त्याचा पाडाव करण्यासाठीं अली अदिलशाहानें सावंतांच्या मदतीस पाठविलेलें सैन्य परत बोलावून घेतलें. ही संधी साधून शिवाजीनें सावंतांवर चाल केली, व त्यांचा पराभव करून त्यांचें संस्थान लुटून फस्त केलें. शेवटीं त्यांना शिवाजीची दया भाकून शरण जाणें भाग पडलें. सावंतांनीं शिवाजीचे खंडणीदार होऊन, दरसाल उत्पन्नाचा अर्धा भाग,

व तीन हजार जैय्यत सैन्य देऊन नोकरी करण्याचें कबूल केल्यावर. व फोंडा किल्ला आपल्या कबजांत देण्याच्या अटीवर त्यांचें ह्मणणें मान्य केलें. ह्याप्रमाणें सावंत पुन्हा शिवाजीचे ताबेदार झाले. ह्या धामधुमींत गोव्याच्या पोर्तुगीजांनीं सावंतांना मदत दिल्याबद्दल शिवाजीनें त्यांचा चांगला समाचार घेतला. त्यानीं शिवाजीला बंदुका, तोफा व दारूगोळा पुरा पाडण्याच्या शर्तीवर त्याच्याशीं तह करून आलेलें संकट टाकिलें.

ह्याप्रमाणें मुधोळकर घोरपड्याचा व सावंताचा सूड घेऊन, पोर्तुगीजांवर सरशी मिळवून शिवाजीनें अल्ली अदिलशाहाला सर्व बाजूंनीं हैराण करून सोडल्यामुळें तो हताश होऊन विजापुरास परत गेला. अल्ली अदिलशाहाची शिवाजीशीं ह्यापुढें युद्ध चालू ठेवण्याची इच्छा नव्हती, व तशी स्थितीही नव्हती. तशीच शिवाजीचीही विजापुराशीं युद्ध चालू ठेवण्याची मर्जी नव्हती. महाराष्ट्रीयांना मुसलमानांच्या परवशतेंतून मुक्त करून स्वतंत्र करण्याचा शिवाजीचा मुख्य हेतु होता, तो विजापुरच्या ताब्यांतील महाराष्ट्रीय वस्तीचा सर्व मुलुख आपल्या हस्तगत करून घेतल्यामुळें पार पडला होता, म्हणून त्याला विजापुराशीं युद्ध चालूं ठेवण्याचें कारण राहिलें नव्हतें. आतां विजापुर व गोळकोंडा ह्यांच्याशीं दोस्ती करून मोगलांपासून आपल्या देशाचा व स्वजातीयांचा बचाव करण्याचा त्याचा हेतु होता. ह्याप्रमाणें दोन्ही पक्षांची तह करून दोस्ती करण्याची इच्छा होती. ती घडवून आणण्यासाठीं फक्त एका वजनदार मध्यस्थाची जरूर होती. योगायोग असा चमत्कारिक आला

कीं तें काम शाहाजीकडेच आलें. आपल्या मुलाकडे शाहाजीनें पूर्वी दुर्लक्षच केलें होतें, परंतु आतां त्याला त्याच्याविषयीं मोठा अभिमान वाटूं लागला होता. तशांत बाजी घोरपड्यावर विजय मिळवून त्याचा व त्याच्या जहागिरीचा शिवाजीनें संपूर्ण विध्वंस केल्यामुळें शाहाजीला अधिक साभिमान आनंद झाला होता. अशा रीतीनें आपल्या कुलभूषण पुत्रास भेटण्यास आतुर झालेल्या शाहाजीला शिवाजीशीं सख्य करण्यासाठीं विजापुर दरबारानें आपला प्रतिनिधि म्हणून पाठविण्याचें ठरविल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें झालें.

शाहाजीनें चांगला मुहुर्त पाहून आपली दूसरी पत्नी तुकाबाई व तिचा पुत्र व्यंकोजी ह्यांसह मोठ्या लवाजम्यानिशीं व इतमामानें प्रयाण केलें. प्रथम त्यानें तुळजापुरास जाऊन भवानीचें दर्शन घेऊन तिची पूजाप्रार्थना केली. तेथून शिंगणापुरास आपल्या पूर्वजांच्या व पित्याच्या छत्र्यांची पूजा करून पंढरपुरास गेला. तेथें विठोबाचें दर्शन घेऊन व पूजा बांधून शाहाजीनें जेजूरीस प्रयाण केलें. जेजूरीस शाहाजीला सामोरें जाण्याचें ठरलें होतें त्याप्रमाणें शिवाजी निघाला, व त्याचें स्वागत करण्यासाठीं आपला पेश्वा मोरो पिंगळे ह्याला त्यानें पुढें पाठविलें, व मागून आपली आई जिजाबाई व आपल्या सईबाई आणि सोयराबाई ह्या दोन्हीं बायका ह्यांसह शिवाजी खंडोबाच्या मंदिरांत जाऊन शाहाजीच्या आगमनाची वाट पाहात बसला. शाहाजी येतांच शिवाजीनें साष्टांग नमस्कार घालून त्याच्या पायांवर आपलें डोकें ठेविलें. अहाहा! शाहाजी व शिवाजी ह्या

उभयतां प्रभावशाली पितापुत्रांना किती धन्यता व केवढा आनंद वाटला असेल बरें ! नंतर शिवाजीच्या नायकांनीं शाहाजीला प्रणाम केले, आणि शेवटीं जिजाबाईनें आपल्या पतीचें सानंद स्वागत केलें. ह्या अत्यंत उत्साहकारक व आनंदोत्सवपूर्ण प्रसंगाचें यथार्थ चित्र काढण्यास त्या वेळीं एकादा निष्णात चितारी, किंवा शब्दचित्र रेखाटण्यास एकादा प्रतिभाशाली कवि हाजर असता तर किती बहार झाली असती ! असो; सप्रणाम स्वागत व कुशलप्रश्न झाल्यावर शाहाजी पालखींत विराजमान झाला व त्याचा पितृभक्त, विनयशाली व कुलदीपक पुत्र शिवाजी पालखी बरोबर पायीं निघाला, व सर्व स्वाऱ्या जेजूरी गांवांत मुक्कामावर खास उभारलेल्या मंडपांत जाऊन दाखल झाल्या. तेथें अदबीनें उभा राहून आजपर्यंत केलेल्या आज्ञाभंगाबद्दल व अपराधांबद्दल शिवाजीनें मोठ्या प्रेमानें शाहाजीची क्षमा मागितली. शाहाजीनें सद्गदित होऊन मोठ्या प्रेमानें शिवाजीला आलिंगन देऊन आपल्या देशबांधवांना पारतंत्र्यांतून मुक्त करणाऱ्या पुत्राला त्यानें क्षमा दिली, व आरंभिलेलें महत्कार्य पार पाडण्यास व आपल्या मागें आपला मुलगा व्यंकोजी ह्याच्याशीं प्रेमानें वागण्यास शिवाजीला सांगितलें. नंतर तेथून पितापुत्र पुण्यास गेले. तेथें प्रथम तहाच्या अटी (इ. स. १६६२) ठरल्या त्या अशा:-कल्याणपासून दक्षिणेस फोंडा किल्यापर्यंत, आणि पश्चिमेस दाभोळपासून पूर्वेस इंदापुरा पर्यंत शिवाजीनें जिंकिलेल्या मुलखावर त्याचें स्वामित्व व त्याची संपूर्ण स्वतंत्र सत्ता मान्य करणें, आणि ह्याच्या मोबदल्यांत शिवाजीनें

विजापुर दरबाराची केव्हांही कुरापत न काढणें. ह्या अटी शिवाजी व विजापुर दरबार ह्या उभयतांनीं मान्य केल्या.

पुढें शिवाजीनें सर्व पावसाळा शाहाजीचें आदरातिथ्य करण्यांत घालविला. पावसाळा संपल्यावर आपण जिंकलेल्या किल्ल्यांपैकीं अत्यंत महत्वाचे असे राजगड, पुरंदर, लोहगड, रायरी वगैरे किल्ले दाखविण्यासाठीं शिवाजीनें शाहाजीला नेलें हे किल्ले पाहून शाहाजी अत्यंत संतुष्ट झाला व त्याला शिवाजीच्या बुद्धिचातुर्याचें फार कौतुक वाटलें. विशेषतः रायरी किल्ला राजकीय दृष्ट्या किती महत्वाचा आहे व तो अतिशय उंचीवर असल्यामुळें कसा अभेद्य आहे, ही गोष्ट त्या चाणाक्ष व कसलेल्या वीराच्या तांबडतोब लक्षांत आली, आणि त्यानें राजगडाच्या ऐवजीं रायरीवरच मुख्य राजधानीचें ठाणें करण्याची शिवाजीला सल्ला दिली. शिवाजीला ही गोष्ट पटली व त्यानें रायरीला रायगड हें नांव देऊन त्यावर तटबंदी करून इमारती व स्वतःसाठीं राजमहाल बांधण्यासाठीं आबाजी सोनदेव ह्याची नेमणूक केली. ह्या किल्ल्याची तटबंदी व नाकेबंदी फार दक्षतेनें व मजबूत करून शिवाजीनें तें आपलें मुख्य निवासस्थान केलें. ह्याप्रमाणें बरेच दिवस आपल्या पुत्राच्या पराक्रमाचा व विजयाचा प्रत्यक्ष मूर्तिमंत विस्तार पाहून आनंदित होऊन, व उत्तम पाहुणचाराचा व विश्रांतीचा यथेच्छ उपभोग घेऊन शिवाजीच्या विक्रमाविषयीं कौतुकानें सद्गदित होऊन शाहाजीनें परत आपल्या जहागिरीवर जाण्यासाठीं शिवाजीला आशीर्वाद देऊन शिवाजीचा निरोप घेतला. शिवाजीनें आपल्या पित्याला

असंख्य नजरनजराणे व पोशाख देऊन मोठ्या प्रेमानें त्याची बोळवण केली. शाहाजी तेथून निघून विजापुरास गेला व सर्व हकीकत अस्ली अदिलशाहाला निवेदन करून नंतर आपल्या दक्षिणेतील जहागिरीवर सुखरूप जाऊन दाखल झाला.

---

# भाग ७ वा

## मोगलांशीं सामना.

ह्याप्रमाणें विजापुरच्या सत्तेखालचा महाराष्ट्रीयांच्या वस्तीचा प्रदेश जिंकून, त्यांना पारतंत्र्यांतून मुक्त करून, आणि आपल्या पराक्रमानें, कर्तबगारीनें व बुद्धिकौशल्यानें विजापुरच्या बादशाहाला नमवून, त्याला तह करण्यास भाग पाडून, त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें दोस्ती केल्यावर मोगल साम्राज्याच्या सत्तेखालील महाराष्ट्रीयांस पारतंत्र्यांतून मुक्त करण्याकडे शिवाजीनें लक्ष फिरविलें. मोगलाई मुलखावर स्वारी करण्याला कांहीं कारण पाहिजे होतें तें, मोगलांनीं इ. स. १६६१ त कल्याण काबीज केल्यानें मिळालें. शिवाजीनें अनुकूल संधी पाहून नेतोजी पालकर व मोरो पिंगळे ह्यांच्याबरोबर मोठें लश्कर देऊन मोगलाई मुलखावर पाठविलें. त्यांनीं अहमदनगरापासून थेट औरंगाबादेपर्यंतचा मोगलांचा मुलूख लुटला. ह्याचा परि-

णाम असा झाला कीं, त्या वेळचे दक्षिणेंतील मोगल अधिकारी शिवाजीच्या भीतीनें खजिनाही रवाना करीनात. त्यांना त्यांच्या नादानपणाबद्दल लाजविण्याच्या हेतूनें मोगल सुभा शाइस्तेखान यानें उदाराम देशमूख नामक गृहस्थाची बायको राई बगीण हिला लश्कर देऊन मराठ्यांवर चाल करून जाण्यासाठीं सज्ज केलें. ही स्त्री मोठी शूर व धाडशी होती. तथापि तिचा पराभव करून शिवाजीनें तिला कैद केलें व तिच्या सैन्याची दाणादाण केली. त्यानंतर एका रजपूत अमलदाराच्या हाताखालीं चाल करून आलेल्या मोगल लश्कराचा पराभव करून शिवाजीनें सर्व दक्षिण लुटून उध्वस्त केली व प्रत्येक महत्वाच्या गांवापासून खंडणी म्हणून पैसे उकाळिले.

शिवाजीच्या ह्या विजयाची व त्यानें माजविलेल्या धुमाकुळाची खबर मोगल बादशाह औरंगजेबास मिळतांच त्यानें आपला दक्षिणचा सुभा शाइस्तेखान ह्याला मोठें लश्कर घेऊन शिवाजीवर जाण्यास फर्माविलें. शाइस्तेखान मोठ्या लश्करासह निघाला, आणि वाटेंत मराठा सैन्यानें जरी पुष्कळ त्रास दिला तरी त्याला न जुमानतां तो झपाट्यानें कूच करीत पुण्यावर चालून आला, आणि तें काबीज करून त्यानें पुणें घेतलें. शिवाजी माघार घेऊन सिंहगडच्या अभेद्य किल्ल्यांत निवडक लश्करासह जाऊन राहिला. सिंहगडावर छापा घालण्याचा शाइस्तेखानाचा विचार होताच. परंतु तसें करण्यापूर्वीं आजूबाजूचीं नाकीं व रस्ते आपल्या कबजांत घेऊन नंतर सिंहगडावर चाल करून जाण्याचें त्यानें ठरविलें व त्याप्रमाणें प्रथम चाकणावर छापा घालून वेढा दिला. शिवाजीचा चाणकचा

किल्लेदार फिरंगोजी नरसाळा अतिशय बहादुरीनें लढला, परंतु शेवटीं अन्न व युद्धसामग्री खुटल्यामुळें नाइलाजानें तो शाइस्तेखानाला शरण गेला व किल्ला पडला. शाइस्तेखानाला त्याच्या बहादुरीचें व धाडसाचें कौतुक वाटून त्यानें फिरंगोजीला मोगल सैन्यांत मोठी जागा देण्याची इच्छा दर्शविली. परंतु फिरंगोजीनें ती मान्य केली नाहीं, तेव्हां शाइस्तेखानानें त्याला त्याच्या राहिलेल्या सैन्यासह शिवाजीकडे परत ज्याण्यास परवानगी दिली. शिवाजीनें फिरंगोजीला त्याच्या पराक्रमाबद्दल शाबासकी देऊन भूपाळगडावर किल्लेदार नेमिलें. ह्या अवधींत शिवाजीनें सिंहगडावरून राजगडावर आपला मुक्काम नेला. तेथें " बांदरासारखा डोंगरांत घुसून कां राहतोस " अशा आशयाचें एक पत्र शाइस्तेखानानें शिवाजीला लिहिलें. त्याला " मी नुसता वानर नसून प्रत्यक्ष हनुमान आहे, व त्यानें जसा रावणासारख्या प्रबळ राजाचा नाश केला तसा तुझाही मी नाश करीन " असा शिवाजीनें जबाब पाठविला.

ह्यानंतर शाइस्तेखान चाकणहून पुण्यास गेला व तेथें आपला तळ देऊन, आपण स्वतः शिवाजी लहानपणीं ज्या दादोजीनें बांधविलेल्या राजमहालांत राहत असे तेथें मुक्काम करून तसेंच शहराभोंवतीं चौफेर चौक्यापहारे ठेऊन व कडेकोट बंदोबस्त करून राहिला. त्यानें आपल्या सैन्यांतील मराठे पायदळ तेवढें ठेऊन मराठे घोडेस्वार कमी केले, व परवाना घेतल्याशिवाय हिंदूंना पुण्यांत शिरण्याची किंवा बाहेर जाण्याची सख्त मनाई केली. शिवाजी ह्याच घरांत वाढला असल्यामुळें त्याला त्या घराची बारकाईची माहिती

होती. शिवाजीनें आपले विश्वासु मित्र येसाजी व तानाजी आणि दोनशें निवडक शिपाई ह्यांसह पायदळ शिपायांच्या वेषानें शहरांत जाऊन कोतवाला पासून एका लग्नाच्या मिरणुवकीसाठीं म्हणून परवाने मिळविले. नंतर एका मुलाला वराच्या वेषानें घोड्यावर बसवून वाजत गाजत मिरवणूक काढून आपण स्वतः आपल्या साथीदारांसह शहरांत घुसला; व दुसरीकडून आपल्या एका तुकडीला पायदळ शिपायांच्या वेषांत कांहीं मराठे कैदी पकडल्याचें व त्यांना मारीत मारीत नेण्याचें मिष करून शहरांत घुसवून दिलें. जर दुर्दैवानें बेत फसला व पळ काढण्याचा वेळ आला तर आपलें रक्षण व्हावें ह्यासाठीं पिछाडीला पुण्याच्या आसपास ठिकठिकाणीं त्यानें आपले हजरों शिपाई दबा धरून बसवून ठेविले होते. अशा रीतीनें तज वीज करून शहरांत शिरल्यावर शहरांतील महत्वांचीं नाकीं आपल्याबरोबर असलेल्या शिपायांनीं रोंकून ठेवून मध्यरात्रींच्या वेळीं माळ्याला लांच देऊन तानाजी, एसाजी व दुसरे वीस निवडक साथीदार ह्यांसह शिवाजीनें राजमहालाच्या बागांत प्रवेश केला, व तेथून स्वयंपाकगृहांत शिरून स्वैंपाक्यांची कत्तल उडवून भिंत फोडून ज्या खोलींत शाइस्तेखान निजला होता त्यांत शिरला, व खानावर हल्ला केला. खानाचा मुलगा अबदुल फत्तेखान ह्यानें फार शौर्यानें व धैर्यानें पुढें सरून दोन तीन मराठ्यांस ठार करून खानाच्या बचावाचा प्रयत्न केला, त्यांत फत्तेखान मारला गेला. शाइस्तेखान पळून जात असतां त्याच्यावर वार झाला, परंतु त्यानें फक्त त्याचें बोट तुटलें व तो निसटला. इतक्यांत शाइस्तेखानासारखाच एक उमराव खिडकींतून

उडी मारून जात असतां त्याच्यावर मराठे तुटून पडून त्यांनीं त्याचा वध केला. शाइस्तेखान मारला गेला अशी सर्वांची कल्पना झाली. शिवाजी आपल्या साथीदारांसह निसटून पुण्याबाहेर गेला व ठिकठिकाणीं ठेविलेली आपली फौज एकत्र करून पाठलाग करणाऱ्या शत्रुसैन्यास चकविण्यासाठीं कात्रज घाटाकडे कूच करून तेथें झाडांना मशाली बांधून त्या पेटवून परत सिंहगडाकडे मोर्चा फिरवून तेथें सुखरूप येऊन दाखल झाला. पेटत्या मशालींनीं शत्रूंला चकविल्यामुळें त्यांचे पाठलाग करण्याचे प्रयत्न निष्फळ झाले.

पुढें शाइस्तेखानानें आपणाजवळ तोफा व दारूगोळा नसतांनाही सिंहगडावर छापा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्याच्या सैन्याची फार खराबी होऊन त्याला हार खावी लागली, व पुण्याकडे परत हटावें लागलें. परत हटतांना प्रतापराव गुजरानें आपल्या घोडेस्वारांनिशीं त्याच्या सैन्याच्या पिछाडीवरून हल्ले करून त्याला हैराण केलें. अशा रीतीनें सर्व बाजूंनीं हैराण झाल्यामुळें हताश होऊन त्यानें आपणास परत बोलवून घेण्यास औरंगजेबास विनंति केली. औरंगजेबानें त्याला परत बोलाविलें, व त्याच्या जागीं (इ. स. १६६३) आपला शाहाजादा मुआजीम याला नेमिलें. मुआजीम येऊन पोहोंचे पर्यंत शाइस्तेखानाच्या हाताखालीं काम करणारा सरदार जसवंतसिंग हा सिंहगडच्या पराजयानें व त्याबद्दल औरंगजेबानें शाइस्तेखानाच्या सांगण्यावरून त्याला दोष दिल्यामुळें स्वस्थ बसला होता.

ह्या अवधींत शिवाजीनें मोगल बादशाहावर सरशी करण्याची एक फार उत्तम योजना केली. मोगलांच्या ताब्यांतील गुजराथेंत

सुरत शहर फार सधन व व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. त्या ठिकाणीं पोर्तुगीज, डच व इंग्रज ह्यांनीं मोठमोठ्या वखारी बांधून व्यापार चालविल्यामुळें त्याची शिवाजीच्या वेळीं फारच भरभराट झाली होती. ह्या शहरावर हल्ला करून लुटण्याची शिवाजीनें योजना केली. ही योजना त्यानें इतक्या बेमालूम व बिनतोडपणानें केली कीं सुरतवर प्रत्यक्ष छापा घालीपर्यंत तिचा कोणालाही सुगावा लागला नाहीं. त्यानें पोर्तुगीजांच्या वसईच्या ठाण्यावर चाल करण्याची हूल उठवून स्वतः चार हजार शेलक्या घोडेस्वारांसह गुप्त रीतीनें पूर्वीं पाहणी करून ठेविलेल्या रस्त्यानें धरमपुरच्या हद्दींतून चाल करून इ. स. १६६४ च्या जान्युआरीच्या ५ व्या तारीखेस शिवाजी सुरतेहून बारा मैलांवर येऊन थडकला, व एकदम सुरतेवर चालून गेला. तेथील डच, व इंग्रज गव्हर्नर आपआपल्या वखारींत कडेकोट बंदोबस्त करून राहिले. मोगल सुभ्यानें शिवाजीचें सामोपचाराचें बोलणें न जुमानतां तसेंच नागरिकांच्या संरक्षणाची तरतूद न करतां किल्ल्यांत दडी मारिली. लोक घाबरून गलबतांतून पळून गेले. शिवाजीनें शहर लुटून फस्त केलें. शिवाजीनें डच आणि इंग्रज ह्यांच्यापासून दंडा दाखल रकम मागितली, ती त्यांनीं देण्याचें नाकारिलें. त्यांस दंड देण्यास भाग पाडण्याची तजवीज शिवाजी करीत होता, इतक्यांत शहराच्या रक्षणासाठीं मोठें मोगल लश्कर चालून येत आहे अशी त्याला खबर लागतांच त्यानें सर्व मिळविलेली लूट सुरतच्या नागरिकांच्या घोड्यांच्या पाठीवर लादून झपाट्यानें परत कूच केलें व रायगडास सुरक्षित जाऊन पोहोंचला.



शाहाजी राजे.

सुरतेहून परत आल्यावर थोड्याच दिवसांत त्याला शाहाजीच्या मृत्यूची खबर मिळाली. शिवाजीला भेटून परत गेल्यावर दक्षिणेंतील सरदारांची बंडाळी मोडण्यांत शाहाजी गुंतला होता तेथें तुंगभद्रेच्या कांठीं इ. स. १६६४ त छावणींत असतांना एक दिवस शिकारीवर गेला असतां घोड्यावरून पडून शाहाजी मरण पावला. व्यंकोजीनें त्याची उत्तरक्रिया केली. विजापुरच्या दरबारीं ही खबर लागतांच बादशाह फार हळहळला, व शाहाजीनें एकनिष्ठेनें मोठ्या पराक्रमानें व मर्दुमकी गाजवून विजापुर दरबाराचें जें हित व जी कामगिरी केली होती, तें सर्व स्मरून बादशाहानें शाहाजीची बेंगलोर व तंजावरची जहागिर त्याचा पुत्र व्यंकोजी ह्याला देऊन शाहाजीच्या कामगिरीची बूज केली. ही बातमी कळली तेव्हां शिवाजीला व जिजाबाईला अत्यंत दुःख झालें. जिजाबाईनें तर सति जाण्याची तयारी केली. परंतु महाप्रयासानें आरंभिलेलें स्वराज्यस्थापनेचें पवित्र काम तिच्या प्रेरणे शिवाय तडीस जाणें शक्य नाहीं ही जाणीव तिला करून देऊन शिवाजीनें विनवणीनें तिचें मन वळवून तिच्याकडून सति जाण्याचा विचार सोडून देवविला. ज्या दक्षिणेंतील सरदारांची बंडाळी पर्यायानें शाहाजीच्या मरणाला कारण झाली त्याच्यावर शिवाजीनें एक मोठें सैन्य पाठवून त्यांच्यापासून दंडादाखल मोठी खंडणी घेऊन आपल्या पित्याच्या मरणाबद्दल सूड घेतला. ज्या गांवीं शाहाजी मरण पावला तें गांव विजापुर दरबारानें शिवाजीला इनाम दिलें. तेथें शिवाजीनें स्वतः जाऊन शाहाजी

मरण पावला त्या ठिकाणीं छत्री बांधविली व मुबलक द्रव्य खर्चून दानधर्म केला.

शाहाजीच्या मरणानंतर शिवाजीनें राजा ही आपली वंशपरंपरेची पदवी धारण करून रायगडावर एक टंकसाळ स्थापून आपल्या नावांचें सोन्याचें व तांब्याचें नाणें पाडवून आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. नंतर त्यानें आपल्या मालवण बंदरांतील आरमाराच्या साह्यानें मोगलांच्या बंदरांतून जाणारीं गलबतें लुटण्याचा सपाटा लाविला. त्यांत एक मक्केला जाणाऱ्या यत्रेकरूंचें गलबत लुटलें गेल्यामुळें मोगल व विजापुरच्या बादशाहाला राग येऊन विजापुर दरबारानें कोंकणावर सैन्य पाठविलें. परंतु त्याला शिवाजीनें हटवून लाऊन थेट गोकर्णापर्यंत विजापुरच्या ताब्यांतील बंदरें लुटलीं, व मोगल सैन्य चाल करून येईल असें त्याला वाटल्यामुळें एकदम कूच करून तो रायगडावर दाखल झाला.

शिवाजीचा अंदाज खरा ठरला. औरंगजेबानें दिलेरखान व जयसिंग ह्या दोन कसलेल्या रणधुरंधर सेनापतींबरोबर मोठमोठ्या फौजा देऊन शिवाजीच्या मुलखावर स्वारी करण्यासाठीं रवाना केलें. एके बाजूनें दिलेरखानानें चाल करून जाऊन पुरंदराला वेढा दिला व दुसरीकडून जयसिंगानें सिंहगडाची नाकेबंदी करून घेरून घेतलें. पुरंदरचा शिवाजीचा किल्लेदार मुरार बाजी मोठ्या शौर्यानें लढून किल्ल्याचा बचाव करीत होता. एकदां तर त्यानें दिलेरखानाच्या सैन्याची पुष्कळ दाणादाण करून त्याला मागें हटविलें; परंतु त्यांत त्याला गोळी लागून तो पडला. त्यामुळें पुरंदरच्या खालच्या

किल्यांतील सैन्य तो किल्ला सोडून वरच्या किल्याचा आश्रय करून राहिलें. दिलेरखान ानें तो किल्ला सर केला एवढेंच नाहीं पण थोड्याच दिवसांत त्याच्या शेजारचा अभेद्य मानलेला रुद्रमाळ किल्लाही घेतला. ह्यामुळें शिवाजीला चिंता उत्पन्न होऊन त्यानें तहाची मसलत करण्यासाठीं जयसिंगाकडे आपला वकील रघुनाथपंत ह्यास पाठविला. जयसिंगानें शिवाजीला भेटण्यास बोलविलें. शिवाजी एक हजार घोडेस्वारानिशीं जयसिंगाकडे जाऊन त्याला भेटला. जयसिंगानें शिवाजीचें योग्य सत्कारानें स्वागत करून सल्लामसलत झाल्यावर दिलेरखानाची गांठ घेण्यास शिवाजीला सुचविलें. त्याप्रमाणें शिवाजीनें दिलेरखानाची भेट घेतली. उभयतांनीं लढाई बंद केली, आणि शेवटीं पुष्कळ वाटाघाट होऊन असें ठरलें कीं, शिवाजीनें जिंकिलेला मोगलाई मुलूख, अहमदनगरचे पुरातन बारा खेरीजकरून बाकीचे सर्व किल्ले व परगणे मोगल बादशाहाला परत द्यावे, विजापुरचा जिंकलेला सर्व मुलूख शिवाजीनें ठेवावा, मोगलबादशाहाचें वर्चस्व कबूल करावें, विजापुरच्या मुलुखांत चौथ व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क शिवाजीकडे राहून त्याच्या मोबदल्यांत त्यानें बादशाहाला मोठी रकम तीन हप्त्यांनीं भरावी, विजापुरचें राज्य खालसा करण्यांत जयसिंगास शिवाजीनें मदत करावी, आणि शिवाजीचा मुलगा संभाजी ह्यानें बादशाहाच्या नोकरींत पंचहजाऱ्याची जागा घ्यावी. औरंगजेबानें शिवाजीला पुष्कळ दोष देऊन ह्या अटी मेहेरबानी दाखल म्हणून मंजूर केल्या.

विजापुर व गोळकोंडा काबीज करण्याची औरंगजेबाची फार

इच्छा होती. त्यानें जयसिंग व दिलेरखान ह्यांस विजापुरच्या मुलखावर स्वारी करण्याचें फरमान केलें. तहांत ठरल्याप्रमाणें शिवाजी दहा हजार फौज घेऊन त्यांच्या मदतीस गेला. एकीकडून शिवाजीनें चाल करून विजापुरच्या ताब्यांतला कोंकणचा मुलूख, फलटनच्या निंबाळकरांची जहागीर व तठवाडा किल्ला हीं काबीज केलीं. दुसरीकडून जयसिंग व दिलेरखान खुद्द विजापुरावर चालून गेले. त्यांनीं विजापुराला वेढा घातला. मध्यंतरीं शिवाजीनें बजाविलेल्या कामगिरी बद्दल त्याला शाबसकी देऊन त्याला एक सुंदर रत्नजडित तरवार व नंतर कांहीं दिवसांनीं एक बहुमानाचा पोषाख पाठवून पत्र लिहून औरंगजेबानें त्याला आपल्या भेटीस बोलाविलें व त्याच्या मर्जीस वाटेल त्या वेळीं सुखरूप परत पाठविण्याचें वचन दिलें. शिवाजीनें जयसिंगाची गांठ घेऊन त्याची सल्ला घेतली. त्यानें शिवाजीला आश्वासन देऊन त्याच्याबरोबर जाण्यासाठीं आणि त्याच्या सुरक्षिततेची हमी घेण्याच्या इराद्यानें आपला मुलगा रामसिंह ह्यास शिवाजीबरोबर पाठविण्याचें कबूल केलें. शिवाजी राज्यकारभाराचें सर्व काम जिजाबाई व आपले विश्वासु कामदार ह्यांच्यावर सोंपून आपल्याबरोबर आपला मुलगा संभाजी व आपले विश्वासु मित्र येसाजी व तानाजी आणि आपले साथीदार प्रतापराव गुजर, रघुनाथपंत कोरडे, हिराजी फरजंद, त्रिंबकपंत डबीर व बाळाजी आवाजी आणि तीन हजार घोडेस्वार व एक हजार पायदळ ह्यांसह औरंगजेबाचे भेटीस जाण्यास निघाला, व आग्र्यास जाऊन पोहोंचला. आपणांस बादशाहाकडून कोणी मोठा अमलदार सामोरा येईल ह्या

आशेनें औरंगजेबाच्या राजधानीपासून थोड्या अंतरावर त्यानें मुक्काम केला. कित्येकांच्या मतें ही मुलाखात दिल्लीस झाली, व कित्येक असें प्रतिपादितात कीं ती आग्रा येथें झाली. अलीकडे खुद्द शिवाजीनें लिहिलेलें एक पत्र उपलब्ध झालें आहे त्यावरून ही भेट आग्र्यास झाली असावी असें वाटतें. कोणीही आपणांस सामोरें येत नाहीं असें पाहून शिवाजीनें आपण आल्याची खबर बादशाहास दिली. त्यानें एक सामान्य अमलदार पाठवून शिवाजीला पाचारण केलें. पुढें शिवाजी दरबारांत दाखल झाला तेव्हां औरंगजेबानें त्याला पंच हजाऱ्यांमध्यें स्थान दिलें. ह्यामुळें शिवाजीला राग येऊन तो दरबारांतून निघून गेला.

परंतु मुक्कामावर गेल्यावर आपण नजरकैदेंत आहों असें त्याला दिसून आलें. आपणास जाण्यास बादशाहानें दिलेल्या वचनाप्रमाणें रजा द्यावी म्हणून शिवाजीनें पुष्कळ खटपट केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. रामसिंगानेंही पुष्कळ रदबदली केली पण तिचाही उपयोग झाला नाहीं. उलट, शिवाजीला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवण्याचा बादशाहाचा घाट आहे अशी त्याला कुणकुण लागली. अशा प्रकारच्या अत्यंत भयंकर व नाजूक स्थितींत शिवाजी येऊन पडला. तथापि त्याचें प्रसंगावधान सुटलें नाहीं. त्यानें पळून जाण्याची एक अपूर्व युक्ति केली. बादशाहाला जराही संशय न यावा म्हणून त्यानें आपल्या बरोबरची सर्व फौज परत रवाना करण्याची परवानगी मागितली ती अर्थात् मोठ्या खुशीनें बादशाहानें दिली. तसेंच येथेंच राहण्याचा आणि आपले कुटुंबालाही

आणण्याचा आपला विचार असल्याचें शिवाजीनें जाहीर केलें. पुढें शिवाजीनें आपल्या अमीरउमराव वगैरे इष्टमित्रांना मेवामिठाई इत्यादि भेटी पाठविण्याची परवानगी मिळवून मोठमोठे करंडे पाठविण्याचा सपाटा लाविला. प्रथम प्रथम शिवाजीवर देखरेखीसाठीं ठेविलेला अधिकारी पोलादखान करंडे जाऊं देण्यापूर्वी तपासी परंतु पुढें त्यांत मेवामिठाईशिवाय दुसरें कांहीं नसतें असें पाहून त्यानें तपासणी करण्याचें सोडून दिलें. नंतर थोड्याच दिवसांनीं आपण आजारी पडल्याचें शिवाजीनें ढोंग केलें. कांहीं दिवसांनीं बरा झाल्याबद्दल आनंद दर्शविण्यासाठीं त्यानें भेटीचे करंडे अधिक पाठविण्याचें सुरूं केलें. तसेंच ह्या खुशालीबद्दल ब्राम्हणांस दान देण्यासाठीं म्हणून तीन उत्तम घोडे खरीद करून मथुरेकडे रवाना करून दिले. शेवटीं एक दिवशीं आपण व संभाजी असे दोन करंड्यांत बसून, आपल्या जागीं आपला निमकहलाल सेवक हिराजी फरजंद ह्याला निजवून, शिवाजी सटकला, आणि जेथें त्याच्यासाठीं घोडे तयार होते तेथें जाऊन पोहोंचला. नंतर लगेच तो व संभाजी घोड्यावर बसून अतिशय त्वरेनें मथुरेस जाऊन पोहोंचले

मथुरेस वेष पालटून बैराग्याचा वेष धारण करून तो काशीस गेला व तेथून पाठलाग चुकाविण्यासाठीं प्रयाग, गया व तेथून इंदूरचा रस्ता गांठून पुण्यास सुखरूप पोंचून जिजाबाईला भेटला. त्या वेळीं त्या वीरमातेला केवढा आनंद झाला असेल त्याची कल्पना सहज करतां येईल. शिवाजी सुखरूप परत आल्याची बातमी वाऱ्या सारखी पसरली व जिकडेतिकडे

आनंदीआनंद होऊन सह्याद्रींतील सर्व किल्ल्यांतून तोफांची एकदम सरबत्ती होऊन त्याचें आगमन जाहीर झालें. परंतु संभाजी लहान असून त्याच्याच्यानें एवढ्या लांब मुशाफरीचे श्रम सहन होणें शक्य नसल्यानें शिवाजीनें त्याला काशीजी त्रिमल व त्याचे दोन भाऊ ह्या विश्वासु ब्राम्हणांस सोंपिलें होतें. त्यांनीं व त्यांच्या आईनें संभाजीचें संरक्षण करून त्याला शिवाजीकडे सुखरूप पोंचवून दिलें, त्याबद्दल त्या तिघां भावांना विश्वासराव ही पदवी व मोठमोठीं इनामें शिवाजीनें दिलीं. अशा रीतीनें शिवाजीनें आपल्या अपार व विलक्षण बुद्धिचातुर्यानें औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन मोठ्या शिताफीनें आपली सुटका करून घेतली, ( इ. स. १६६६ ). शिवाजी परत आला त्या वेळीं एक फार मजेचा प्रकार घडला. शिवाजीला औरंगजेबानें कैदेंत ठेवि-ल्यामुळें शोकाकुल व चिंताग्रस्त होऊन एक दिवस जिजाबाई राय-गडावर बसली होती. तिच्यापुढें एक बैरागी एकदम येऊन उभा राहिला. तूं कोण आहेस व येथें कां आला आहेस, असें त्याला जिजाबाईनें विचारलें. शिवाजीनें लागलीच आपला बैरागीवेष काढून टाकून खरें स्वरूप प्रकट केलें. जिजाबाईला अत्यानंद होऊन तिनें शिवाजीला एकदम मिठी मारिली.

शिवाजी आपल्या हातावर तुरी देऊन निसटला ही गोष्ट औरं-गजेबाला कळतांच त्यानें त्याचा पाठलाग करण्यासाठीं सर्व ठिकाणीं हेर पाठवून तजवीज चालविली. परंतु त्याला पत्ता लागला नाहीं. इकडे शिवाजी परत येऊन त्यानें औरंगजेबाच्या ह्या विश्वास-घातकी वर्तनाबद्दल सूड घेण्याची तयारी चालविली.

शिवाजी अटकेंत होता त्या अवधींत विजापुरच्या अल्ली अदिलशाहानें गोवळकोंड्याच्या मदतीनें मोगल सैन्याला हैराण करून त्यास परत हटावयास भाग पाडिलें. जयसिंग नाराज होऊन त्यानें आपणास परत बोलावून घेण्याची मागणी केली. त्याप्रमाणें औरंजेबानें त्याला परत बोलाविलें. परंतु तो रस्त्यांतच इ. स. १६६७ त बऱ्हाणपुरास मरण पावला. इकडे शिवाजीनें मोगल बादशाहास दिलेला सर्व कोंकण प्रांत पुन्हां काबीज केला, आणि लोह-गड, सिंहगड व पुरंदर ह्यांशिवाय सर्व देश पुन्हां हस्तगत केला. औरं-गजेबानें आपला पुत्र मुआजीम ह्यास दक्षिणचा सुभा नेमून त्याच्या हाताखालीं जयसिंगाच्या जागीं जोधपुरचा राजा जसवंतसिंग ह्यास नेमिलें. जसवंतसिंगाशीं शिवाजीनें दिल्लीस दोस्ती केली होती त्यामुळें त्याला शिवाजीविषयीं सहानुभूति वाटत होती. शेवटीं उभय पक्ष युद्धास कंटाळून इ. स. १६६८ त तह झाला. त्यांत औरंगजेबानें शिवाजीला राजा म्हणून मान्य करून संभाजीची पांच हजारांची मनसब चालू केली; आणि कोंकणचा संपूर्ण कबजा, अहमदनग-रच्या मुलखांतील शिवाजीच्या हक्काच्या भागाबद्दल वऱ्हाडची जहागीर, आणि सिंहगड व पुरंदर ह्यांखेरीज पुणें, सुपें व चाकण हा मुलूख शिवाजीला परत दिला. ह्याच्या मोबदल्यांत शिवाजीनें विजापुर काबीज करण्यांत औरंगजेबाला मदत करण्याचें कबूल केलें. ह्या तहाप्रमाणें शिवाजीनें प्रतापराव गुजराबरोबर सैन्य देऊन मुआजीमच्या मदतीस पाठविलें. विजापुरचा बादशाह शरण येऊन त्यानें मोगलांशीं तह केला त्यांत शिवाजीला चौथ व सरदे-शमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला.

असे जरी करार मदार झाले तरी सुद्धां औरंगजेबानें दगलबाजीचा प्रयत्न करण्याचें सोडिलें नाहींच. त्यानें मुआजीमला गुप्त पत्र लिहून शिवाजी व त्याचा औरंगाबादेस असलेला प्रतिनिधी प्रतापराव गुजर ह्यांस पकडून पाठवून देण्यासाठीं फरमान केलें. परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उलट प्रतापरावाच्या हाताखालील घोडदळ मोगलांच्या खर्चानें पुष्ट झालें होतें त्याचा मोगलांविरुद्ध उपयोग करण्यास शिवाजीला फावलें.

प्रतापगडावर असतां एके दिवशीं सकाळीं जिजाबाई वेणी फणी करीत बसली होती तिची नजर प्रभातकलीन सूर्याच्या प्रकाशानें देदीप्यमान भासणाऱ्या सिंहगडाकडे गेली, आणि सिंहगड शिवाजीनें हस्तगत करावा अशी तिला फार इच्छा झाली. तिनें शिवाजीला ताबडतोब रायगडावरून बोलावून आणून सिंहगड हस्तगत करण्यास सांगितलें. पुष्कळ वाटाघाट होऊन शिवाजीनें तिचें ह्मणणें मान्य केलें व त्यानें तानाजीवर ती कामगिरी सोंपण्यासाठीं त्याला बारा हजार फौज घेऊन एकदम बोलाविलें. तानाजी आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारींत गर्क झाला होता. परंतु आपल्या धन्यानें बोलाविलें सबब त्याची आज्ञा मान्य करणें हें आपलें श्रेष्ठ कर्तव्य आहे, असें त्या स्वामीनिष्ठ व कर्तव्यदक्ष तानाजीला वाटून त्यानें लग्नाची तयारी बाजूस ठेवून एकदम कूच केलें. अहाहा, केवढी ही कर्तव्यपरायणता ! इंग्लदच्या जगत्प्रसिद्ध नौकासेनापति नेल्सनच्या कर्तव्यपरायणते इतकीच, किंबहुना अधिक, ही तानाजीची कर्तव्यपरायणता नव्हे काय ! तानाजी एक-

दम आपल्या धन्यापुढें हाजर झाला. शिवाजीनें त्याला प्रेमानें शाबासकी दिली, व जिजाबाईनें तर त्याला आरती ओंवाळून त्याचें स्वागत केलें, व सिंहगड जिंकण्यासाठीं जाण्यास सांगितलें. तानाजी आपल्या सैन्यासह सिंहगडावर चालून गेला व त्यानें गडाला वेढा दिला. गड अभेद्य असल्यामुळें पुष्कळ छापे घालूनही गडाचा किल्लेदार उदेभाण ह्याच्या बहादुरीमुळें तानाजीला फारसें यश मिळालें नाहीं. शेवटीं तानाजीनें निकराचा हल्ला केला, परंतु त्यांत तो दुर्दैवानें मारला गेला, व त्यामुळें त्याच्या फौजेचा धीर सुटून सर्व प्रयत्न निष्फळ होण्याची वेळ आली. इतक्यांत उदेभाणही ठार झाला, व तानाजीचा भाऊ सूर्याजी ह्यानें सैन्याला धीर व उत्तेजन देऊन पुन्हां हल्ला केला. गडाचा कल्याण दरवाजा तोडून सैन्यानें आंत प्रवेश केला व शेवटीं किल्ला पडला. सिंहगड जिंकल्याची व त्याबरोबरच तानाजी मेल्याची बातमी मिळाली तेव्हां किल्ला जिंकल्याबद्दल शिवाजीला जितका आनंद झाला, तितकेंच तानाजीच्या मृत्युबद्दल त्याला दुःख झालें, व त्यानें ‘ गड हातीं आला, पण सिंह गेला ! ” असे उद्गार काढिले. सिंहगड तानाजीच्या शौर्याचें, साहसाचें व उज्ज्वल कर्तव्यपरायणतेचें उत्तम स्मारकच होय असें कोण म्हणणार नाहीं ! पुढें लवकरच पुरंदर जिंकून शिवाजीनें आपलें जन्मस्थान जो शिवनेर किल्ला तो जिंकण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. तेव्हां शिवाजीनें पुन्हां जंजिरा घेण्याचा विचार करून आपलें आरमार व भूमीवरचें सैन्य सज्ज करून जंजिऱ्यावर दोन्हीं बाजूंनीं चाल केली. फत्तेखान हताश

होऊन शरण येणार इतक्यांत त्याच्या हाताखालच्या तीन शिद्दी बंधूंनीं त्याच्यावर एकदम उठून त्याला कैद केलें व मोगलांशीं कारस्थान करून त्यांच्या आरमाराच्या मदतीनें शिवाजीला परत हटवून लाविलें.

असें एकामागून एक दोन वेळां यश मिळालें नाहीं, तरीसुद्धां निरुत्साह न होतां मोगलांनीं शिद्दीला केलेल्या मदतीबद्दल त्यांना शासन करण्यासाठीं शिवाजी एकदम सुरतेवर इ. स. १६७० त चाल करून गेला. नागरिक भिऊन पळाले. मोगल सुभेदार नेभळटपणानें आपल्या किल्ल्यांत दडी मारून बसला. इंग्रज, डच, व फ्रेंच हे आपआपलें संरक्षण करण्यासाठीं सज्ज झाले. त्या वेळीं सुरतेस काशगरचा राजा पळून आला होता. तो फार श्रीमान होता ह्मणून शिवाजीनें त्याच्यावर हल्ला करून त्याला पळवून लावून त्याची सर्व मालमत्ता लुटली. शिवाजीनें इंग्रज वखारीवर तीन हल्ले करून त्यांना तह करण्यात भाग पाडिलें. इंग्रजांचा वकील शिवाजीच्या भेटीला गेला तेव्हां त्याचा शिवाजीनें योग्य सत्कार केला व इंग्रजांशीं सदैव मैत्री ठेवण्याची आपली इच्छा व्यक्त करून त्याची परत बोळवण केली. नंतर सर्व लूट जमा करून शिवाजी परत निघाला. सुरतेवर केलेल्या पहिल्या हल्ल्यानंतर शिवाजी धरमपुर संस्थानांतून कोंकणांत परत गेला होता. ह्या वेळीं सुरतेहून सरळ औरंगाबादेकडे जाण्याच्या हेतूनें तो साल्हेरच्या बाजूने जाण्यास निघाला. शिवाजीच्या ह्या लुटीची खबर मिळतांच मोगल बादशाहानें त्याच्या सैन्याला पिछाडीकडून

हैराण करण्यासाठीं एक सैन्य पाठवून, दुसरें एक मोठें सैन्य नाशिकच्या घाटांत त्याचा रस्ता रोंकून ठेवण्यासाठीं पाठविलें. हें जाणून शिवाजीनें आपली लूट तिसऱ्याच रस्त्यानें पाठवून दिली, आणि पिछाडीला फिरून मोगल सैन्याची दाणादाण करून, अतिशय त्वरेनें नाशकाच्या घाटाकडे मोर्चा फिरविला व तेथें असलेल्या मोगल सैन्यावर हल्ले करून त्याचा धुव्वा उडविला. अशा रीतीनें विजय मिळवून आपल्या सैन्यासह शिवाजी सुखरूप रायगडावर पोंचला.

सुरतेस मिळविलेल्या करोडों रुपयांच्या लुटींतून शिवाजीनें तीस हजार नवीन फौज, व एक प्रबळ आरमाराचा काफिला व सैन्य तयार केलें, व सर्व गुजराथच्या दर्याकिनाऱ्यावरून चाल करून भडोंचपर्यंत पाठविलें. भडोचची सुरते सारखी स्थिति न व्हावी म्हणून गुजराथेंतील सर्व मोगल सैन्य भडोचच्या रक्षणासाठीं एकत्र करण्यांत आलें. शिवाजीला हेंच पाहिजे होतें. त्यानें लगेच खानदेशांत लश्कर घेऊन जाऊन औंध, पट्टा, त्रिंबक व साल्हेर हे किल्ले काबीज करून सर्व खानदेश लुटून उध्वस्त केला. इकडे दुसऱ्या बाजूनें मोरो पिंगळे यानें नाशकाच्या घाटांतून उतरून जव्हार संस्थान काबीज करून कोलवणांतून पुष्कळ खंडणी उघरविली. नंतर शिवाजी (इ. स. १६७१) सह्याद्रीच्या वाटेनें परत फिरला, व जातांना प्रत्येक गांवच्या पाटलाकडून चौथ भरण्याची कबुलायत घेत गेला, व अशा रीतीनें मोगलांच्या मुलखांतून चौथ घेण्यास सुरुवात केली.

ह्या सर्व अनर्थाची खबर लागतांच औरंगजेबानें जसवंतसिंगाला परत बोलावून त्याच्या जागीं प्रख्यात लढवय्या महाबतखान ह्याला चाळीस हजार फौज देऊन खानदेशांत पाठविलें. त्यानें औंध व पट्टा हे किल्ले घेऊन इ. स. १६७२ च्या आरंभाला साल्हेरला वेढा दिला. शिवाजीनें मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर ह्यांना दोन बाजूंनीं साल्हेरच्या लश्कराच्या मदतीस पाठविलें. त्याच्या फौजा एकत्र न होऊं देण्यासाठीं महाबतखानानें इकलास खान नामक सरदारास मोठें सैन्य देऊन पाठविलें. परंतु मराठा फौजेपुढें मोगल सैन्याचा टिकाव लागला नाहीं, व त्याचा पूर्ण पराभव होऊन त्याची दाणादाण झाली. ह्यांत साहा हजार घोडे, सव्वाशें हत्ती, मुबलक जवाहीर व रोकड शिवाजीच्या हातीं लागलें. महाबतखानासारख्या कसलेल्या बहाद्दर सेनानायकाच्या नेतृत्वाखालील प्रबळ मोगल सैन्याशीं खुल्या मैदानांत लढून त्याची दाणादाण व नाश करून शिवाजीला जो हा जय मिळाला, त्यामुळें शिवाजीच्या प्राबल्याचीच नव्हे परंतु खुल्या मैदानांत लढण्याच्या मराठ्यांच्या कौशल्याची व सामर्थ्याची सर्वत्र कीर्ति पसरून वाहवा झाली, व देशांतील सर्व भागांतून हजारों शिपाई शिवाजीच्या पदरीं राहण्यासाठीं येऊं लागले.

ह्यानंतर इ. स. १६७२ त शिवाजीनें कोळवणांतील कोळी संस्थानिकांकडून जरूर पडेल तेव्हां आपणांस सैन्याची मदत देण्याचें कबूल करवून घेऊन त्यांना करारनामे करण्यास भाग पाडिलें. नंतर पोर्तुगीजांच्या दमण व साष्टी ह्या ठाण्यांवर त्यानें हल्ले केले.

त्यांत त्याला फारसें यश मिळालें नाहीं. ह्या हल्ल्यांमुळें नुकतेंच मुंबईबेट संपादन करून तेथें आपलें ठाणें व बखारी करीत असलेल्या इंग्रजांस भीति वाटून त्यांनीं शिवाजीशीं तहाचें बोलणें लाविलें. परंतु त्याचा निकाल न लागून ती गोष्ट बरेच दिवस तहकूब राहिली.

इकडे साल्हेरच्या पराभवानें व अरिष्टानें औरंगजेब रागावला व त्यानें महाबतखान व मुअाजीम ह्यांस परत बोलावून गुजरातच्या खानजहान बहादुरास दक्षिणचा सुभा नेमिलें. त्यानें मराठ्यांशीं लढण्याचें बंद करून खानदेशाची नाकेबंदी करण्यास सुरवात केली. इकडे शिवाजीनें अहमदनगर व औरंगाबाद ह्यांच्यामधील सर्व मुलूख लुटून उध्वस्त केला. नंतर गोळकोंड्याचा सुलतान कारोमांडल किनाऱ्यावरील फ्रेंचयांशीं लढण्यांत गुंतलेला असतां शिवाजीनें मोठ्या सैन्यानिशीं त्याच्या राजधानी हैदराबादेवर चाल केली व शहराला वेढा घातला. सुलतानाला शरण जाणें भाग पडून त्यानें मोठी खंडणी शिवाजीला देऊन अरिष्ट टाळिलें. शिवाजी विजयी होऊन पुन्हा रायगडावर परत आला.

शिवाजी इकडे गुंतला असतां जंजिऱ्याकडे त्याच्या सैन्यावर मोठें अरिष्ट आलें. जंजिऱ्याच्या शिद्दीनें ह्या संधीचा फायदा घेऊन मोगल नौकासैन्याच्या मदतीनें दंडा राजपुरीच्या शिवाजीच्या बंदरावर अकस्मात छापा घालून शिवाजीच्या पुष्कळ जहाजांचा नाश करून दोनशें मराठे कैद केले. नंतर त्यानें दंडा राजपुरीच्या किल्ल्यावर जमिनीकडून व समुद्राकडून हल्ला केला. किल्ला पडला. शिद्दीनें मराठा लष्कराचीच नव्हे परंतु सर्व हिंदूंची निर्दयपणानें

कत्तल करून त्यांच्या बायकापोरांस मुसलमान करून गुलाम करून नेलें.

ह्याच सुमारास म्हणजे इ. स. १६७२ च्या अखेरीस विजापुरचा अली अदिलशाह मरण पावला. त्याच्याशीं केलेल्या करारांचें आतां बंधन राहिलें नाहीं असें मानून शिवाजीनें पन्हाळा पुन्हां हस्तगत केला, व धारवाडांतील प्रसिद्ध हुबळी शहरावर हल्ला करून तें लुटलें. ह्या व्यापारी शहरांतून त्याला अपार द्रव्य मिळालें. त्यांत इंग्रज वखारही लुटली गेली. इंग्रजांनीं शिवाजीकडे फिर्याद केली. पुष्कळ वाटाघाट होऊन शिवाजीनें तो लढा मिटविला. परंतु ह्याच संधीस विजापुरच्या कारवारच्या सुभ्यानें बंड केलें, आणि फ्रेंच व इंग्रज ह्यांच्या वखारी लुटल्या. शिवाजीनें विजापुर दरबारच्या कमकुवतपणाचा लाभ घेण्यासाठीं तयारी केली. मोगलांकडून त्रास होऊं नये म्हणून त्यानें मोगल सुभ्यास लांच देऊन तटस्थ केलें, आणि विजापुरच्या मुलखावर जमिनीवरून व समुद्रमार्गानें स्वारी केली. कारवारच्या बंड उभारलेल्या सुभ्याला हुसकून लावून शिवाजीनें अंकोला व कारवार हीं लुटलीं, आणि बेदनूरच्या राजाला आपणास खंडणी देण्यास भाग पाडिलें. ह्याबरोबरच शिवाजीनें दुसरीकडून जावळीच्या मार्गानें सैन्य पाठवून परळीचा किल्ला सर केला व नंतर सातारा, चंदन, वंदन, पांडवगड, नंदगिरी, तठवाडा वगैरे किल्ले काबीज केले. पुढें शिवाजीनें स्वतः सावंतांच्या फोंडा किल्ल्याला वेढा दिला. इकडे शिवाजी गुंतलेला पाहून मोगलांच्या आरमारानें पेणच्या खाडींतून प्रवेश करून जमिनीवर उतरून आजूबाजूचा सर्व मुलूख उध्वस्त केला.

ही बातमी लागतांच शिवाजीनें सैन्य पाठवून मोगलांच्या एका अघाडीच्या तुकडीची कत्तल केली, आणि नंतर मुख्य सैन्याचा समाचार घेऊन त्याला पळवून लाविलें. नंतर पुन्हा त्यानें फोंडा किल्ल्याकडे अधिक प्रयत्न सुरू केले. फोंडा किल्ल्यांतील लश्कर बहादुरीनें लढून पुष्कळ टिकाव धरून राहिलें होतें. त्याच्या मदतीला विजापुर दरबारानें अबदुल करीम नामक सरदारास चालून जाण्यास फरमाविलें. शिवाजीनें प्रतापराव गुजरला ताबडतोब त्याच्यावर पाठविलें. प्रतापरावानें त्याचा खरपूस समाचार घेऊन त्याला विजापुर शहरापर्यंत हटवीत नेलें. मिरज व विजापुर ह्यांच्यामध्यें दोन्ही सैन्यांची लढाई जुंपून प्रतापरावानें अबदुल करीमच्या सैन्यावर दोन्ही बाजूंनीं हल्ला करून त्याला इतकें हैराण केलें कीं त्यानें घाबरून जाऊन तहाचें बोलणें लाविलें, व मराठ्यांशीं कधींही लढणार नाहीं अशी कबुलात दिली. भोळ्या प्रतापरावाच्या लक्ष्यांत करिमाचा डावपेंच न येऊन त्यानें लढाई बंद केली, व त्यामुळें करिमाला सैन्यासह निसटून जाण्यास सांपडलें. एवढ्यावरच करीम थांबला नाहीं. त्यानें विजापुराहून अधिक सैन्य घेऊन पुन्हां पन्हाळ्यावर चाल केली. हें कळतांच शिवाजीनें प्रतापरावाला दोष देऊन त्याची निर्भत्सना केली. प्रतापरावाला राग येऊन त्यानें शिवाजीला न जुमानितां आपल्या सैन्यासह औरंगाबादेपर्यंत चाल करून सर्व मोगल मुलूख लुटून फस्त केला, व त्यामुळें मोगल सुभ्याशीं केलेल्या सख्याचा भंग झाला. एकंदर स्थिति इतकी नाजूक झाली कीं, शिवाजीला फोंड्याचा



मोगल बादशाह औरंगजेब.



राजा जसवंतसिंग.

वेढा उठविणें भाग पडलें. परत फिरतांना शिवाजीनें पोर्तुगीजांचा मुलूख लुटला. इकडे अबदुल करीम थेट पन्हाळ्यावर चाल करून गेला; इतक्यांत प्रतापराव गुजर परत फिरला. अबदुल करीमच्या फौजेचा नाश केल्याशिवाय आपणास तोंड दाखवूं नये असा शिवाजीनें प्रतापरावास निरोप पाठविला. त्यानें त्याला अत्यंत ईर्षा उत्पन्न होऊन त्यानें अबदुल करीमच्या सैन्यावर चाल केली. परंतु त्यांत त्याला यश न येऊन सैन्याची पुष्कळ खराबी झाली व प्रतापराव मारला गेला. सैन्याची दाणादाण होऊन तें पन्हाळ्याकडे पळत सुटलें. इतक्यांत हसाजी मोहिते आपल्या पांच हजार घोडेस्वारांनिशीं चालून जाऊन त्यानें करिमाचा खरपूस समाचार घेऊन त्याचा पराभव केला व त्याला थेट विजापुरापर्यंत हटवून पळवून लाविलें. ह्या विजयानें शिवाजीला जितका आनंद झाला त्यापेक्षां प्रतापरावाच्या मरणानें अधिक दुःख झालें. शिवाजीनें प्रतापरावाच्या कन्येशीं आपला मुलगा राजाराम ह्याचा विवाह केला. हसाजी मोहित्याला त्याच्या पराक्रमाबद्दल हंबीरराव हा किताब देऊन त्याला सरनौबतच्या जागीं नेमिलें.

# भाग ८ वा.

## संतसमागम व उपदेशाची प्रेरणा.

आतां हें कथानक थोडा वेळ बाजूला ठेवून शिवाजीच्या चरित्राशीं ज्याचा संबंध आहे अशा एका महत्वाच्या विषयाकडे वळूं. तो विषय म्हटला ह्मणजे तुकाराम, व विशेषतः रामदास, आणि शिवाजी ह्यांचा परस्पर संबंध हा होय. शिवाजीच्या जीवनचरित्रांत तुकाराम व मुख्यत्वें करून रामदास ह्यांच्या सहवासाला विशेष महत्व देण्यांत येतें. कित्येकांच्या मतें तर रामदासांच्या उपदेशामुळें शिवाजीच्या मनांत स्वराज्यस्थापनेची प्रेरणा झाली व त्याला स्फूर्ति व उत्तेजन मिळून त्याच्या हातून हें कार्य सिद्धीस गेलें. तुकाराम व रामदास हे शिवाजीचे समकालीन होते ह्यांत शंका नाहीं. परंतु त्यांचा व शिवाजीचा केव्हां, कसा आणि कोणत्या विशिष्ट परिस्थितींत सहवास घडला हा प्रश्न मुद्याचा आहे. ह्या साधुद्वयांच्या चरित्राची सामान्य माहिती सर्व महाराष्ट्रीयांस असल्यामुळें त्यांच्या चरित्राचें येथें विवेचन न करतां फक्त वरील मुद्यांचेंच आम्हीं येथें विवेचन करितों.

मागें पहिल्या भागांत विवेचन केलें आहे त्यावरून शिवाजीच्या काळापूर्वीं कित्येक वर्षांपासून साधुसंतांच्या उपदेशानें धर्मजागृति होऊन स्वधर्माचा व स्वदेशाचा अभिमान बहुजनसमाजांत

म्हणजे अर्थात् ज्यांना थोडे बहुत शिक्षणसंस्कार घडले होते अशा लोकांमध्यें उत्पन्न झाला होता व त्यामुळें एक प्रकारची एकराष्ट्रीयत्वाची कल्पना उद्भवली होती, ह्यांत शंका नाहीं. परंतु त्या कल्पनेला हवें तसें जोर आलेलें नव्हतें, तसेंच तिला धार्मिक गोष्टींच्या पलीकडे राजकीय दृष्ट्या प्रत्यक्ष कृतींत उतरविण्या इतकें व्यापक स्वरूप प्राप्त झालें नव्हतें, हें उघड आहे. तसें असतें तर प्रत्यक्ष शाहाजी, चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे ह्यांच्यासारखे अनेक प्रबळ मराठे सरदार व शूर योद्धे दुसऱ्याच्या गुलामगिरींत खिचपत पडून राहिले नसते, हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. अर्थात् स्वराज्याची व स्वातंत्र्याची कल्पना केवळ शिवाजीच्या मनांतच उत्पन्न झाली. आतां ती स्वयंभूच होती किंवा रामदासांच्या उपदेशामुळें झाली, अथवा निदान त्यांच्या उपदेशानें तिला विशेष जोराचें स्वरूप आलें, ह्या प्रश्नाचा निकाल लावावयाचा आहे.

प्रथम तुकाराम महाराजांचा व शिवाजीचा किती संबंध होता तें पाहूं. एकतर तो महासाधु केवळ विरागी व निवृत्तिवादी होता. त्यानें पांडुरंगाच्या भक्तीशिवाय तसेंच मुक्तीच्या मार्गाशिवाय राजकीय किंवा अन्य कोणत्याही विषयाकडे किंवा मार्गाकडे लक्ष देऊन त्याचें प्रतिपादन अथवा पुरस्कार केलेला दिसत नाहीं. जरी शिवाजीचा स्वधर्माकडे फार ओढा होता व कथाकीर्तनाचा त्याला नाद होता, तरी त्याची व तुकारामाची फारशी भेट झाल्याचें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसत नाहीं. आणखी, तुकाराम महाराज इ. स. १६५१ च्या सुमारास किंवा त्यापूर्वींच अर्थात् शिवाजी

ज्या वेळीं तेवीस चोवीस वर्षांचाही झाला नव्हता व त्याच्या प्रयत्नाला पुरतें दृश्यस्वरूप आलेलें नव्हतें, आणि त्याला खायला सुद्धां फुरसद नसेल, अशा अतिशय धामधुमींत व चळवळींत तो गुंतला होता, त्या समयीं तुकाराम महाराज वैकुंठवासी झाले. ह्यावरून त्याचा तुकाराम महाराजांशीं गाढ परिचय किंवा संबंध झाला असेल असें मानण्यास आधार नाहीं. आतां तुकाराम महाराजांनीं शिवाजीला लिहिलेलें असें एक अभंगबद्ध पत्र प्रकाशित झालेलें आढळतें, तें पत्र रामदासांचा शिवाजीवर अनुग्रह झाल्यानंतर बऱ्याच काळानें लिहिलेलें असल्याचें रामदासांचा शिष्य हनुमानस्वामी ह्याच्या बखरीवरून दिसतें. परंतु एकतर हें पत्र हनुमानस्वामीच्या बखरीखेरीज तुकारामाच्या अन्य कोणत्याही विश्वासनीय अभंगसंग्रहांत आढळत नाहीं. दुसरें असें कीं, ह्या अभंगांत उल्लेख केलेल्या अष्टप्रधान मंडळाची रचना करण्या इतक्या स्थितीला शिवाजीचें स्वराज्य तुकारामाच्या वैकुंठवासापूर्वीं पोहोंचलेलें नव्हतें. तिसरें असें कीं, ह्या अभंगांची भाषा तुकारामाच्या इतर अभंगांच्या भाषेहून पुष्कळ भिन्न, विशेष क्लिष्ट, आणि अधिक संस्कारयुक्त, आणि जवळ जवळ रामदासांच्या किंवा त्यांच्या सांप्रदायिकांच्या शैलीची आहे. ह्या कारणांवरून सदर अभंगबद्ध पत्र तुकाराम महाराजांचें नसावें व तें त्यांच्या नांवावर दडपून दिलें असावें, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. ह्या एकंदर गोष्टींवरून तुकाराम व शिवाजी ह्यांचा गाढ परिचय किंवा संबंध घडला असेल असें मानण्यास विश्वसनीय आधार नाहीं, हें उघड आहे.

आतां रामदास व शिवाजी ह्यांचा परस्पर संबंध केव्हां घडला व तो कशा स्वरूपाचा होता, म्हणजे रामदास हे शिवाजीचे राजकीय बाबतींत प्रेरणा करणारे गुरु होते किंवा नुसते परमार्थ आणि मोक्ष ह्या बाबती पुरतेच गुरु होते, ह्याचा विचार करूं. राजकारणाच्या कामीं रामदासांनीं शिवाजीला स्फूर्ति दिली किंवा कसें ह्या गोष्टीचा खरेखोटे-पणा किंवा महत्व त्या उभयतांची पहिली भेट केव्हां झाली ह्या एकच मुद्यावर अवलंबून आहे. ह्या मुद्याचा ( १ ) रामदासांच्या चरित्रां-तील ठळक गोष्टी, ( २ ) शिवाजीच्या काळच्या बखरी, व ( ३ ) इतर कागदपत्रें, ह्या तीन दृष्टींनीं विचार केला पाहिजे.

रामदासांचा जन्म इ. स. १६०८ त झाला. ते बारा वर्षांचे झाले तेव्हां त्यांना संसाराविषयीं अनुताप उत्पन्न होऊन त्यांनीं संसारत्याग केला व घरांतून निघून जाऊन नाशकाजवळ एका गुहेंत बारा वर्षें राहून तपश्चर्या वगैरे करून आध्यात्मिक ज्ञान संपादन केलें. हें झाल्यावर त्यांनीं पुढील बारा वर्षें तीर्थयात्रेंत घालविलीं. म्हणजे रामदास छत्तीस वर्षांचे होईपर्यंत म्हणजे इ. स १६४४ पर्यंत त्यांचा महाराष्ट्रांतील समाजाशीं बिलकूल संबंध घडला नाहीं किंवा त्यांनीं उपदेशाचेंही काम केलें नाहीं, हें उघड होतें. ह्यावरून ह्या मुदतींत म्हणजे शिवाजीच्या बाळपणांत व पुढें युवावस्थेच्या व त्याच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याच्या प्रारंभापर्यंत रामदास व शिवाजी ह्यांचा संबंध घडणें शक्यच नव्हतें, हें स्पष्ट दिसतें. शिवा-जीनें आपल्या कार्याची दिशा ह्यापूर्वींच नक्की करून त्यानें प्रारंभही केला होता. ह्यावरून शिवाजीला स्वराज्यस्थापनेची स्फूर्ति होण्याला

रामदासांचा उपदेश कारण झाला, किंवा त्या बाबतींत रामदासच त्याचे गुरु व सल्लागार होते, ह्या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. अर्थात् शिवाजीला जो स्फूर्ति किंवा प्रेरणा झाली ती स्वयंभूच होती व तिला खरोखर कोणाच्या उपदेशानें पुष्टि व उत्तेजन प्राप्त झालें असेल तर तें दादोजी व जिजाबाई ह्यांच्याच उपदेशानें, रामदासांच्या नव्हे, ह्यांत शंका नाहीं. रामदासांचा हा छत्तीस वर्षांचा काल प्रथम बाल्यांत, नंतर शिवाजीच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेहून पुष्कळच दूर अशा प्रदेशांतील एका गुहेंत केवळ एकांतवासांत, आणि पुढें महाराष्ट्राबाहेर दूरवर तीर्थाटन करण्यांत गेला असल्यामुळें मागें ज्या तुकारामाचें म्हणून मानलेल्या अभंग–पत्राचा उल्लेख केला आहे त्यांत ध्वनित केलेलें विधान कितपत सत्य आहे, तें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

रामदासांचें चरित्र त्यांचा सांप्रदायी शिष्य हनुमानस्वामी ह्यानें लिहिलें आहे. ह्या हनुमानस्वामीच्या बखरींतील विधानें व वर्णनें अनेक स्थळीं एकमेकाशीं इतकीं विसंगत आहेत कीं ऐतिहासिक दृष्ट्या तीं ग्राह्य करण्यासारखीं नाहींत. शिवाय शिवाजीच्या त्या वेळीं लिहिलेल्या ज्या विश्वसनीय बखरी आज प्रसिद्ध आहेत त्यांत हनुमानस्वामीच्या वृत्तांताला पुष्टि मिळण्यासारखी हकीकत फारशी कोठेंही नाहीं. ह्यावरून व हनुमानस्वामीचा प्रमुख हेतु रामदास हे एक अवतारी पुरुष होते हें दाखविण्याचा असून, त्याच्या पुष्ट्यर्थ अनेक दैवी सामर्थ्याचे प्रकार वर्णून रामदास स्वेच्छेनें वाटेल तें करूं शकत असत हें प्रतिपादन

करण्याचा असल्यामुळें ऐतिहासिक पुरावा म्हणून त्या बखरीचा फारसा उपयोग नाहीं.

आतां हनुमानस्वामीनें लिहिलेल्या बखरींतील शिवाजी विषयींच्या ठळक मुद्यांचा विचार करूं. त्यानें शिवाजीच्या प्रथम भेटीचें वर्णन करतांना रामदास व शिवाजी ह्यांच्यामध्यें झालेला जो पत्रव्यहार दिला आहे त्याप्रमाणें ही भेट इ. स. १६४९ त झाली असली पाहिजे. परंतु त्या पत्रव्यवहारावरून शिवाजीनें प्रतापगड, कोंकणप्रांत, सातारा वगैरे मुलूख इ. स. १६४९ पूर्वींच जिंकला होता असें होतें. परंतु वास्तविक पाहतां प्रतापगडाच्या तटबंदीचें काम इ. स. १६५५ त मोऱ्यांचा पाडाव केल्यानंतर झालें असून कोंकण वगैरे मुलूख तर इ. स. १६६२ नंतर शिवाजीनें जिंकला होता. ह्यावरून वरील हनुमानस्वामीनें दिलेली भेटीची तारीख व वर्णन विश्वसनीय मानणें शक्य नाहीं. ह्याच वर्णनांत आणखी असेंही विधान आहे कीं, रामदासांनीं दासबोधाच्या तेराव्या दशकांतील लघुबोध म्हणून जो समास आहे त्यांतील उपदेश शिवाजीला ह्या भेटीच्या वेळीं केला. परंतु खुद्द दासबोधांतील उल्लेखावरून इ. स. १६५९ पर्यंत ( शके १५८१ ) दासबोधाच्या रचनेची मजल सहाव्या दशका पलीकडे गेलेली नव्हती. ह्यावरून शिवाजी–रामदासांच्या भेटीचा हनुमानस्वामीनें दिलेला काळ चुकीचा आहे, असें उघड दिसतें. आतां घटकाभर ही प्रथम भेट इ. स. १६७९ त झाली असें मानिलें तर, ज्या शिवाजीनें रामदासांचा अनुग्रह ह्या वेळीं घेतला होता त्या आपल्या गुरूच्या मठाला त्याच्याकडून इ. स.

१६७४ पर्यंत म्हणजे सुमारें २९ वर्षेंपर्यंत मोठी रोकड नेमणूक किंवा इनामी गांव न मिळावें हें संभवनीय दिसत नाहीं.

अलीकडे रा. रा. चांदोरकर ह्यांस रामदासांच्या ह्यातीपासून त्यांच्या मठाची व्यवस्था पाहण्याचें काम करणारा दिवाकर गोसावी ह्याचीं व त्याला भास्कर गोसाव्यानें लिहिलेलीं अशीं पत्रें उपलब्ध झालीं असून तीं प्रसिद्ध झालीं आहेत. त्या पत्रांवरून रामदास इ. स. १६५४ पासून १६६४ पर्यंत एकांतवासांत राहून ग्रंथरचनेंत गुंतले होते असें ठरतें. त्यावरून दासबोधाच्या रचनेच्या काळाचा उलगडा पडतो एवढेंच नव्हे, परंतु इ. स. १६५८ सालच्या भास्कर गोसाव्याच्या पत्रांत, भिक्षा मागत फिरत असतां आपली व शिवाजीची भेट होऊन आपणाकडून त्याला रामदासांची हकीकत समजल्याचा स्पष्ट उल्लेख आहे, त्यावरून ह्या सालापूर्वी म्हणजे इ. स. १६५८ पूर्वी शिवाजीला रामदासांची माहितीही नव्हती, हेंही सिद्ध होतें. आणि ह्या प्रत्यक्ष पुराव्यावरून हनुमान स्वामीनें दिलेला भेटीचा इ. स. १६४९ हा काळ अगदीं निराधार ठरतो.

आतां शिवाजीच्या वेळच्या बखरींतील हकीकतीचा विचार करूं. सभासदाची, चित्रगुप्ताची, शिवदिग्विजय नामक, व चिटणीसाची अशा शिवाजी संबंधी चार मुख्य बखरी प्रसिद्ध आहेत. त्यांत पहिली सर्वांत जुनी व शिवाजीच्या मृत्युनंतर थोड्याच वर्षांनीं लिहिलेली आणि सर्वांत अधिक विश्वसनीय आहे. सभासद हा शिवाजीच्या दरबारीं होता. तथापि ह्या सभासदाच्या बखरींत रामदासाच्या भेटीचाच काय परंतु खुद्द रामदासांचाही उल्लेख नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सभासदानंत-

रच्या चित्रगुप्ताच्या बखरींत शिवाजी-रामदासांच्या निकट संबंधाचा उल्लेख नसून, फक्त रामदासांनीं राज्याभिषेकानंतर शिवाजीला राजनीति उपदेशिल्याचा उल्लेख आहे. ह्यापेक्षां तींत अधिक महत्वाचें कांहींएक नाहीं. शिवदिग्विजयांत शिवाजीला प्रौढपणीं आध्यात्म-ज्ञानाचा उपदेश रामदासांनीं केला, अशी हकीकत असून भेटीसं-बंधींचें वर्णन पुढें दिलें आहे तें शब्दशः हनुमानस्वामीच्या वर्णना-सारखेंच जवळ जवळ आहे. हें वर्णन हनुमानस्वामीच्या वर्ण-नावरून घेतलें असावें, असें दिसतें. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें मूळ हनुमानस्वामीचें वर्णनच निराधार आहे, तर ह्या वर्णनानें भेटीच्या मुद्याला पुष्टि मिळणें शक्य नाहीं. आतां राहिली चिटणी-साची बखर. हींत रामदास व शिवाजी ह्यांच्या संबंधाचें अनेक ठिकाणीं वर्णन आहे. परंतु चिटणीस व हनुमानस्वामी हे समकालीन होते व हनुमानस्वामीनें रामदासांच्या बखरीच्या बाबतींत चिटणीसाची मदत घेतल्याचें नुकतेंच सिद्ध झालें आहे. ऐतिहासिक स्वरूपाच्या गोष्टीं शिवाय हनुमानस्वामीनें लिहिलेल्या दैवी चमत्कारप्रचुर कथांना चिटणिसानें आपल्या बखरींत थारा दिलेला दिसत नाहीं. तथापि शिवाजी-रामदासांच्या संबंधाविषयीं ज्या गोष्टींचें वर्णन केलें आहे त्या बहुतेक हनुमानस्वामीच्या वृत्तांता इतक्याच विसंगत आहेत, आणि चिटणीस व हनुमानस्वामी ह्यांचा निकट संबंध ध्यानांत आणिला ह्मणजे त्या तशा असणें स्वाभाविक आहे. सारांश शिवाजीला रामदासांपासून राजकीय बाबतींत उपदेश मिळून प्रेरणा झाली ह्या ह्मणण्याला ऐतिहासिक आधार नाहीं, हें उघड आहे.

आतां, जरी रामदासांकडून शिवाजीला स्फूर्ति किंवा प्रेरणा झाली नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे, तथापि त्या उभयतांचा निकट संबंध घडून आला होता, हेंही तितकेंच निर्विवाद आहे. आतां तो संबंध केव्हां व कसा घडून आला तें आपण पाहूं. ह्या गोष्टीचा यथार्थ विचार करण्याला वर निर्दिष्ट केलेलीं रा. रा. चांदोरकरांस उपलब्ध झालेलीं पत्रें हें एक उत्तम विश्वसनीय साधन आहे. वर दाखविलेंच आहे कीं शिवाजीला रामदासांविषयीं प्रथम माहिती इ. स. १६९८ त भास्कर गोसावी ह्या रामदासाच्या शिष्याकडून मिळाली, आणि त्यावरून शिवाजीच्या मनांत रामदासांविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन त्यानें मठाच्या खर्चासाठीं वार्षिक दोनशें होनांची नेमणूक करून दिली. आणि हा प्रसंग सुद्धां केवळ यदृच्छेनें घडला. कारण जरी रामदासांनीं चाफळ येथें राम व मारुति यांचें मंदिर बांधून आपला रामदासी पंथ स्थापण्याची सुरुवात इ. स. १६४८ त केली होती, तरी पंथाचा विस्तार, कांहीं तात्कालिक झाला नव्हता, व होणेंही शक्य नव्हतें. पंथाचा विस्तार करून त्याला कायमचें स्वरूप देण्यासाठीं ते प्रयत्न करूं लागले व त्यासाठींच आपल्या पंथाचीं तत्वें प्रतिपादन करण्यासाठीं त्यांनीं ग्रंथरचना करण्याचें योजून त्या कामांत ते इ. स. १६९४ पासून १६६४ पर्यंत गुंतले होते, आणि ह्या दरम्यान मठांची व्यवस्था चालविण्यासाठीं त्यांचे शिष्य भिक्षेसाठीं फिरत असत, आणि अशा रीतीनें फिरत असतांनाच भास्कर गोसावी ह्या शिष्याकडून त्यांच्याविषयीं इ. स. १६५८ त शिवाजीला माहिती झाली, इत्यादि हकीकत दिवाकर गोसावी व

भास्कर गोसावी यांच्या पत्रांत आहे. ह्याच दोन शिष्यांच्या दुसऱ्या पत्रांवरून इ. स. १६६४ सालीं रामदासांनीं ग्रंथ पुरा केला, व एकांतवास सोडून चाफळ येथें ते परत आले, असें समजतें. ह्या अवधींत त्यांना शिवाजीनें दिलेल्या वार्षिक नेमणुकीची माहिती मिळून शिवाजीनें आरंभिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याची व त्यामुळें महाराष्ट्रांत राजकीय दृष्ट्या झालेल्या स्थित्यंतराची खबर लागली असावी, असें वाटतें. आणि ह्यामुळेंच दासबोधाच्या शेवटच्या भागांतील उपदेशाला राजकारणी स्वरूप आलें असावें, हें अगदीं सयुक्तिक दिसतें.

इ. स. १६६४ हें साल व त्यापूर्वी एक दोन वर्षें व त्यानंतरचा काळ शिवाजीच्या कारकीर्दींत किती संकटमय व नाजूक स्थितीचा होता, हें मागील भागांतील वृत्तांतावरून दिसून येईल. ह्या काळांत तो प्रारंभीं मोगलांशीं लढण्यांत गुंतला होता. त्यांत फारसें यश न आल्यानें त्यांच्याशीं तह करून व नंतर औरंगजेबास भेटण्यास गेला असतां अटकेंत पडून, तींतून आपली मुक्तता करून घेऊन परत आल्यावर मोगलांच्या कबजांत गेलेला आपला मुलूख परत जिंकून घेण्याच्या खटपटींत तो इ. स. १६७२ पर्यंत पडला होता. त्यामुळें जरी त्याला रामदासांविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती तरी सुद्धां रामदासांची भेट घेण्याला संधी मिळण्यासारखी स्थिति नव्हती, हें उघड आहे. पुढें इ. स. १६७२ त शिवाजीनें सातारा व कऱ्हाड ह्या बाजूला स्वाऱ्या करून तो मुलख जिंकला तेव्हां तो अर्थात् रामदासांच्या निवसस्थानाच्या संनिध

येऊन ठेपल्यामुळें भेट घेण्याला ओघानेंच अनुकूल संधी आली; व त्यामुळें बखरींत प्रसिद्ध असलेलें पत्र रामदासांनीं पाठवून त्याला आमंत्रण केलें असावें व त्याप्रमाणें त्या संधीचा लाभ घेऊन त्यानें रामदासांची भेट घेतली असावी, ही कारणपरंपरा अधिक सयुक्तिक वाटते; तसेंच रामदासांच्या पत्रांतील मजकूरही शिवाजीच्या इ स. १६४९ च्या पूर्वीच्या वेळच्या स्थितीपेक्षां ह्याच वेळच्या स्थितीला पूर्ण अनुरूप व जुळण्यासारखा आहे. ही भेट इ. स. १६७२ त झाली व हीच शिवाजी–रामदासांची पहिली भेट होय, ही गोष्ट केशव गोसाव्यानें दिवाकर गोसावी ह्यास जें पत्र इ. स. १६७२ त लिहिलें त्यांत शिवाजीच्या भेटीसाठीं केलेली तयारी, भेट झाली त्याच दिवशीं रामदासांनीं शिवाजीवर अनुग्रह केला वगैरे वर्णना-वरून निर्विवाद सिद्ध होते. त्यानंतर पूर्वी दिलेली वार्षिक दोनशें होनांची नेमणूक पुरत नसल्याचें नजरेस आल्यावरून शिवाजीनें इ. स. १६७४ त चाफळ मठाचा कच्चा खर्च देण्याचें आज्ञापत्र काढिलें, व पुढें दोन वर्षांनीं गांव इनाम देऊन रामदासांस पर-ळीच्या किल्ल्यावर राहण्यास शिवाजीनें बोलवून घेतलें. ह्याप्रमाणें इ. स. १६७२ पासून शिवाजी व रामदास ह्यांचा निकट संबंध व सहवास घडला असें ठरतें.

ह्या एकंदर उपलब्ध असलेल्या विश्वसनीय कागदपत्रांवरून शिवाजीशीं रामदासांचा राजकीय दृष्ट्या संबंध इ. स. १६७२ पूर्वी आला असेल असें मुळींच संभवत नाहीं, आणि ज्या अर्थी तसा संबंधच घडला नव्हता त्या अर्थी स्वराज्य स्थापनेच्या कामीं

शिवाजीला कोणत्याही प्रकारची प्रेरणा किंवा स्फूर्ति रामदासांकडून मिळणें अशक्यच होतें, हें उघड आहे. वस्तुस्थिति अशी असतांना शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेला रामदासच कारण झाले, ते नसते तर त्याच्या हातून हें महत्कार्य घडलेंच नसतें, असें मानणें हा केवळ दुराग्रहीपणा होय. अशानें रामदासांच्या महत्वात कांहीं-एक भर तर पडतच नाहीं, परंतु उलट ज्यानें खरोखर अत्यंत नाजूक व बिकट परिस्थितींत अनेक भयंकर संकटांना व विघ्नांना न जुमानतां केवळ स्वयंभू स्फूर्तीनें आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्यानें अचाट पराक्रम करून स्वराज्यस्थापनेचें कार्य आरंभून यशस्वी केलें, त्या महान् विभूतीला विनाकरण गौणत्व व कमीपणा आणण्याचा प्रयत्न जाणून बुजून करण्यासारखें होतें. वास्तविक पाहतां रामदास व शिवाजी हे दोघेही आपआपल्या कार्यक्षेत्रांत अलौकिक पराक्रमी विभूति होऊन गेल्या व दोघांनाही जेव्हां भेट झाली तेव्हांपासून एकमेकांविषयीं अत्यंत प्रेम व आदरभाव उत्पन्न झाला होता, हें निर्विवाद आहे. त्यापेक्षा ह्याच्या परस्पर संबंधापासून दुसरा कांहीं परिणाम झाला नव्हता व होण्याचा संभवही नव्हता, असें मानण्यास कांहींएक हरकत नाहीं. रामदासांविषयीं शिवाजीला सहज माहिती होऊन त्यांची प्रत्यक्ष भेट इ. स. १६७२ त झाली आणि तेव्हांपासून त्यांचा निकट संबंध घडला, ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच रामदास हे शिवाजीचे धार्मिक बाबतींत गुरु होते, म्हणजे मोक्षगुरु होते, आणि धार्मिक बाबतींपलीकडे त्यांच्यापासून शिवाजीला अन्य कोणत्याही प्रकारची प्रेरणा झाली नव्हती.

शिवाय जो केवळ निवृत्तिमार्गी व ज्याचा ओढा संपूर्णपणें परमार्थाकडे होता अशा विरक्त महासाधूकडून स्वभावतःच कुटिल अशा राजकारणाचें कार्य झालें, असें मानणेंच विसंगत व असंभवनीय आहे. खरी गोष्ट अशी असतांना केवळ अंधश्रद्धेनें नसत्या कल्पना काढून, निराधार कागदपत्रांवर भरंसा ठेऊन, शद्बांची व अर्थाची ओढाताण करून बादरायण संबंध दाखविण्याचा प्रयत्न करणें केवळ दुराग्रहीपणाचें लक्षण आहे. रामदासांनीं धर्माच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची कामगिरी केली ह्यांत जराही शंका नाहीं. परंतु त्यांच्याकडून राजकीय दृष्टया कांहीं कामगिरी झाली असली तर उलट ती शिवाजीच्याच सहवासानें आणि त्याच्या परिणामीं शिवाजीच्या कारकीर्दीच्या अगदीं अखेरीस व त्याच्या मृत्युनंतर झाली असेल, हें अधिक संभवनीय आहे.

# भाग ९ वा.

## राज्याभिषेक.

आतां आपण आपल्या मुख्य विषयाकडे वळूं. पूर्वी वर्णिल्या-प्रमाणें शिवाजीनें कल्याणपासून सावंतवाडीपर्यंतची सर्व कोंकणपट्टी, मावळ व देश इत्यादि सर्व महाराष्ट्राचा भाग जिंकून आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें, मोगलांपासून त्यांच्या मुलखांत चौथ उघराविण्याचा हक्क मिळविला, विजापुरावर व मोगलांवर सरशी करून त्यांना आपली स्वतंत्र सत्ता कबूल करण्यास भाग पाडिलें, आणि सर्व महा-राष्ट्रांत आपलें वर्चस्व स्थापित केलें, तथापि त्याला प्रत्यक्ष सिंहासना-रूढ होऊन राज्याभिषेक करून घेतल्याशिवाय, अर्थात् राजचिन्हां-कित झाल्याशिवाय खरें भूपतित्व येणें शक्य नाहीं, असें कित्येक दिवसांपासून शिवाजीला भासत होतें. आणि प्रत्यक्ष राज्याभिषेक झाल्याशिवाय सामाजिक व धार्मिक दृष्ट्या त्याला राजत्वाचें खरें महत्व प्राप्त होणें शक्य नव्हतें. आपली स्वतंत्र राजसत्ता निर्विवाद स्थापित झाली आहे अशी स्थिति शिवाजीला ह्या वेळीं म्हणजे इ. स. १६७४ च्या सुमारास प्राप्त झाली होती, आणि म्हणूनच त्यानें राज्याभिषेक करून घेण्यास हा समय योग्य आहे असें जाणून राज्या-भिषेक करून घेण्याचा निश्चय केला; आणि आपल्या विश्वासु सल्लामसलतगारांचा आणि जिजाबाईचा अनुकूल अभिप्राय मिळ-

तांच, तसेंच आपल्या कुलस्वामिनी भवानीचाही तसा अनुकूल दृष्टांत होतांच शिवाजीनें राज्याभिषेकाची तयारी चालविली. ह्या कामीं त्यानें रामदासांचाही अभिप्राय घेतला होता, असें म्हणतात. ह्या वेळीं रामदासांशीं त्याचा गाढ परिचय झाला होता ही गोष्ट लक्षांत घेतली असतां त्यानें त्यांचा अभिप्राय घेतला असेल ह्यांत शंका नाहीं.

हा राज्याभिषेक वैदिकधर्माला अनुसरून यथाविधि व सशास्त्र करण्याचें व त्यासाठीं काशीहून उत्तम विद्वान ब्राम्हण आणवून त्याच्या हातून हा विधि करवून घ्यावा असें ठरलें. त्या वेळीं काशीचा गागाभट्ट नामक प्रसिद्ध विद्वान् ब्राह्मण यात्रेसाठीं पैठणास आला होता. अनायासें ही संधी मिळाली हें जाणून शिवाजीनें त्याला हा विधि करण्यासाठीं आमंत्रण केलें. त्यानें शिवाजीच्या क्षत्रियत्वाविषयीं शंका काढिली, तिचें शिवाजीनें आपली उदेपुरचा महाराणा उदेसिंगापासूनची वंशावळी शिद्ध करून त्याच्या शंकेचें निरसन केल्यावर त्यानें वैदिक धर्मानुसार विधि करण्याचें कबूल केलें. राज्याभिषेकासाठीं ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, इ. स. ६ जून १६७४ हा दिवस नक्की ठरवून पुढील तयारीला सुरवात झाली.

शिवाजीनें मोठ्या लवाजम्यानिशीं भालचंद्रभट्ट पुरोहित व सोमनाथभट्ट अत्रे ह्या दोघां विद्वान् ब्राह्मणांस गागाभट्टाला रायगडावर आणण्यासाठीं पाठविलें, आणि रायगडावर विधींच्या महत्वाला अनुरूप अशा इमारती व मंडप बांधविण्याचें काम झपाट्यानें चालवून सर्व सिद्धता केली. तसेंच मुख्य दिवाणखान्यांत सर्व

राजचिन्हांकित असें एक सिंहासनही करविलें. शिवाजी आपल्या मंत्रि-मंडळासह साताऱ्यास गगाभट्टांस सामोरा गेला व त्याला मोठ्या इतमामानें रायगडावर घेऊन आला.

ह्या विधीच्या प्राथमिक संस्कारास ता. २१ मे १६७४ रोजीं सुरवात झाली. शिवाजीनें त्या दिवशीं इष्ट देवतांची यथाविधी पूजाप्रार्थना केली. नंतर तीन दिवसांनीं त्याचें यथाविधि उपनयन करण्यांत आलें. पुढें ता. ३१ मे रोजीं गणपतिपूजन होऊन होमहवनांस सुरवात झाली. हे सर्व प्राथमिक विधि ता. ३ जून रोजीं समाप्त झाले. दरम्यान शिवाजीनें आपल्या कुलस्वामिनी भवानीचें प्रतापगडावर जाऊन दर्शन घेतलें व तेथें सदैव लावण्या साठीं एक सोन्याची समई देऊन दुसऱ्या अनेक देणग्या दिल्या.

राजमहालाच्या एका प्रमुख आंगणांत मोठा मंडप उभारून त्यामध्यें वेदीवर पूर्वविधींसाठीं तात्पुरतें सिंहासन केलें होतें. अशी सिद्धता होऊन सर्व प्राथमिक संस्कार यथासांग समाप्त झाले, आणि पूर्वीं निश्चित केलेला राज्याभिषेकाचा ज्येष्ठ शु० १३ हा मंगल दिवस उजाडला. ठरलेल्या मुहुर्तावर शिवाजीराजे शुभ्र वस्त्रें परिधान करून आपल्या पुढें सर्व मंत्रिमंडल व मागून आपली आई जिजाबाई आणि आपल्या राण्या आणि उमराव व अधिकाऱ्यांच्या स्त्रिया इत्यादि परिवारासह निघून मंडपांत दाखल झाले. मंडपांतलि सिंहासनावर शिवाजीराजे राणी सोयराबाईसह अधिरूढ झाल्यावर सिंहासनाच्या पूर्वेस आपल्या हातांत तुपानें भरलेलें सुवर्णपात्र घेऊन पेश्वा मोरोपंत पिंगळे, दक्षिणेस दुधानें भरलेलें

रजतपात्र घेऊन हंबीरराव मोहिते, पश्चिमेस दह्यानें भरलेलें ताम्रपात्र घेऊन रामचंद्र निळकंठ, आणि उत्तरेस एका हातांत मधानें भरलेलें सुवर्णपात्र व दुसऱ्या हातांत गंगाजळाचें मृत्तिकापात्र घेऊन रघुनाथपंत, ह्याप्रमाणें हे चारी मंत्रि उभे राहिले. अग्नेय आणि नैर्ऋत्य दिशेस आण्णाजी दत्तो व जनार्दन पंडित अनुक्रमें छत्र व अबदागीर, आणि ईशान्य व वायव्य दिशेस दत्ताजी पंडित व बाळाजी पंडित चामरें ढाळीत उभे राहिले. पाठीमागें युवराज संभाजी बसले. ह्याप्रमाणें सिद्धता झाल्यावर वैदिक मंत्रांच्या घोषांत सर्व दिशांस उभे राहिलेल्या सर्व मंत्रिमंडळानें पंचामृताभिषेक केला. नंतर सुवासिनींकडून औक्षवण झाल्यावर शिवाजी राजांनीं आपलें प्रथम ताम्रपत्रांतील घृतांत आणि नंतर आरशांत मुखावलोकन केलें. एवढें झाल्यावर विष्णूच्या सुवर्णप्रतिमेची महाराजांनीं पूजा करून आपल्या उजव्या हातास बांधून, ब्राह्मणास दक्षिणाप्रदान देऊन आपल्या ढाल तरवार व धनुष्यबाण वगैरे आयुधांची पूजा केली. ह्यानंतर शिवाजी राजांना त्यांच्या सहधर्मचारिणी राणी सोयराबाईसह सोळा ब्राह्मण सुवासिनी व सोळा कुमारिकांकडून अभ्यंगस्नान व औक्षवण झालें.

अभ्यंगविधीनंतर शिवाजी राजांनीं बहुमोल पोषाख व अलंकार परिधान केल्यावर गागाभट्टानें त्यांना राणीसह आपल्या उजव्या हातानें धरून मुख्य दिवाणखान्यांत घेऊन जाऊन सिंहासनाजवळ नेलें. ह्या सिंहासनावर व्याघ्रचर्म आंथरून त्याच्यावर रेशमी गादी व शुभ्र चादर आंथरिली होती. शिवाजी राजे आपल्या पत्नीसह सिंहासनाला नमस्कार करून वैदिक मंत्र-

घोषांत त्यावर अधिरूढ झाले. ह्याप्रमाणें सिंहासनारूढ होतांच शिवाजी महाराजांवर सुवर्णपुष्पें, मोत्यें व रत्नें उधळण्यांत येऊन कल्याणपासून सावंतवाडीपर्यंत प्रत्येक किल्यांतून एकामागून एक तोफांची सरबत्ती सुरू झाली व ह्या तोफांच्या अवाजांनीं शिवाजी राजे सिंहासनारूढ झाल्याची बातमी सर्व महाराष्ट्रभर जाहीर केली. ह्याप्रमाणें सिंहासनारूढ झालेल्या शिवाजी महाराजांस त्यांच्या मंत्र्यांनीं, सरदारांनीं व अमलदारांनीं मुजरे केले व नंतर महाराजांनीं त्यांना यथायोग्य पदव्या, देणग्या, व पोषाख दिले. गागाभटजींस मोठी दक्षणा व बहुमोल देणग्या दिल्या. तसेंच इतर ब्राह्मणांस दक्षणा व दानें दिलीं. पुष्कळ दिवसपर्यंत ब्राह्मणभोजनें व मेजवान्या झाल्या. ह्याप्रमाणें सशास्त्र वैदिक विधीनें सिंहासनारूढ होऊन मराठासाम्राज्याचे स्वामी झाल्याची शिवाजी महाराजांची द्वाही फिरल्यावर महाराजांनीं स्वतःची सुवर्णतुला करवून तें सुवर्ण ह्या समारंभासाठीं आमंत्रित व इतर जमलेल्या ब्राह्मणांस दान दिलें. नंतर महाराजांनीं आपल्या अष्टप्रधानांस पदव्या दिल्या, व शेवटीं महाराजांची हत्तीवरून सर्व सैन्य व लवाजम्यासह स्वारी निघून हा मराठासाम्राज्याच्या पायाचा अत्यंत मंगल व संस्मरणीय विधि समाप्त झाला.

ह्या समारंभासाठीं परराज्याचे प्रतिनिधि, परदेशीय श्रीमान् व्यापारी, राज्यांतील प्रमुख सरदार, अमीर उमराव व पन्नास हजार ब्राह्मण स्त्रीपुरुष आले होते. ह्या सर्वांची त्यांच्या योग्यतेप्रमाणें महाराजांनीं योग्य बरदास्त करण्याची व्यवस्था फार दूरद-

शेणवीनें व काळजीनें केली होती. ह्या समारंभासाठीं इंग्रजांचा वकील आक्संडेन आला होता त्याला महाराजांनीं दुसऱ्या दिवशीं भेट देऊन त्याचें स्वागत केलें. आक्संडेननें महाराजांस एक हिऱ्याची आंगठी नजर केली ती स्वीकारून महाराजांनीं त्याला पोषाख दिला. नंतर करारनामा मंजूर करून इंग्रजांना शेंकडा अडीच टके जकात घेऊन राज्यांत व्यापार करण्याची, राजापुर, दाभोळ, चौल व कल्याण येथें वखारी बांधण्याची, व आपल्या हद्दींतील किनाऱ्यावर जीं जहाजें फुटून लागतील तीं त्यांस परत देण्याची परवानगी दिली. ह्याप्रमाणें हा अत्यंत मंगल समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. ह्या समारंभास एक करोड बेचाळीस लक्ष होन खर्च झाला असें सभासदाच्या बखरींत दिलें आहे. परंतु ही अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे. एकंदर गोष्टींचा विचार करतां ह्याचा एकंदर खर्च दहा लक्ष होन किंवा पन्नास लक्ष रुपये ह्यापेक्षा जास्त झाला नसावा, असा कित्येकांचा तर्क आहे.

ह्या समारंभानंतर थोड्याच दिवसांनीं जिजाबाईचें देहावसान झालें. आपल्या युवावस्थेंत पतिविरहाचें दुःख गिळून जाऊन आपल्या पुत्राचें मोठ्या संकटमय स्थितींत काळजीनें संरक्षण करून त्याला वरचेवर प्रोत्साहन देऊन, त्याचें स्वराज्यस्थापनेचें कार्य यशस्वी झालेलें आहे, तो राज्यपदारूढ होऊन राज्यवैभवाच्या शिखरास पोंचला आहे, हें डोळे भरून पाहात आहे, अशा अत्यंत सुखाच्या स्थितींत ह्या वीरमातेला देवाज्ञा झाली. त्या माउलीचे पांग फिटले असें कोण ह्मणणार नाहीं बरें? तिची पंचवीस लक्ष होनांची

९५३८ १०१

खासगी मालमत्ता शिवाजी महाराजांना मिळाली. महाराजांनीं तिची उत्तरक्रिया राजमातेला शोभेल अशा रीतीनें करून पुष्कळ दानधर्म केला. अशौच पुरें झाल्यावर महाराजांनीं दोषानिरसनार्थ यथायोग्य विधि व शांति करून ते पुन्हां सिंहासनारूढ झाले.

राज्याभिषेकासाठीं अतोनात खर्च झाल्यामुळें खजिना जवळ जवळ खाली होऊन महाराजांस द्रव्याची तूट पडली. ती भरून काढण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न सुरू केले. त्यांनीं आजूबाजूच्या परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करून मोगल बादशाहाच्या मुलखाकडे मोर्चा फिरविला. त्या वेळीं दक्षिणचा मोगल सुभा बहादुरखान नामक होता. त्याच्या पेडगांवजवळ पडलेल्या छावणीवर महाराजांनीं एकदम छापा घालून एक करोड रुपये व दोनशें उत्तम घोडे व इतर सामग्री लुटली व छावणी जाळून टाकिली. नंतर कांहीं दिवसांनीं महाराज स्वतः इ. स. १६७४ च्या अक्टोबरांत मोठ्या लश्करासह औरंगाबादेवर चालून जाऊन पुष्कळ शहरें लुटलीं, व नंतर बागलाण व खानदेशाकडे मोर्चा फिरवून पुष्कळ ठिकाणें लुटून धरमगांव जाळून फस्त केलें. पुढें इ. स. १६७५ च्या प्रारंभास दत्ताजीनें मोठी पागा बरोबर घेऊन कोल्हापुर प्रांतांत प्रवेश केला आणि कोल्हापुर व इतर दुसऱ्या गांवाकडून खंडणी उघरविली.

पोर्तुगीज ( फिरंगी ) लोकांचें वसई प्रांतांत बरेंच प्रस्थ माजलें होतें. ते हिंदूंना बाटवितात ह्या कारणास्तव मोरोपंत पिंगळ्यानें मोठ्या सैन्यासह वसईवर चाल केली. परंतु पोर्तुगीजांनी वसई प्रांतांत मराठ्यांना चौथ वसूल करण्याचा हक्क देऊन आपल्यावरचें संकट टाळिलें.

एवढें झाल्यावर मोगलांनीं कोळवणांतील व धरमपुरांतील लुटारूंना कल्याण प्रांतावर स्वारी करण्यास मदत केली होती त्यांना शह देण्यासाठीं मोरोपंतानें खानदेशावर चाल केली आणि औंध व पट्टा हे घिल्ले घेतले. इकडे शिवाजी महाराजांनीं पुन्हां शिवनेर किल्ला काबीज करण्याचा प्रयत्न केला त्यांत फारसें यश न आल्यानें वेढा उठवून फलटणच्या मुलखांतून चालून जाऊन फोंडा किल्ल्यावर हल्ला करून वेढा दिला. किल्लेदार निकरानें लढला, परंतु त्याचा शेवटीं पाडाव होऊन किल्ला पडला. हा किल्ला घेतल्यावर तेथून महाराजांनीं दक्षिण किनाऱ्यावर चाल केली व सोंडाच्या राजापासून मोठी खंडणी वसूल करून कारवार शहर पुन्हां लुटलें. इकडे सेनापति हंबीरराव मोहित्यानें भडोचपर्यंत गुजराथचा मोगलांचा मुलूख लुटून मोठी लूट जमा करून तो रायगडास परत आला. इ. स. १६७६ चा पावसाळा संपतांच महाराजांनीं निंबाळकरांच्या फलटणच्या मुलखावर पुन्हां स्वारी केली व त्यांस पळवून लावून तठवाडा व पन्हाळा ह्यांच्या मध्यें वर्धनगड, भूषणगड, सदाशिवगड व मच्छेंद्रगड असे चार किल्ले बांधून मजबूत किल्लेबंदी करून फलटणच्या मुलखावर आपली कायमची सत्ता बसविली. अशा रीतीनें सारख्या स्वाऱ्या केल्यामुळें अतिशय श्रम होऊन महाराज आजारी पडले. तथापि ह्या तीनचार महिन्यांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यांतसुद्धां ते स्वस्थ बसले नव्हते. ह्या अवधींत त्यांनीं आपल्या अगाध बुद्धिचातुर्यानें दक्षिणेंत कर्नाटकावर मोठी स्वारी करण्याची एक अपूर्व योजना निश्चित करून तिची सिद्धता केली.

---

# भाग १० वा.

## कर्नाटकावर स्वारी.

राज्याभिषेकासाठीं झालेल्या खर्चानें खजिन्यांत जी मोठी तूट पडली होती ती भरून काढण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं अनेक स्वाऱ्या करून पुष्कळ लूट मिळविली, परंतु तेवढ्यानें काम भागलें नाहीं. तथापि एवढी एकच गोष्ट कांहीं फार महत्वांची नव्हती, आणि ही तूट त्यांना आणखी स्वाऱ्या करून सहज पुरी पाडतां आली असती. शिवाजी महाराजांचें ह्या वेळीं एका फार महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष लागलें होतें. जरी त्यांनीं एवढें मोठें राज्य संपादन केलें होतें व त्यांच्याजवळ एवढें मोठें कसलेलें उत्तम लष्कर होतें, तरी, त्यांना मोगलांपासून अगदीं निर्भयपणा वाटत नव्हता, व तसा वाटण्या इतका त्यांच्या सत्तेचा विस्तार होऊन तिला हवी तितकी मजबुतीही आलेली नव्हती. आणि मोगलांनीं आपलें सैन्यबळ एकत्र करून त्यांच्या राज्यावर निकराची स्वारी केली तर त्या बळापुढें टिकाव धरण्याइतकें सामर्थ्य शिवाजी महाराजांना नव्हतें. असा निर्वाणीचा प्रसंग जर कधीं आला तर त्यांतून आपलें संरक्षण करण्यासाठीं आपणाला आश्रय घेतां येईल व तेथून शत्रुचक्राला धुडकावून लावणें शक्य होईल असा प्रदेश आपल्या कबज्यांत असणें अत्यंत इष्ट आहे, असें महाराजांस वाटूं लागलें. हें साध्य करून

घेण्यासाठीं महाराजांनीं अत्यंत संपन्न अशा कर्नाटकाकडे लक्ष फिरविलें व तो प्रांत जिंकण्याची त्यांनीं आपल्या अगाध बुद्धिकौशल्यानें व मुत्सद्दिपणानें अद्भुत योजना केली.

ह्या योजनेला आणखीही एक कारण होतें, तें असें कीं ह्या प्रांताशिवाय ज्यांतून द्रव्यप्राप्ति करतां येईल असा दुसरा एकही प्रांत संपन्न स्थितींत राहिला नव्हता. दक्षिण गुजराथ व त्यांतील संपन्न शहर सुरत दोन वेळां लुटल्यामुळें, तसेंच कानडाप्रांताचा किनाऱ्याचा संपन्न भाग एक दोन वेळां लुटून फस्त केल्यामुळें, हे दोन्ही प्रांत अगदीं खालावले होते. विजापुर संस्थानांत अंतस्थ कलह माजल्यामुळें, व सतत लढाया व बंडाळी चालूं असल्यामुळें, त्या मुलखांत कांहीं राम राहिला नव्हता. तेव्हां अशा मुलखांत विनास्वार्थ धामधूम करून राहण्यापेक्षां द्रव्यप्राप्तीबरोबरच एक उत्तम निर्भय आश्रयाचें स्थान कबजांत घेणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे, असें फार बारकाईनें व दूरदृष्टीनें ठरवून महाराजांनीं कर्नाटकाच्या स्वारीची योजना केली.

ही योजना यशस्वी होण्याला दक्षिणेंतील त्या वेळची राजकीय परिस्थिति अत्यंत अनुकूल होती. इ. स. १६७६ त विजापुर दरबारीं बहलोलखान नामक अफगाणानें खवासखानाला अधिकारावरून दूर करून बालराजा शिकंदराला आपल्या ताब्यांत घेऊन राजप्रतिनिधित्वाचा अधिकार बळकावून खवासखानाला ठार केलें होतें. त्यामुळें त्याचें दक्षिणच्या सरदारांशीं व हबशी अमलदारांशीं वैर झालें, आणि त्यांच्या आपआपसांत लढाया होत होत्या. अशा

स्थितींत बहलोलखानानें मोगलांशींही वैर केलें. त्यामुळें विजापुर दरबाराची स्थिति इतकी कमजोर, नादान व नाजूक झाली होती कीं शिवाजीमहाराजांना आपल्या गैरहजेरींत त्यांच्यापासून आपल्या राज्याला कोणत्याही प्रकारची भीति ठेवण्याचें कारण नव्हतें. एक बाजू अशी निर्धास्त होती. दुसरी मोगलांची भीति नाहींशी करण्या-साठीं महाराजांनीं दक्षिणचा मोगल सुभा बहादुरखान ह्याला गुप्तरीतीनें मोठी लांच देऊन अनुकूल करून घेऊन खंडणी भरून मोगलांशीं सख्य करून घेतलें. ह्याप्रमाणें आपल्या राज्याला शत्रूंकडून उपद्रव पोंच-णार नाहीं अशी तजवीज करून, आणि आपल्या गैरहाजेरींत सर्व राज्यकारभार व बंदोबस्ती काम करण्यासाठीं आपला पेश्वा मोरोपंत पिंगळे ह्याला आपला प्रतिनिधि, व त्याला मदत करण्यासाठीं आण्णाजी दत्तो व दत्ताजी त्रिंबक ह्यांच्या हाताखालीं मोठें लश्कर देऊन नेमिलें. नंतर महाराजांनीं कूच करण्याची तयारी केली. त्यापूर्वीं गोळकोंड्याच्या सुलतानाकडून त्याचा वजीर मादण्णा ह्यानें राज्याच्या संरक्षणार्थ महाराजांना एक लक्ष होन खंडणी दर वर्षी देण्याचें कबूल करवून महाराजांची मदत मिळविण्याच्या अटीवर तह केला होता. हा तह व्यंकोजीचा पेश्वा रघुनाथ नारायण हणमंते व्यंकोजीशीं भांडून त्याची नोकरी सोडून गोळकोंड्याच्या दरबारीं राहिला होता, त्याच्या मार्फतीनें मादण्णानें करविला होता. ह्या तहा अन्वयें गोळकोंड्याच्या दरबारीं हैदराबादेस प्रल्हाद निराजी नामक महाराजांचा अत्यंत विश्वासु व धूर्त मुत्सद्दि ह्याला महा-राजांतर्फे वकील ठेवण्यांत आलें होतें. ह्या तहामुळें ह्या राज्यापासुन

कर्नाटकाच्या स्वारीला कोणत्याही प्रकारचा अडथळा येण्याचा संभव तर राहिला नव्हताच, परंतु उलट त्या दरबारापासून पुष्कळ मदत मिळण्याची आशा होती व ती मोठ्या मानानें व शिताफीनें महाराजांनीं मिळविली. ह्यासाठीं निघण्यापूर्वींच महाराजांनीं गोळकोंड्याचा सुलतान कुतुबशाह ह्याची व आपली भेट करण्याविषयीं आपल्या वकीलामार्फत तजवीज केली होती. प्रारंभीं कुतुबशाहाला अफझुलखान, शाइस्तेखान, शिद्दिजोहार इत्यादि महान् विरांचा ज्यानीं सहज पाडाव केला अशा शिवाजी महाराजांना भेटण्याची फार भीति वाटत होती म्हणून त्यानें बरीच टाळाटाळीं केली. परंतु मादण्णा व प्रल्हाद निराजी ह्यांनीं त्याची खातरजमा करून त्याला आश्वासन दिल्यावर तो कबूल झाला.

ह्याप्रमाणें सर्व बाजूंनीं आपल्या राज्याला निर्धास्त करून शत्रूंला अनुकूल करून घेऊन, शिवाजी महाराजांनीं इ. स. १६७७ च्या जानेवारी महिन्यांत आपल्याबरोबर सत्तर हजार सैन्य घेऊन मोगलांना किंवा विजापुर दरबाराला आपल्या योजनेचा मागूसही लागूं नये म्हणून व्यंकोजीकडून जहागिरीचा अर्धा हिस्सा घेण्यासाठीं आपण जात आहों असें जाहीर करून, प्रयाण केलें. वाटेंत कोणाचीही कुचाळी करूं नये अशी लष्कराला ताकीद दिली होती. वाटेंत कोठेंही न थांबतां किंवा दिशा न फिरवितां विजापुरच्या हद्दींतून बिनहरकत तीनशें मैल सरळ कूच करून महाराज ससैन्य हैदराबादे जवळ पोहोंचले. आपल्या राजधानीजवळ महाराज आले असें समजतांच कुतुबशाहानें महाराजांस सामोरे जाण्याची तयारी केली. परंतु

आपल्यासारख्या वयोवृद्ध राजानें सामोरे येण्याची तसदी घेण्याचें कारण नाहीं, अम्हींच येऊन भेटूं, असें महाराजांनीं कळविल्या-वरून त्यानें तो बेत रहीत केला, व त्यानें आपले मंत्रि मादण्णा व अकण्णा ह्यांना बड्याबड्या अमीर उमरावांसह सामोरे पाठवून शिवाजी महाराजांना आपल्या राजधानींत आणविलें.

शिवाजी महाराजांचें राजे ह्या नात्यानें परराज्यांत मित्र म्हणून राजवैभवपूर्ण थाटानें स्वागत होण्याचा त्यांच्या कारकीर्दींत हाच पहिला प्रसंग होता. सर्व नगर शृंगारून सुंदर केलें होतें. महाराजांनीं आपली सर्व सेना व लवाजमा ह्यासह संपूर्ण राजकीय थाटानें हैदरा-बाद राजधानींत प्रवेश केला. ह्या महान् शूर व प्रबळ राजाचें स्वागत करण्यासाठीं व त्यांना तसेंच त्यांच्या अजिंक्य म्हणून प्रसिद्धी पाव-लेल्या मावळी लष्कराला पाहण्यासाठीं सर्व शहर लोटलें होतें. सर्व नरनारींनीं महाराजांचें स्वागत जयघोषांत केलें. महाराजांवर सोन्या-रुप्याच्या फुलांची व मोत्यांची वृष्टि व आरत्या जागोजाग होत होत्या. अशा थाटानें स्वारी राजमहालाजवळ येऊन ठेपताच कुतुब-शाहानें पुढें सरसावून महाराजांचें आलिंगनपूर्वक स्वागत करून त्यांस दिवाणखान्यांत नेऊन आपल्या आसनावर उजव्या बाजूस बसविलें. क्षेमकुशलप्रश्न झाल्यावर तीन तासपर्यंत उभयतांचें संभाषण चाललें होतें. महाराजांच्या पराक्रमाच्या कथा त्यानें आतांपर्यंत कर्णोपकर्णीं ऐकल्या होत्या त्या आज प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ऐकावया मिळाल्यानें कुतुबशाहाला महाराजांविषयीं अत्यंत आदर व कौतुक उत्पन्न झालें. शेवटीं कुतुबशाहानें महाराजांना व त्यांच्याबरोबर

असलेल्या अमलदारांना बहुमोल वस्त्राभरणें व हत्ती, घोडे, पालख्या इत्यादि नजरनजराणें अत्तर गुलाब पानसुपारी वगैरे देऊन त्यांना निरोप दिला. शिवाजी महाराजांचा अत्यंत करारीपणा, उदार स्वभाव, त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची कार्यधुरंधरता इत्यादि पाहून सुलतानास सकौतुक समाधान वाटून धीर आला. महाराजांच्या वकिलानें त्याला जें अभयवचन व आश्वासन दिलें होतें तें खरें ठरल्यानें सुलतान खुश झाला व त्यानें प्रल्हाद निराजीला मोठें बक्षीस व पोषाक दिला.

महाराजांनीं दरबारांतून परत येतांना व तेथें मुक्काम होता तोंपर्यंत पुष्कळ खैरात केली. सुलतान व त्याचे अमलदार ह्यांच्याकडून महाराजांना पुष्कळ मेजवान्या झाल्या. महाराजांनींही सुलतानास व त्याच्या अमलदारांस बहुमोल पोषाक दिले. ह्याप्रमाणें महाराजांचा एक महिना मुक्काम होता त्या मुदतींत भेटी परत भेटी, मेजवान्या, व उत्सव ह्यांची एकच गर्दी उडाली होती. रागरंग एकत्र झाला होता. ह्याप्रमाणें आदरातिथ्य व पाहुणचारांची समाप्ति होण्याची वेळ आली. शेवटीं दोघे नृपति पुन्हां भेटले व पुष्कळ वाटाघाट होऊन दोघांमध्यें तह झाला. त्यांत शिवाजी महाराजांच्या कर्नाटकच्या स्वारीच्या खर्चासाठीं दरमहा साडेचार लाख रुपये खंडणी, पांच हजार लष्कर, सर्व सामग्रीसह तोफखाना इत्यादि कुतुबशाहानें देण्याचें व त्याच्या मोंगलांपासून सुलतानाचें रक्षण करण्याचें व कर्नाटकांतील शाहाजीच्या जहागिरीखेरीज बाकीचा जो मुलूख जिंकला जाईल त्यांतून कांहीं भाग सुलतानास देण्याचें शिवाजीमहाराजांनीं कबूल करून करारमदार होऊन

उभयतांच्या सह्याशिक्के झाले. ह्या मुक्कामाच्या मुदतींत उभय भूपतींनीं महालाच्या गच्चीवर एक दिवस बसून मराठा लष्कराच्या अमलदारांच्या सलाम्या घेण्याचा समारंभ केला. कुतुबशाहानें त्यांस त्यांच्या योग्यतेनुरूप पोषाख व देणग्या दिल्या, एवढेंच नव्हे परंतु महाराजांच्या घोड्यालाही एक हिऱ्याचा कंठा नजर केला. पुन्हां एकदां एके दिवशीं मराठा वीरांच्या बळाची परिक्षा पाहण्या-साठीं एक समारंभ झाला, त्यांत येसाजी कंकानें मस्त हत्तीबरोबर कुस्ती करून त्याचा पाडाव करून वध केला. मराठा वीरांचें बळ पाहून तुमच्या जवळ उत्तम हत्ती किती आहेत असें एकदां बाद-शाहानें महाराजांस विचारलें, त्याचें महाराजांनीं आपले हजारों उत्तम मावळे शिपायांकडे बोट दाखवून हे आमचे उत्तम हत्ती, असें उत्तर दिलें, अशी एक मजेदार दंतकथा आहे.

असो ह्याप्रमाणें महाराजांनीं आपले उद्दिष्ट हेतु साध्य करून घेऊन १६७७ च्या मार्च महिन्यांत सुलतानाचा निरोप घेऊन पुढें प्रयाण केलें, व कर्नूल प्रांतांत अनंतपुर येथें तळ दिला. ह्या अव-धींत महाराजांनीं कृष्णेच्या संगमावर चक्रतीर्थांत स्नान केलें. अनंतपुरास तळ पडल्यावर महाराज स्वतः थोड्या साथीदारांसह श्रीशैलाच्या यात्रेस गेले. तेथें मल्लिकार्जुन लिंगाची त्यांनीं दाहा दिवसपर्यंत पूजा अर्चा व प्रार्थना केली. त्यांचें इतकें तादात्म्य झालें कीं त्यांनीं आपल्या तरवारीनें आपलें शिर छाटून देवाला अर्पण करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांच्या अनुयायांनीं त्यांना आरंभि-लेल्या स्वधर्मोद्धाराची व स्वराज्यस्थापनेची आठवण देऊन त्यांस

परावृत्त केलें, अशी एक दंतकथा आहे. नंतर तेथून निघून आजूबाजूचीं तीर्थें करून महाराज पुन्हां अनंतपुरास आपल्या छावणींत परत आले. पुढें कूच करून मद्रासपासून सात मैलांवरील पेडापोलम गांवीं जाऊन तेथें तळ दिला. तेथून मद्रासच्या इंग्रज वखारींतून त्यांना नजरनजराणे झाले.

ह्या दरम्यान रघुनाथ हणमंते ह्याच्या मसलतीनें कर्नाटकांतील लहानमोठे अनेक जहागिरदार महाराजांस शरण आले. त्यांचा मुलूख महाराजांनीं काबीज करून घेतला. नंतर दहा हजार स्वारांनिशीं जिंजीच्या प्रसिद्ध अभेद्य किल्ल्यावर महाराजांनीं चाल केली. वाटेंत (त्रिमली महाल) त्रिनोमलीच्या शेरखान नामक विजापुर दरबारच्या अमलदारानें महाराजांच्या सैन्यावर छापा घातला. परंतु त्याला त्याच्या सैन्यासह घेरून त्याचा पराभव करून त्याच्या सैन्यासह कैद केलें. ह्या मुलखांत महाराजांना प्रतिकार करणारा काय तो हाच अमलदार निघाला. बाकी सर्व सरदार कमकुवत झालेले असल्यानें शरण आले. त्यामुळें महाराजांना निष्प्रतिबंध व सैन्याची खराबी न होतां संचार करतां आला. जिंजी किल्ल्याजवळ महाराज जाऊन थडकतांच किल्लेदारानें शरण येऊन महाराजांच्या स्वाधीन किल्ल्या केल्या. शिवाजी महाराजांनीं किल्ला हस्तगत केला व किल्लेदाराला अन्यत्र जहागीर दिली. नंतर जिंजीवर आपला किल्लेदार नेमून महाराजांनीं वेलोरवर चाल केली. वेलोरच्या किल्लेदारानें जोराचा प्रतिकार करून मोठ्या निकरानें आणि बहादुरीनें तो चौदा महिनेपर्यंत लढला. शेंवटीं १६७८ च्या आगस्ट महि-

त्यांत किल्ल्याच्या दोन्हीं बाजूच्या टेंकड्यांवरून महाराजांनीं सजरा व गोजरा ह्या प्रख्यात तोफांचा भडिमार करून किल्लेदाराला हैराण केलें व त्याचा पराभव करून किल्ला सर केला. ह्या अवधींत महाराजांनीं अर्नीचा किल्लाही सर करून हस्तगत केला होता. ह्या दोन्हीं किल्ल्यांच्या तटबंदीची व्यवस्था करण्याची तजवीज लावून आपल्या किल्लेदारांच्या नेमणुका महाराजांनीं केल्या.

वेलोर पडेपर्यंत महाराज तेथें राहिले नव्हते. त्यांनीं तोफांचा भडिमार सुरू करून तंजावराकडे कूच केलें व तंजावराच्या उत्तरेस दहा मैलांवर तिरुमलवाडी येथें छावणी दिली. तेथें रघुनाथपंत महाराष्ट्रांतून येऊन महाराजांना भेटला व त्यानें तेथील सर्व कुशल-वृत्त निवेदन केलें. महाराजांनीं त्याला मदुरेचा नाईक शरण आला होता त्याच्याशीं तहाची वाटघाट करून करार करण्यासाठीं पाठविलें. हा ना करतां करतां मदुरेच्या नायकानें सहा लक्ष होन देण्याचें कबूल करून त्यांपैकीं दीड लक्ष तावडतोब दिले व आपला बचाव केला.

इकडे शिवाजी महाराजांनीं व्यंकोजीला सुरक्षिततेचें अभि-वचन देऊन आमंत्रण करण्यास आपल्या वकिलास पाठविलें होतें. व्यंकोजीची सुरक्षिततेची खातरी होऊन तो महाराजांकडे जाण्यास निघाला. व्यंकोजी संनिध आल्याची खबर लागतांच महाराज स्वतः सामोरे गेले व त्याला आपल्या मुक्कामावर मानपानानें घेऊन आले. भावाभावांचे नजरनजराणे झाले, व आठ दिवस पाहुणचारांत गेल्या-वर शिवाजी महाराजांनीं आपल्या पित्याच्या तंजावरच्या जहागि-

असलेल्या अमलदारांना बहुमोल वस्त्राभरणें व हत्ती, घोडे, पालख्या इत्यादि नजरनजराणे अत्तर गुलाब पानसुपारी वगैरे देऊन त्यांना निरोप दिला. शिवाजी महाराजांचा अत्यंत करारीपणा, उदार स्वभाव, त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची कार्यधुरंधरता इत्यादि पाहून सुलतानास सकौतुक समाधान वाटून धीर आला. महाराजांच्या वकिलानें त्याला जें अभयवचन व आश्वासन दिलें होतें तें खरें ठरल्यानें सुलतान खुश झाला व त्यानें प्रल्हाद निराजीला मोठें बक्षीस व पोषाक दिला.

महाराजांनीं दरबारांतून परत येतांना व तेथें मुक्काम होता तोंपर्यंत पुष्कळ खैरात केली. सुलतान व त्याचे अमलदार ह्यांच्या-कडून महाराजांना पुष्कळ मेजवान्या झाल्या. महाराजांनीही सुल-तानास व त्याच्या अमलदारांस बहुमोल पोषाक दिले. ह्याप्रमाणें महाराजांचा एक महिना मुक्काम होता त्या मुदतींत भेटी परत भेटी, मेजवान्या, व उत्सव ह्यांची एकच गर्दी उडाली होती. रागरंग एकत्र झाला होता. ह्याप्रमाणें आदरातिथ्य व पाहुणचारांची समाप्ति होण्याची वेळ आली. शेवटीं दोघे नृपति पुन्हां भेटले व पुष्कळ वाटाघाट होऊन दोघांमध्यें तह झाला. त्यांत शिवाजी महाराजांच्या कर्नाटकच्या स्वारीच्या खर्चासाठीं दरमहा साडेचार लाख रुपये खंडणी, पांच हजार लष्कर, सर्व सामग्रीसह तोफखाना इत्यादि कुतुबशाहानें देण्याचें व त्याच्या मोबदल्यांत मोगलांपासून सुलता-नाचें रक्षण करण्याचें व कर्नाटकांतील शाहाजीच्या जहागिरीखेरीज बाकीचा जो मुलूख जिंकला जाईल त्यांतून कांहीं भाग सुलतानास देण्याचें शिवाजीमहाराजांनीं कबूल करून करारमदार होऊन

उभयतांच्या सह्याशिक्के झाले. ह्या मुक्कामाच्या मुदतींत उभय भूपतींनीं महालाच्या गच्चीवर एक दिवस बसून मराठा लष्कराच्या अमलदारांच्या सलाम्या घेण्याचा समारंभ केला. कुतुबशाहानें त्यांस त्यांच्या योग्यतेनुरूप पोषाख व देणग्या दिल्या, एवढेंच नव्हे परंतु महाराजांच्या घोड्यालाही एक हिऱ्याचा कंठा नजर केला. पुन्हां एकदां एके दिवशीं मराठा वीरांच्या बळाची परिक्षा पाहण्या-साठीं एक समारंभ झाला, त्यांत येसाजी कंकानें मस्त हत्तीबरोबर कुस्ती करून त्याचा पाडाव करून वध केला. मराठा वीरांचें बळ पाहून तुमच्या जवळ उत्तम हत्ती किती आहेत असें एकदां बाद-शाहानें महाराजांस विचारलें, त्याचें महाराजांनीं आपले हजारों उत्तम मावळे शिपायांकडे बोट दाखवून हे आमचे उत्तम हत्ती, असें उत्तर दिलें, अशी एक मजेदार दंतकथा आहे.

असो ह्याप्रमाणें महाराजांनीं आपले उद्दिष्ट हेतु साध्य करून घेऊन १६७७ च्या मार्च महिन्यांत सुलतानाचा निरोप घेऊन पुढें प्रयाण केलें, व कर्नूल प्रांतांत अनंतपुर येथें तळ दिला. ह्या अव-धींत महाराजांनीं कृष्णेच्या संगमावर चक्रतीर्थांत स्नान केलें. अनंतपुरास तळ पडल्यावर महाराज स्वतः थोड्या साथीदारांसह श्रीशैलाच्या यात्रेस गेले. तेथें मल्लिकार्जुन लिंगाची त्यांनीं दाहा दिवसपर्यंत पूजा अर्चा व प्रार्थना केली. त्यांचें इतकें तादात्म्य झालें कीं त्यांनीं आपल्या तरवारीनें आपलें शिर छाटून देवाला अर्पण करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांच्या अनुयायांनीं त्यांना आरंभि-लेल्या स्वधर्मोद्धाराची व स्वराज्यस्थापनेची आठवण देऊन त्यांस

रीच्या आपल्या हिशाची मागणी केली व शाहाजीच्या निधनसमयीं त्यानें जी जहागीर व संपत्ति मागें ठेविली होती तिचा तीन चतुर्थांश भाग व्यंकोजीनें ठेवावा असें सांगितलें. ह्याला व्यंकोजी नाकबूल झाला, तेव्हां फार रागावून महाराजांनीं त्याच्या आळशी, बेदरकारी व लोभीपणाबद्दल त्याची पुष्कळ निर्भत्सना केली. व्यंकोजीनें तें सर्व निमूटपणें ऐकून घेतलें, व कांहींएक जबाब न देतां रात्रीं बरोबर फक्त पांच स्वार घेऊन पलायन केलें. महाराजांस ही खबर दुसऱ्या दिवशीं सकाळीं समजतांच त्यांनीं व्यंकोजीला अशी भलतीच सल्ला दिल्याच्या संशयावरून त्याच्या तीन मंत्र्यांस कैद केलें, व जनार्दन हणमंत्याला पाठवून तंजावरचें राज्य खालसा करूं अशी धमकी दिली. शिवाजी महाराजांना जो राग आला त्याबद्दल त्यांना बिलकूल दोष देतां येणार नाहीं. कारण त्यानीं व्यंकोजीला सुरक्षितेबद्दल वचन दिलें असतांही आणि त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा जोरजुलूम झाला नसतांही त्यानें वरील प्रकारें वर्तन केलें तें फार गैरशिस्त केलें. कांहीं दिवसांनीं राग शांत झाल्यावर महाराजांनीं व्यंकोजीच्या मंत्र्यांस सोडून देऊन त्यांना बहुमानाचे पोषाक व देणग्या देऊन तंजावरास परत पाठवून दिलें. पुढें आपल्या वकिलांना पाठवून त्याच्याशीं निकडीचें बोलणें लाविलें. आतां, वास्तविक पाहतां शाहाजीला विजापुर सरकाराकडून ही जहागीर मिळाली होती व त्याच्या मरणानंतर विजापुर सरकारानें ती व्यंकोजीला दिली होती, म्हणून एक दृष्टीनें व्यंकोजीचें म्हणणें फारसें गैरशिस्त नव्हतें. तथापि व्यंकोजीचे बंधु ह्या नात्यानें, व हा देणगीचा व्यवहार

त्यांच्या संमतीनें झालेला नसल्यामुळें शिवाजी महाराजांचाही तीवर हक्क होताच, आणि म्हणून त्यांची मागणीही ह्या दृष्टीनें रास्त होती असें मानण्यास हरकत नाहीं. तथापि महाराजांनीं एवढ्या मोठ्या राज्याचे स्वामी झाल्यावर एवढ्याशा मुलखाच्या तुकड्या करितां निकरावर येणें, हेंही अयोग्य झालें. शेवटीं व्यंकोजीनें विजापुर सरकाराकडे फिर्याद केली. शिवाजीमहाराजांशीं वैर करण्याचें मुळींच सामर्थ्य नसल्यामुळें व्यंकोजीनें आपल्या वडील भावास त्याच्या मागणीप्रमाणें हिस्सा द्यावा असा विजापुराहून जबाब मिळाला. शेंवटीं व्यंकोजी चिडून लढण्याची तयारी करण्यास लागला. ह्या अवधींत महाराजांनीं तंजावरच्या जहागिरीशिवाय बाकीच्या व्यंकोजीला वारशानें मिळालेल्या जहागिरींवर चाल केली, आणि अर्नि, कोलार, बेंगलोर, बालापुर, आणि सिरा हीं काबीज केलीं. ह्यांचें संरक्षण व्यंकोजीकडून कांहीं होऊं शकलें नाहीं. पुढें बेलवाडी (बेल्लारी) वर चालून जाऊन महाराजांनीं वेढा घातला. पुष्कळ दिवस किल्लेदारानें वेढ्याला जुमानिलें नाहीं. शेवटीं महाराजांनीं किल्ल्याच्या तटाशेजारच्या कांहीं घरांना आग लावून किल्ल्यांतील सैन्याला घाबरवून एकदम हल्ला केला. त्यांत किल्लेदार पडला, पण त्याची बायको मोठ्या प्रसंगावधानानें त्याच्या घोड्यावर बसली व तिनें सव्वीस दिवस लढाई चालविली. अखेरीस हताश होऊन ती शरण आली व किल्ला पडला. शिवाजी महाराजांनीं तिचा सत्कार केला. नंतर तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख महाराजांनीं काबीज केला व नदी उतरून पुढें चाल केली. अशा रीतीनें सर्वत्र पराभव झाल्यामुळें व्यंकोजी फार

भयंकर रक्तपात झाले. परंतु शिवाजी महाराजांच्या ह्या स्वारींत मोठ्या लढाया होण्याचे व विशेषतः रक्तपात होण्याचे फारच थोडे प्रसंग आले. सीझर जेथें जेथें गेला तेथें तेथें त्याला विजयच मिळाला (Veni, Vidi, Vici) त्याप्रमाणेंच शिवाजी महाराज कर्नाटकांत जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांना विजयश्रीनें माळ घातली. शिवाजी महाराजांच्या स्वारींत फारसा रक्तपात न होतां केवळ त्यांच्या नांवाच्या दराऱ्यामुळें त्यांना सर्व शरण आले. त्यांना एकामागून एक विजयच मिळत गेला; ज्या ज्या शहरावर किंवा किल्ल्यावर त्यांनीं हल्ला केला, तें तें शहर किंवा किल्ला त्यांना शरण येऊन त्यांच्या हस्तगत झाला. शिवाजी महाराजांच्या यशोमय कारकीर्दींत त्यांच्या कर्नाटकाच्या स्वारी इतकी संपूर्ण यशस्वी व त्यांच्या अगाध बुद्धिमत्तेची व मुत्सद्दिपणाची साक्ष पटविणारी अशी दुसरी एकही स्वारी झाली नाहीं. ह्या स्वारींत त्यांना अपयश हा शब्द स्वप्नींही माहीत नव्हता.

ह्या स्वारीनें हिंदुस्तानच्या पूर्वेच्या दक्षिण किनाऱ्यासह आणि जिंजी व वेलोर ह्या दोन अभेद्य किल्ल्यांसह सर्व कर्नाटक प्रांत व कृष्णेच्या दक्षिणेची सर्व पट्टी, व पश्चिमेच्या किनाऱ्यापर्यंतचा असंख्य किल्ल्यांनीं सुरक्षित असा सुमारें वीस लक्ष होनांच्या वार्षिक उत्पन्नाचा मुलूख शिवाजी महाराजांच्या ताब्यांत आला. ह्या मुलखाची व्यवस्था व संरक्षण करण्यासाठीं त्यांनीं आपल्या तालमींत तरबेज झालेले शूर अमलदार नेमिले. ह्या प्रमाणें महाराजांनीं केलेली अलौकिक योजना विजयपूर्ण व सफळ झाल्यावर महाराज असंख्य हत्तीघोडे, जडजवाहीर व रोकड अशी अपार लूट घेऊन महाराष्ट्रांत परत आपल्या राजधानींत घेऊन दाखल झाले.


# भाग ११ वा.

## मोगलांशीं पुन्हा सामना; शेवटचें आरमारी युद्ध.

शिवाजीमहाराजांनीं मोगल सुभा बहादुरखान ह्याला लांच देऊन तटस्थ केलें होतें, तथापि त्याचें ताटस्थ्य फार दिवस टिकूं शकलें नाहीं. दिलेरखान व अबदुल करीम ह्यांनीं बहादुरखानाविरुद्ध औरंगजेबाचे कान भरवून देऊन त्याला परत बोलावून घेण्यास भाग पाडिलें. बहादुरखानाच्या जागीं दिलेरखानाची दक्षिणच्या सुभ्याच्या जागीं नेमणूक झाली. त्यानें व अबदुल करीमानें एक जुटीनें गोळकांड्यावर स्वारी करून तें काबीज करण्याचा व शिवाजीमहाराजाचें सर्वत्र दळणवळण तोडून त्यांचा पाडाव करण्याचा व्यूह रचिला. त्यांनीं गुलबर्गा येथें आपलें सैन्य एकत्र करून गोळकोंड्याच्या सरहद्दीवरील मालखेडच्या किल्यावर छापा घातला. वेढा पुष्कळ दिवस चालला व किल्ला उत्तम लढला, तो पडलाही असता. परंतु अबदुल करीमचें भाडोत्री लश्कर त्याला सोडून गेलें, त्यामुळें दिलेरखानाला परत फिरणें भाग पडलें व तो गुलबर्गाकडे परत हटला. अबदुल करीम आजारी पडून कांहीं दिवसांनीं मरण पावला. ह्या पराजयामुळें औरंगजेबानें नाराज होऊन दिलेरखानाला सेनापतीच्या जागेवरून दूर करून खालच्या हुद्यावर नेमिलें व शाहजादा मुआजीम ह्यास दक्षिणच्या सुभेदारीवर व सेनापतीच्या जागीं नेमून पाठविलें. दिले-

रखानानें विजापुरच्या लश्करांत जितके अफगाण होते त्यांना चढलेला पगार देण्याच्या लालचीनें विजापुरची नोकरी सोडून देववून आपल्या नोकरींत ठेविलें. ह्याप्रमाणें विजापुर सरकार सर्व बाजूनीं कमजोर झालें. नंतर विजापुरच्या सुलतानाच्या मुलींचें औरंगजेबाच्या मुलाशीं लग्न करण्याचें पूर्वींचा विजापुरचा प्रतिनिधि खवासखान ह्यानें ठरविलें होतें, त्याप्रमाणें करण्यास विजापुरसरकारास भाग पाडण्यासाठीं दिलेरखानानें लढाई सुरू केली व विजापुरावर चाल केली. निर्बल झालेल्या विजापुर दरबारानें शरण येऊन मुलगी दिलेरखानाच्या स्वाधीन केली.

एवढ्यानेंही दिलेरखानानें लढाई बंद केली नाहीं. ह्या त्याच्या दगलबाजीनें चिडून जाऊन दिलेरखानावर विजापुरची प्रजा तुटून पडली. शेवटीं सुलतानाला शिवाजी महाराजांची मदत मागणें भाग पडलें. महाराज तावडतोब पन्हाळ्यावरून निघून विजापुरास चाल करून गेले, व तेथें दिलेरखानाला चारी बाजूंनीं हैराण करण्यासाठीं लश्कर ठेऊन खादशाकडे वळले व त्यांनीं पुष्कळ मुलूख लुटला. तसेंच जालना किल्ला व शहर लुटून फस्त केल्यावर लुटीसह परत येत असतां त्यांच्या सैन्याच्या पिछाडीवर रणमस्तखान नामक मोगल सरदार दहाहजार सैन्यानिशीं संगमनेरजवळ चालून आला. त्यानें महाराजांच्या सैन्यावर हल्ले करून पुष्कळ खराबी केली. एकदां तर महाराजांच्या सैन्यावर मोठेंच अरिष्ट आलें. परंतु महाराजांनीं मोठ्या शौर्यानें लढून त्याचा संपूर्ण मोड केला व कुच करण्यास सुरुवात केली. इतक्यांत घाटांत रस्ते रोंकून दूसरी एक मोगल



जिंजीचा प्रख्यात किल्ला.



**राजा व्यंकोजी.**

( शिवाजी महाराजांचे बंधु. )



**राजा संभाजी.**

(शिवाजी महाराजांचे पुत्र.)

सैन्याची तुकडी चालून येत होती. अशा पेचांत मराठा सैन्य सांपडलें असतां महाराजांचा विश्वासु हेर बहिरजी नाईक ह्यानें एका चोरवाटेनें महाराजांसह सर्व मराठा सैन्य लुटीसुद्धां खानदेशांतील पट्टा किल्यावर सुरक्षित नेलें. महाराजांनीं पट्ट्याच्या आजूबाजूचे सर्व किल्ले हस्तगत करून घेऊन त्यांचा बंदोबस्त केला व पन्हाळ्यास परत आले. नंतर विजापुराहून अधिक कुमकेची मागणी आल्यावरून त्यांनीं मोरोपंत पिंगळे व हंबीरराव मोहिते ह्यांच्याबरोबर मोठें सैन्य देऊन पाठविलें. त्या दोघांनीं दिलेरखानाच्या सैन्यावर दोन्ही बाजूंनीं सतत हल्ले करून त्याचा पुरा मोड केला व त्याला विजापुरचा वेढा उठवून औरंगाबादेकडे पळ काढण्यास लाविलें. ह्यामुळें विजापुरास आनंदी आनंद झाला व ह्या विजयानिमित्त जिकडे तिकडे उत्सव सुरू झाले. विजापुर सरकाराकडून ह्या उत्सवासाठीं महाराजांस खास आग्रहपूर्वक आमंत्रण करण्यांत आलें. दक्षिणेंत कृष्णेपासून तंजावरपर्यंतचा आपण जिंकलेला मुलूख विजापुर सरकारानें आपणाकडे विनहरकत ठेवण्याचें, व व्यंकोजीला विजापुरचा जहागीरदार न समजतां आपला जहागीरदार आहे, असें ठरविण्याचें कबूल करण्याच्या अटीवर महाराजांनीं विजयोत्सवाचें आमंत्रण स्वीकारिलें.

विजापुरास जाण्यासाठीं महाराज मोठ्या लवाजम्यानिशीं व उत्तम फौजेनिशीं मोठ्या थाटमाटानें निघाले. विजापुर सरकारानें महाराजांच्या विजयी प्रवेशासाठीं नगर शृंगारून प्रचंड तयारी केली होती. स्वतंत्र राजा म्हणून राजदरबारी थाटानें स्वागत

होण्याचा महाराजांच्या आयुष्यांत हा दुसरा व शेवटचा प्रसंग होय. ज्या दरबाराचे पुर्वी एके काळीं ते आश्रित जहागीरदार होते, ज्यांच्याशीं फटकून स्वतंत्र होऊन त्यांनीं स्वतंत्र स्वराज्य स्थापिलें, आणि शेंवटीं त्यांनीं आपल्या पराक्रमानें ज्या सरकारचें राज्य, स्वातंत्र्य व इभ्रत हीं राखिलीं, त्याच विजापुरसरकाराला उपकृत करणारे स्वतंत्र राजे ह्या नात्यानें हें स्वागत झालें असल्यानें ह्याला गोळकोंडादरबारीं झालेल्या स्वागतापेक्षां अधिक महत्व होतें. विजापुरांत महाराजांनीं प्रवेश केला त्या वेळीं विजापुरचा सुलतान शिकंदर अदिलशाह आपल्या सर्व उमराव व अधिकाऱ्यांसह त्यांना सामोरे गेला. महाराजांची संपूर्ण राजवैभवयुक्त अशी स्वारी नगरांतून काढण्यात आली. त्या वेळीं ज्यांनीं आपल्या नगराचा नाशापासून बचाव केला त्या महाराजांचा लोकांनीं जयजयकार केला. सुलतान व त्याचे उमराव व अमलदार ह्यांनीं महाराजांस असंख्य मौल्यवान नजराणे व पोषाख अर्पण केले, आणि मेजवान्यांचा सुकाळ करून सोडिला. शेवटीं वर दर्शविलेल्या तहाच्या अटी नक्की होऊन तदनुसार करारमदार व सनदा लिहिण्यांत येऊन सह्याशिक्के झाले. ह्याप्रमाणें आपली विजयध्वजा फडकावून पाहुणचार घेऊन महाराज सुलतानाचा निरोप घेऊन परत आले.

महाराज जरी कर्नाटकाच्या स्वारींत व नंतर मोगलांशीं लढण्यांत गुंतले होते तरी त्यांचा जंजिरा घेण्याचा प्रयत्न चालूच होता. इ. स. १६७९ च्या सप्टेंबर महिन्यापासून जंजिऱ्यावर जमिनीकडून व समुद्रांतून अशा दोन्ही बाजूंनीं चालून जाण्याची तयारी महा-

राजांनीं चलविली होती. जंजिऱ्याच्या शिद्दीनें आपला काफिला मराठा हद्दींच्या किनाऱ्यावर पाठविला होता, परंतु त्याला माघार खावी लागली. शिद्दीनें पुन्हा वेंगुर्ल्याच्या किनाऱ्यावर चाल करून जाळलूट करून पुष्कळ नासाडी केली. त्याचा पाठलाग विजयदुर्गाच्या मराठा काफिल्यानें केला, परंतु शिद्दी निसटला. इ. स. १६७६ त मोरोपंत पिंगळ्याला दहा हजार फौजेसह जमिनीच्या बाजूनें जंजिऱ्यावर चाल करून जाण्यासाठीं पाठविलें. त्यानें जमिनीकडून वेढा दिला. परंतु सुरतेहून मोगल अमलदार शिद्दी कासीम मोठा काफिला घेऊन दाखल झाला व त्यानें मराठा कफिल्याचा पराभव करून महाराजांनीं नुकत्याच बांधविलेल्या तरत्या तोफखान्याचा नाश केला, आणि वेढा उठविण्यास भाग पाडिलें.


इ. स. १६७६ त जंजिऱ्याचा सिद्दी संबळ ह्याचा मोगलांशीं बेबनाव झाल्यानें त्याला काढून त्याच्या जागीं शिद्दी कासीमची बादशाहानें नेमणूक केली. सिद्दी संबळनें पुष्कळ अनाकानी करून शेवटीं इ. स. १६७७ त नाइलाजास्तव सिद्दी कासीमला किल्ला सोंपला. परंतु तो आपला शूर पुतण्या सिद्दी मिस्त्री व सर्व अनुयायांसह शिवाजी महाराजांच्या पदरीं नोकरीस राहिला. इकडे कासीमनें किल्ल्याचा मजबूत बंदोबस्त करून कांहीं लढाऊ जहाजांसह कोंकणच्या किनाऱ्यावर हल्ले करून पुष्कळ धुमाकूळ माजवून इ. स. १६७८ त पावसाळा काढण्यासाठीं मुंबई बंदरांत काफिला नांगरून राहिला. महाराजांनीं त्याचें पारिपत्य करण्यासाठीं आपले आरमारी अमल-

दार दौलतखान व दरियासारंग ह्यांस चार हजार लष्करासह पनवेलीवरून चालून जाऊन सिद्दीच्या काफिल्यावर हल्ला करण्यास पाठविलें. परंतु पावसाळ्याच्या तुफानामुळें त्यांचे प्रयत्न निष्फळ होऊन त्यांस परत हटावें लागलें. सिद्दी कासीमनें ह्याचें उट्टें अलिबागचा किनारा लुटून काढिलें. इ. स. १६७८ च्या अक्टोबरांत एक मोठें लश्कर व प्रचंड तोफखाना बरोबर देऊन दौलतखानाला महाराजांनीं जंजिऱ्यावर पाठविलें. परंतु सिद्दी कासीमानें इ. स. १६८० च्या फेब्रुवारीपर्यंत मुंबई बंदरांत राहून नग पेण नदीच्या मुखानें प्रवेश करून पुष्कळ लुटालूट करून मुलूख उध्वस्त केला. कासीमाच्या ह्या शहानें मराठा लश्कराचे प्रयत्न निष्फळ होऊन त्यांना पुन्हां परत हटणें भाग पडलें.

जंजिरा हस्तगत करण्याचे महाराजांचे अनेक प्रयत्न निष्फळ झाल्यामुळें त्याच्या शेजारींच एकादें बेट काबीज करून त्याची तटबंदी करून तें आपलें मुख्य आरमारी ठाणें करावें ह्या हेतूनें महाराजांनीं पूर्वींपासूनच पुष्कळ विचार व तपास चालविले होते. शेवटीं मुंबईच्या दक्षिणेस अकरा मैलांवर व जंजिऱ्याच्या उत्तरेस तीस मैलांवर कांदेरी ( कान्हेरी ) बेट पसंत केलें, आणि त्यावर मजबूत तटबंदी करण्याचें ठरविलें. हें बेट अगदीं नाक्यावर असल्यामुळें मुंबईच्या इंग्रज वखारदारांनीं बांधा काढिला. परंतु त्याला न जुमानतां महाराजांनीं तटबंदी सुरू केली. पण इंग्रज व शिद्दी ह्यांनीं एक जुटीनें चाल केल्यानें महाराजांच्या लष्करास माघार



जंजिऱ्याचा प्रसिद्ध किल्ला.



शिवाजी महाराजांच्या आरमाराची इंग्रज आरमाराशीं लढाई.

घ्यावी लागली. पुढें इ. स. १६७९ त महाराजांनीं पुन्हां कांदेरीच्या तटबंदीचें काम सुरू केलें. इंग्रजांनीं पुन्हा अक्षेप घेतला, व लढण्याची धमकी दिली. इ. स. १६७९ च्या आक्टोबरांत दौलतखानानें साठ लढाऊ जहाजांच्या काफिल्यासह चौलच्या उत्तरेकडून इंग्रजांच्या जहाजांवर हल्ला करून त्यांची दाणादाण केली. तथापि शिद्दीच्या मदतीनें व त्यांचीं जहाजें प्रचंड असल्यामुळें इंग्रजांनीं मराठ्यांच्या आरमाराचा पराभव करून कांदेरीवर तोफांचा भडिमार चालविला. परंतु ह्या कृत्याबद्दल मराठे सूड उगविल्याशिवाय राहणार नाहींत ह्या भीतीनें इंग्रजांनीं माघार घेऊन महाराजांशीं तह करण्याचा विचार चालविला. परंतु त्यांना भीती वाटत होती त्या प्रमाणें घडलें. महाराजांनीं जमिनीवरून मुंबईवर हल्ला करण्यासाठीं कल्याणभिवंडीच्या मार्गानें ठाण्याच्या बाजूनें मोठें लष्कर पाठविलें. इकडे शिद्दीनें मराठ्यांना शह देण्यासाठीं कांदेरी जवळचें उंदेरी बेट काबीज करून त्याची तटबंदी इ. स. १६८० च्या प्रारंभीं पुरी करून दिली. त्याच्यावर हल्ला करण्यासाठीं दौलतखान आपलें मराठा आरमार नागोठणें बंदरांतून घेऊन निघाला. त्यानें उंदेरीवर हल्ला केला त्यांत त्याला प्रारंभीं यश आलें, परंतु शेवटीं निकराची लढाई होऊन त्याला परत हटावें लागलें. ह्यांत मराठ्यांचीं चार मोठीं व चार लहान लढाऊ जहाजें बुडालीं व तीनशें लोक मेले व जखमी झाले. शिद्दीचें फारसें नुकसान झालें नाहीं. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं महाराज आजारी पडून त्यांचें देहावसान झाल्यानें इंग्रजांवरचें विघ्न टळलें.

# भाग १२ वा.

## देहावसान;-चारित्र्य;-शील;-राज्यव्यवस्था.

ह्याप्रमाणें आपल्या पराक्रमानें, अलौकिक बुद्धिकौशल्यानें, धाडसानें व कर्तबगारीनें असंख्य अडचणी व भयंकर संकटें ह्यांतून पार पडून महाराजांनीं सर्वत्रांवर सरशी करून विजय संपादून आपला स्वराज्यस्थापनेचा हेतु सिद्धीस नेला, व ते राज्यवैभवाच्या आणि यशाच्या शिखराला पोहोंचले होते. परंतु त्यांचे शेवटचे दिवस त्यांचा पुत्र संभाजी ह्याच्या उच्छृंखळ वर्तनामुळें व गृहकलहानें हवेतसे सुखाचे गेले नाहीं. महाराज विजापुरच्या सुलतानाच्या तर्फेनें मोगलांशीं लढण्यांत गुंतले असतां इ. स. १६७८ च्या नव्हेंबरांत त्यांचा पुत्र संभाजी त्यांच्या कबजांतून निसटून मोगल सरदार दिलेरखानाला जाऊन मिळाला. संभाजीचीं लक्षणें लहानपणापासूनच वाईट होतीं. तो महाराजांसारखाच किंबहुना त्यांच्याही पेक्षां अधिक बलवान्, धाडसी व शूर होता खरा. परंतु तो फार तामसी, तापट, लहरी, हट्टी, चंचल, अविचारी व दुर्वर्तनी होता. त्याच्या एका अनीतीच्या व अविचारी कृत्याबद्दल त्याला महाराजांनीं पन्हाळ्यावर अटकेंत ठेविलें होतें. तेथून तो एके दिवशीं आपली पत्नी येसुबाई व थोडे साथीदार ह्यांसह पळून जाऊन दिलेरखानाकडे गेला. शिवाजी महाराजांना हें कळतांच त्यांनीं त्याचा पाठलाग करविला, पण त्याचा

कांहीं उपयोग झाला नाहीं. संभाजी आपल्याकडे येतो आहे असें कळतांच दिलेरखानानें आपला अमलदार इखलासखान ह्याला चार हजार सैन्यासह त्याच्या स्वागतास्तव पाठवून त्याला आणविलें व त्याचा सत्कार केला. संभाजी आपणांस मिळाल्याबद्दल दिलेरखानाला अत्यानंद होऊन त्यानें औरंगजेबाकडून संभाजीला सात हजारांची मनसब व राजा ही पदवी व एक स्वारीचा हत्ती हीं देवविलीं.

पुढें जेव्हां दिलेरखानाचा इ. स. १६७९ त विजापुराजवळ पराभव होऊन त्याला मागें हटावें लागलें, तेव्हां त्यानें मिरज–पन्हाळ्याच्या बाजूला चाल करून संभाजीच्या सल्ल्यानें व मदतीनें किल्ले घेण्याचें कारस्थान रचिलें. त्यानें संभाजीकडून प्रथम भूपाळगडावर हल्ला करविला. आपल्या धन्याच्या पुत्राशीं कसें लढावें ह्याचें किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ह्याला कोडें पडलें. शेवटीं त्यानें गडाच्या किल्ल्या आपल्या हाताखालच्या अमलदाराला सोंपून तो भूपाळगडाहून निघून शिवाजीमहाराजांकडे गेला. इकडे किल्ला पडला. महाराजांना ह्या त्याच्या नेभळटपणाचा व त्यामुळें किल्ला गुमावण्याला तो कारण झाला त्याबद्दल अतिशय राग येऊन त्यांनीं ताबडतोब त्याला तोफेच्या तोंडीं दिलें.

ह्या दरम्यान महाराजांनीं आपल्या विश्वासु हेरांमार्फत संभाजीला परत आणण्याचे प्रयत्न चालविलेच होते. परंतु संभाजी स्वतःच कंटाळून जाऊन निसटण्याची व परत पित्याकडे येण्याची संधी पाहात होता. इतक्यांत संभाजीला पकडून दिल्लीस पाठविण्याबद्दल औरंगजेबाचें गुप्त फरमान दिलेरखानाला आलें. दिलेर-

खान संभाजीला दिलेल्या वचनाला स्मरला व त्यानें संभाजीला बादशाहाच्या गुप्त फरमानाची बातमी देऊन त्याला पळून जाण्यास मदतही केली, असें ह्मणतात. संभाजी २० नव्हेंबर १६७९ च्या रात्रीं आपल्या पत्नीला पुरुषवेष देऊन थोड्या अनुयायांसह निसटला आणि आपल्या पित्यानें आपणास आणण्यासाठीं पाठविलेल्या तुकडीला गांठून पन्हाळ्यावर ता. ४ डिसेंबर रोजीं जाऊन पोहोंचला. दिलेरखानाच्या पूर्वींच्या वर्तनावरून तो इतका मोठा विश्वासाला जागणारा असेल, तसेंच अनायासें हातीं लागलेल्या आपल्या कट्ट्या शत्रूच्या मुलाला त्यानें असें निसटून जाण्यास दिलें असेल, असें वाटत नाहीं; आणि त्यानें संभाजीचा पाठलाग करण्याचे जे प्रयत्न केले ते निवळ बादशाहाची समजूत करण्यासाठीं नसून खरेखुरे असावे, असें दिसतें. परत आल्यावर महाराजांनीं संभाजीचें स्वागत केलें, परंतु त्याला पुन्हां किल्ल्यांत अटकेंत ठेविलें.

संभाजीच्या ह्या बंडखोर वर्तनानें आपल्या राज्याच्या भावी स्थितीची महाराजांना अत्यंत काळजी वाटूं लागली. संभाजीसारख्या अविचारी, दुराचारी, क्रूर, स्वाभिमानशून्य पुत्राच्या हातांत राज्य ठेवणें महाराजांना अति धोक्याचें वाटूं लागलें. बरें त्याला गादी न देतां दुसरा पुत्र राजाराम ह्याला द्यावी, तर तो अल्पवयी असल्यामुळें सर्व सत्ता व कारभार करण्यासाठीं प्रतिनिधिमंडळ नेमणें भाग पडणार, ह्मणजे अर्थात् दुसऱ्यांच्या हातांत लगाम देणें, असें होतें. शिवाय तसें केलें तरीही आपल्या मंत्रिमंडळांत परस्पर मत्सर व ईर्षा ह्यांचा प्रादुर्भाव असल्यामुळें प्रतिनिधिमंडळही सुरळीत चालेल

अशी स्थिति नव्हती. महाराजांनीं संभाजीला उपदेश करून, पुराण-कथा सांगून, आपलें राज्यवैभव दाखवून, आणि असे अनेक उपाय करून ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न केले. परंतु संभाजीच्या मनावर त्यांचा कांहीं एक परिणाम न होतां ते व्यर्थ गेले.

ह्या काळजींत व नाजूक स्थितींत महाराजांनीं स्वतः एक चूक करून भर घातल्यासारखें केलें होतें त्यांना तीन बायका असतांनाही त्या वेळच्या वेडगळ चालीला अनुसरून ह्मणा, किंवा आपल्या प्रस्थापित झालेल्या क्षत्रियत्वाला वैदिकधर्मविधि व संस्कार करून अधिक पुष्टि देण्याच्या हेतूनें ह्मणा, महाराजांनीं राज्याभिषेक झाल्यानंतर ह्मणजे आपल्या वयाच्या ४७ व्या वर्षीं आणखी तीन बायका केल्या. त्यामुळें अंतःपुरांतील कारस्थान व कलह वाढला. आपल्यामागें गादी कोणास द्यावी ह्या प्रश्नाचा वरच्यावर खल होऊं लागल्यामुळें गृहस्थिति अधिकच नाजूक व क्लेशजनक होत गेली, आणि महाराजांची काळजी भयंकर वाढली. अशा स्थितींत व्यंकोजी कडूनही निरुत्साहकारक खबर आली. ह्या प्रकारें सर्वत्र चिंताजनक परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें महाराजांच्या मनांत काळजीचें व भावी स्थितीच्या विचारांचें काहूर माजून त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊं लागला. आपला मृत्युकाळ जवळ येऊन ठेपला असें त्यांची मनोदेवता त्यांस सांगूं लागली. थोड्याच दिवसांत महाराज आजारी पडले. ह्यापूर्वीं म्हणजे त्यांना आपला अंत जवळ आला आहे असें वाटूं लागल्यावर महाराजांनीं रामदासांची भेट घेऊन त्यांनीं त्यांस गृहकलहाची सर्व हकीकत सांगितली, व रामदा-

सांनीं त्यांस रामाची प्रार्थना व स्मरण करून आणि करुणा भाकून घरांतील सर्वांचें समाधान करण्यास सांगितलें; आणि नंतर महाराजांनीं रामदासांची क्षमा मागितली व ही आपली शेवटचीच भेट असें सांगून निरोप मागितला, व ते रायगडास परत गेले, असें म्हणतात. पुढें लवकरच म्हणजे ता. २५ मार्च (कित्येकांच्या मतें २८ मार्च) १६८० रोजीं त्यांचा गुढगा दुखूं लागला (कित्येकांचे मतें, त्यांना भयंकर ताप व अमांश झाला व शिवदिग्विजय आणि तारीख–इ–शिवाजी ह्यांच्या मतें सोयराबाईनें विषप्रयोगानें महाराजांचा वध केला,) व त्याचें पुढें गुढगी नामक भयंकर रोगांत पर्यवसान होऊन ता. ५ (कित्येकांच्या मतें ता. ३) एप्रील १६८० रोजीं देहावसान झालें. मृत्युसमय जवळ आलेला पाहून महाराजांनीं आपल्या मंत्रिमंडळाला व सरदाराना त्यांच्या भावी जबाबदारीची जाणीव करून देऊन व योग्य उपदेश करून, तसेंच आपल्या सर्व आतांचें व इष्टमित्राचें सांत्वन करून त्यांना दुःख न करण्यास सांगितलें व दिलासा दिला. आणि नंतर त्यांनीं समाधि लावून देह सोडिला.

ह्याप्रमाणें आपल्या अलौकिक विक्रमानें, अचाट बुद्धिमत्तेनें, अगाध राजकारणपटुत्वानें, अपूर्व घटनाचातुर्यानें महाराष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन, स्वधर्माचें संरक्षण करून, मोगल साम्राज्याच्या प्रबळ सत्तेला धुडकावून, विजापुर व गोवळकोंडा दरबारांना आपले अंकित करून घेऊन, महाराष्ट्रीयाना, मराठी भाषा बोलणाराना, परवशतेतून मुक्त करून स्वातंत्र्याच्या महत्वाची जाणीव

करून देणारा महापराक्रमी वीर इहलोक सोडून गेला! सर्व महाराष्ट्र हळहळला! सर्वत्र दुःखाची छाया पसरली! आपल्या पित्याच्या भयंकर आजाराची खबर लागतांच संभाजीनें पन्हाळ्याहून अत्यंत वेगानें रायगडास जाऊन भेटण्याचा प्रयत्न केला. रायगडाच्या पायथ्याशीं पोंचतो न पोंचतो तोंच त्याला महाराजांच्या देहावसानाची दुःखद वार्ता कळली! तोंच त्याला त्वेश येऊन त्यानें ज्या उंटानें आपणांस आणण्यांत विलंब केला त्याचा शिरच्छेद करून, व पुढें शिरहीन उंटाची एक प्रतिमा तयार करवून, आपल्या उद्वेगाचें सांत्वन करून घेतलें! असो.

शिवाजी महाराज म्हणजे एक शूर, साहसी, परंतु अत्यंत कपटपटु, खुनी, क्रूर लुटारू पुरुष होते, ह्यापेक्षां त्यांच्यामध्यें विशेष कांहीं गुण नव्हते, अशा प्रकारचा ग्रह व अभिप्राय अविश्वसनीय व उथळ द्वेषमूलक ग्रंथांवर भिस्त ठेवण्याच्या परकीय इतिहासकारांच्या कलामुळें व एकांगी टीकेमुळें प्रचलित झाला आहे. अशा प्रकारचा ग्रह होण्याला काफीखानाच्या द्वेषमूलक व अविश्वसनीय ग्रंथासारखे ग्रंथ जसे कारण झाले, तसेच एतद्देशीय बखरकारांचे अत्यंत अतिशयोक्तिपूर्ण ग्रंथही कांहीं अंशीं कारण झाले आहेत, ह्यांत शंका नाहीं. तसेंच महाराष्ट्राचे आजपर्यंत जे इतिहास लिहिले गेले आहेत ते न्यायमूर्ति रानड्यांसारख्यांच्या एक दोन ग्रंथांखेरीज बाकीचे बहुतेक काफीखानाच्या ग्रंथांच्या आधारें लिहिलेल्या ग्रांट डफच्या ग्रंथावर भिस्त ठेऊन अथवा त्याच्या अनुवादासारखेच लिहिले गेले असल्यामुळें शिवाजी महाराजांविषयीं असा विपरीत ग्रह झाला आहे.

चंद्रराव मोरे व बाजी घोरपडे ह्यांचा नाश व अफझुलखानाचा वध ह्या फक्त दोन तीन गोष्टींवरूनच, व त्यांना भलतेंच महत्व देऊन हा दोषारोप करण्यांत येतो. परंतु मागील भागांमध्यें जें विवेचन केलें आहे त्यावरून हा दोषारोप किती चुकीचा व अन्यायाचा आहे, तें सहज दिसून येईल. प्रत्यक्ष महाराजांच्या नाशाच्या प्रयत्नाला जो मददगार झाला होता, ज्यानें सामोपचाराचें बोलणें अमान्य करून महाराजांवर पाहुणे म्हणून बोलावून मारेकरी घातले त्या चंद्ररावाचा, तसेंच ज्याच्या कपट कारस्थानानें शाहाजीचे भयंकर हाल होऊन मृत्युमुखीं बळी पडण्याची वेळ आली होती त्या बाजी घोरपड्याचा नाश केल्याबद्दल शिवाजी महाराजांना दोष देणें गैरशिस्त आहे, असेंच म्हटलें पाहिजे. ज्यानें दगलबाजीच्या हेतूनें प्रथम खोडी काढून घाला घातला त्या अफझुलखानाचा स्वसंरक्षणास्तव जर महाराजांनीं वध केला तर त्यावरून महाराजांच्या पदरीं खुनीपणाचा दोष कसा बांधतां येईल ? विजापुर–गोळकोंड्याच्या सुलतानांच्या अनन्वित कृत्यांसारखीं भयंकर कृत्यें महाराजांच्या हातून घडलीं नव्हतीं; औरंगजेबाप्रमाणें अन्य धर्मीयांचा भयंकर छळ, किंवा त्यांच्या असंख्य धर्मसंस्थांचा विध्वंस महाराजांनीं कधींही केला नव्हता. स्वतःच्या बापाला कारागृहवास दाखविणाऱ्या औरंगजेबाप्रमाणें पितृद्रोहाच्या पातकासारखें पातक महाराजांकडून घडलें नव्हतें; तसेंच स्वतःच्या भावांचा खून करणाऱ्या औरंगजेबाप्रमाणें महाराजांचे हात भ्रातृरक्तदूषित झाले नव्हते ! अशीं अधम कृत्यें महाराजांच्या स्वप्नींही नव्हतीं. महा-

राजांनीं अनेक लुटी केल्या तरी त्या दरोडेखोरांच्या नीच कर्मासारख्या नसून केवळ राजकीय स्वरूपाच्याच होत्या. उलट, मशिदी, कुराण इत्यादिकांचा नाश, परस्त्रियांची अब्रू घेणें अशीं अधम कृत्यें महाराजांनीं कधींही न केल्याचें, तसेंच लढाईंत हातीं लागलेल्या स्त्रियाना मातेप्रमाणें मान देऊन परत त्यांच्या नातेवाइकांकडे सुरक्षित सोंपून दिल्याचें, कैद केलेल्या वीरांना मर्दपणानें मानपानानें सोडून दिल्याचें, आणि गरिबांना कधींही न नाडल्याचें महाराजांचा द्वेष्टा खुद्द काफीखान यानेंच कबूल केलें आहे. ह्या एकंदर गोष्टींचा विचार केला असतां वरील दोषारोपांत कितीसें सत्य आहे तें सहज दिसून येईल.

युरोपांतील एका प्रसिद्ध महापुरुषाविषयीं अशी एक म्हण आहे कीं, सामान्य जनांचें मनोराज्य किंवा स्वप्नसृष्टि, तशा त्याच्या प्रत्यक्ष चरित्रांतील गोष्टी असत. म्हणजे ज्या गोष्टी सामान्य जनांना अद्भुत किंवा अलौकिक वाटाव्या, तशीं त्याचीं सामान्य प्रत्यक्ष कृत्यें होतीं.ही म्हण शिवाजी महाराजांना यथार्थ लागू पडते. त्यांनीं आपलें विशाल ध्येय कसें तंतोतंत कृतींत उतरविलें ह्याचा विचार केला म्हणजे त्यांचें असामान्यत्व, अलौकिकत्व, सहज लक्षांत येतें. जगत्प्रसिद्ध सीझर, नेपोलियन इत्यादि महान् वीरां इतके शिवाजीमहाराज एक महान् वीर व योद्धे होते, एवढ्यानेंच त्यांच्या मोठेपणाचें संपूर्ण यथार्थ वर्णन होत नाहीं. संघटनाचातुर्य व मुत्सद्दिपणा ह्यांत महाराज नेपोलियन पेक्षांही अधिक श्रेष्ठ होते, ही गोष्ट नेपोलियनच्या वेळच्या परिस्थितीशीं शिवाजी महाराजांच्या वेळच्या परिस्थितीची तुलना

केल्यानें सहज दिसून येईल. नेपोलियनला स्वातंत्र्याचा कित्येक शतकें उपभोग घेतलेल्या सुव्यवस्थित, सुशिक्षित व संघटित झालेल्या राष्ट्राचें नायकत्व करावयाचें होतें, तशी स्थिति महाराजांची नव्हती. डोंगरांत राहून कशीबशी उपजीविका करणाऱ्या, पुरें वस्त्रही ज्यांना नेसावयाला मिळत नव्हतें, स्वातंत्र्य व स्वराज्य ह्मणजे काय ह्याची कल्पना ज्यांना स्वप्नांत सुद्धां ठाऊक नव्हती, कित्येक शतकें जे परवशतेंत व अज्ञानांत खिचपत पडले होते, अशा जंगली मावळ्यांत स्वाभिमानाची व स्वदेशाभिमानाची स्फूर्ति उत्पन्न करून त्यांना तालीम देऊन उत्तम, व पुढें अजिंक्य ह्मणून प्रसिद्धि पावण्या इतके, शूर योद्धे बनवून त्यांच्यांतून एक प्रचंड सैन्य व स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्यांत जी लोकोत्तर बुद्धिमत्ता व अलौकिक संघटनाचातुर्य महाराजांनीं दाखविलें, व अशा सजीव केलेल्या सैन्याच्या व राष्ट्राच्या साहाय्यानें नुसत्या विजापुर–गोळकोंडादिकांच्याच नव्हे, परंतु अत्यंत बलिष्ठ अशा मोगल साम्राज्यसत्तेलाही बिनतोड शह देऊन धक्का देऊन त्यांचें साम्राज्यमंदिर खिळखिळें करून टाकिलें, आणि एका लहानशा उज्जड जहागिरींतून एक प्रचंड साम्राज्य निर्माण केलें, ह्यांत महाराजांनीं जो अपूर्व मुत्सद्दिपणा, अगाध युक्तिनैपुण्य व सामर्थ्य दाखविलें, ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे नेपोलियनासारख्यांपेक्षां महाराजांच्या अंगीं किती तरी मोठी योग्यता होती, तें दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

त्या वेळीं मुसलमानांनीं हिंदुधर्माचा व हिंदूंचा जो छळ चालविला होता त्याचा विचार केला तर शिवाजी महाराजांच्या मनाची

जर खरोखर नीच प्रवृत्ति असती तर ते त्या छळाबद्दल खात्रीनें सूड घेतल्याविना राहिले नसते. परंतु त्या महात्म्याची परधर्माविषयीं प्रवृत्ति व वर्तन अत्यंत उदारपणाचें व सहिष्णुतेचें होतें. परधर्मांचा छळ किंवा मशिदींचा उच्छेद ह्या गोष्टीतर त्यांनीं स्वप्नांत सुद्धां केल्या नाहीं, पण उलट महाराजांनीं हिंदु देवालयांप्रमाणें मशिदी व कबरी ह्यांना सुद्धां वर्षासनें करून दिलीं होतीं; एवढेंच नव्हे परंतु बाबा याकूतसारख्या मुसलमान फकिरांनाही निवास बांधवून देऊन नेमणुका करून दिल्या होत्या. ह्यावरून शिवाजीमहाराज किती उदारधी, सहिष्णु व पापभीरू होते, तें उघड आहे.

शिवाजी महाराज स्वतः अत्यंत धर्मशील होते. त्यांना किर्तन पुराणांचा फार नाद असे. स्वारीच्या धामधुमींत सुद्धां ते देवदर्शनें, तीर्थयात्रा, दानधर्म इत्यादि करण्यास चुकत नसत. त्यांनीं अनेक देवालयें बांधविलीं, असंख्य देवालयांचा जीर्णोद्धार केला. त्यांनीं वेदशास्त्राध्ययनाला फार मोठें उत्तेजन देऊन त्याचें तसेंच संस्कृताच्या अभ्यासाचें पुनरुज्जीवन केलें. श्रावणमहिन्यांत रमणा करून ब्राह्मणांना दानदक्षणा देण्याचा प्रघात त्यांनीं पाडिला. महाराजांचें परमार्थाकडे फार लक्ष असे, आणि त्यांची व रामदासांची भेट झाल्यावर त्यांचा अनुग्रह घेऊन रामदासांस त्यांनीं गुरु केलें होतें. रामदासांना महाराजांनीं आपलें सर्व राज्य अर्पण केलें, तें त्यांनीं महाराजांना परत सोंपून दिलें, आणि आपल्या तर्फेनें आपला प्रतिनिधि ह्मणून तें त्यांस चालविण्यास सांगितलें, आणि ह्या दानाचें द्योतक ह्मणून महाराजांनीं भगवाझेंडा हें आपलें राष्ट्रीयनिशाण केलें, असें ह्मणतात.

शिवाजी महाराज स्वतः अत्यंत नीतिमान पुरुष होते. ते किती मातृभक्त होते, तसेंच आपल्या पित्याशीं मतभेद असतांही त्यांची पित्याच्या ठायीं किती निस्सीम भक्ति होती तें मागील वर्णनावरून सहज व्यक्त होईल. त्या वेळच्या रूढीला अनुसरून त्यांनीं जरी सहा सात बायका केल्या होत्या ( आणि कित्येकांच्या मताप्रमाणें अंगवस्त्रेंही ठेविलीं होतीं ) तथापि त्यां सर्वांवर त्यांचें सारखेंच प्रेम होतें. महाराज अत्यंत पुत्रवत्सल होते. लहानपणापासून जात्याच अतिशय धर्मशील असल्यामुळें महाराजांची खासगी राहणी फार साधी होती. महाराजांना कोणत्याही प्रकारचें व्यसन नव्हतें. ते जरी अत्यंत धर्मशील होते तथापि ते धर्मांध नव्हते ही गोष्ट त्यांच्या परधर्मसहिष्णुतेवरून सिद्ध होते. ह्या त्यांच्या सच्छील वर्तनाबद्दल काफीखाना सारख्यानेंही साश्चर्य पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे, ह्यांत नवल काय?

शिवाजी महाराजांची योग्यता त्यांच्या शीलाप्रमाणेंच त्यांच्या बिनतोड व अनुपमेय योजनाशक्तीनें व प्रत्यक्ष कर्तबगारीनें व्यक्त होते. दुसऱ्याच्या स्वभावाचें परीक्षण करण्याचा स्वाभाविक चाणाक्षपणा, प्रसंगाला अनुसरून दूरदृष्टीनें यथायोग्य वर्तन व बिनचूक व बिनतोड व्यवस्था करणें, आणि उच्च शील तसें उच्च ध्येय, ह्यांतच महाराजांच्या यशाचें इंगीत होतें. महाराजांच्या धर्मशील, नीतिमान व करारी स्वभावामुळें व तदनुरूप वर्तनामुळें त्यांच्या अमलदारांमध्यें व सैन्यामध्येंही उच्च प्रकारची नितीमत्ता, शिस्त, स्वामिनिष्ठा, आज्ञाधारकता, कर्तव्यदक्षता इत्यादि गुण विशेष रीतीनें

दिसून येते. महाराजांच्या प्रतापशाली व विजयी कारकीर्दीमुळें तत्कालीन महाराष्ट्रीयांमध्यें एक प्रकारचें नवीन जीवन उत्पन्न झालें व त्यांच्या नांवाच्या जादूनें सर्व महाराष्ट्र भारून जाऊन त्याच्यामध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रादुर्भूत झाली. महाराजांनीं कोणतीही राज्यकारभारपद्धति पाहिली नव्हती तसेंच सैन्यसंघटनेचाही त्यांनीं कोठें जाऊन अनुभव घेतलेला नव्हता. ह्या दोन्हीं बाबतींत त्यांना कोणाची सल्ला किंवा कोणाकडून शिक्षण मिळालेलें नव्हतें. त्यांनीं विशाल व प्रजेला सुखकर अशी जी राज्यकारभारपद्धति व संघटना निर्माण करून अमलांत आणिली, आणि जी नमुनेदार सैन्यसंघटता करून अजिंक्य सेना तयार केली ती केवळ त्यांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें केली होती. त्यांनीं ज्या संस्था निर्माण केल्या त्या त्यांच्या पश्चात् इतरांना अनुकरणीय झाल्या. ह्या एकंदर गोष्टींवरून ह्या विभूतीच्या लोकोत्तर विशाल बुद्धिमत्तेची व अपूर्व योजनासामर्थ्याची सहज कल्पना होते.

विजापुर, दिल्ली इत्यादि प्रबळ पादशाही सत्तेला धुडकावून शह देऊन आणि त्यांच्याशीं दोन हात करून त्यांना त्राही त्राही करून सोडिलें ,व हिंदुपदपादशाहीची स्थापना केली, ह्यांत महाराजांनीं आपल्या स्वदेशीयांमध्यें, हिंदूमध्यें नुसत्या राज्यस्थापनेचीच नव्हे परंतु सर्व दृष्टींनीं राज्यव्यवस्था यशस्वी करण्याची, परकीयांचा पाडाव करण्याची, सैन्यघटना करण्याची, आरमार तयार करण्याची, प्रबळ शत्रूशीं सुद्धां आरमारी युद्ध करण्याची शक्ति हिंदु राष्ट्रांत आहे, हें प्रत्यक्ष कृतींनीं सिद्ध करून दाखविलें. एव-

ढेंच नव्हे परंतु हिंदुधर्म, हिंदुत्व कित्येक शतकेंपर्यंत परवशतेखालीं जरी दडपलें गेलें असलें तरी मुद्धां तें नष्ट झालें नसून तें सजीव व कार्यक्षम आहे, व त्याचें पुनरुज्जीवन व विस्तार होऊन त्याचा विजयध्वज सहज फडकूं शकेल हें जगाला ह्या महान् कर्मवीर विभूतीनें सिद्ध करून दिलें.

## राज्यव्यवस्था व कारभारपद्धति.

शिवाजी महाराज निवर्तले त्या वेळीं त्यांच्या राज्याचा उत्तरेस धरमपुर संस्थानापासून दक्षिणेस कारवारांत गंगावती नदीपर्यंत आणि पूर्वेस बागलाण ह्या उत्तरेकडील भागापासून नाशीक, पुणें, सातारा व कोल्हापुरचा बराच मोठा भाग ह्यांतून त्याची हद्द जाऊन पुन्हां पूर्वेकडे थेट तुंगभद्रेच्या किनाऱ्यापर्यंत आणि तेथून वेलोर, जिंजी हे भाग व मद्रास इलाख्यांतील बल्लारी, चित्तूर व अर्काट परगण्यांच्या कांहीं भागांपर्यंत आणि पश्चिमेस कोंकण-पट्टी, इतका विस्तार होता. ह्याचे त्यांनीं तीन सुभे केले होते. त्यांमध्यें (१) उत्तरच्या सुभ्यांत डांग, बागलाण, सुरतच्या दक्षिणेस कोळवण, मुंबईच्या उत्तरेची कोंकणपट्टी आणि देश इतक्या भागांचा समावेश असून त्यावर मोरोपंत पिंगळे ह्याला सुभा नेमिलें होतें; (२) दक्षिणच्या सुभ्यांत मुंबईच्या दक्षिणेची कोंकणपट्टी, सावं-तवाडी, आणि उत्तर कानड्याच्या किनाऱ्यावरील मुलूख हे भाग असून त्याची सुभेदारी आण्णाजी दत्तोकडे होती व (३) दत्ताजी-पंताच्या सुभेदारीखालील सुभ्यांत सातारा, कोल्हापुर, बेळगांव व धारवाडांतील कर्नाटकाचा भाग व तेथून थेट तुंगभद्रेच्या पश्चिमे-

कडील मुलूख हे भाग होते. ह्यांशिवायच्या जिंजी, चित्तूर, अर्काट ह्या नवीन जिंकिलेल्या भागांवर त्यांच्या रक्षणासाठीं सैन्य ठेवून कारभार चालविण्यांत येत होता. ह्यांखेरीज दक्षिण धारवाडचा मुलूख, सुंडा व बेदनूर ह्यांवर वर्चस्व स्थापन झालें होतें व खंडणी घेण्यांत येत असे. शिवाय आजूबाजूच्या मोगलाई प्रदेशांत चौथ वसूल करण्याचा हक्क होता तो निराळाच. ह्या सर्व राज्यांत जुने, व महाराजांनीं बांधविलेले नवे मिळून एकंदर २४० किल्ले होते. ह्या सर्व राज्याचें वार्षिक उत्पन्न नऊ कोटी रुपयांचें होतें. ह्याशिवाय महाराज निवर्तले त्या वेळीं खजिन्यांत पुष्कळ मोठी रक्कम शिल्लक असून जडजवाहीर इत्यादि मौल्यवान वस्तू असंख्य होत्या.

शिवाजी महाराजांनीं राज्यकारभार चालविण्यासाठीं आपल्या कारकीर्दीच्या सुरवातीस पेश्वा, मुजुमदार, डबीर व सबनीस असे चार मंत्रि नेमिले होते. पुढें जसजसा राज्याचा विस्तार होत गेला तसतसे मंत्रिमंडळ वाढवून शेवटीं इ. स. १६७४ च्या सुमारास त्यांची संख्या आठ झाली व त्यांना अष्टप्रधान हें नांव देण्यांत आलें. त्यांमध्यें (१) पेश्वा ( मुख्य प्रधान ) हा प्रमुख असून त्याच्याकडे राज्याची सामान्य देखरेख, राजाच्या गैरहजेरींत त्याचें प्रतिनिधित्व करणें, राज्यकारभार सुरळीत चालावा ह्यासाठीं सर्व अमलदारांवर देखरेख ठेऊन ते एक जुटीनें काम करतील अशी व्यवस्था ठेवणें, इत्यादि कामें असत; राजाच्या सहीशिक्क्याखालीं पेश्व्याचे सहीशिक्के होत असत. (२) अमात्य हा दुसरा मंत्रि असून त्याच्याकडे राज्याची जमाबंदी, जमाखर्च वगैरे ठेविणें हीं कामें असत. (३)

मंत्रि ( वाकिआनवीस, वाकनीस ) ह्या तिसऱ्या प्रधानाकडे राजाच्या दैनिक व सामान्य कार्यांची व दरबारांतील प्रसंगांची हकीकत लिहून ठेविणें, राजाच्या भोजनादि गोष्टींवर देखरेख ठेविणें वगैरे कामें असत. (४) चौथा सचिव ( सुरनावीस, सुरनीस ) ह्या मंत्र्यावर राजाच्या पत्रव्यवहाराची सर्व जबाबदारी असून त्याला महालांचे व परगण्यांचे जमाखर्च तपासावयाचें कामही करावें लागे. (५) परराज्याशीं असलेल्या संबंधांच्या, तसेंच संधि, विग्रह इत्यादि महत्वाच्या गोष्टींत राजाला सल्लामसलत देण्याचें काम सुमंत ( डबीर ) नामक मंत्र्याकडे असून, परराज्यांच्या वकिलांच्या भेटी व त्यांच्याशीं सल्लामसलत करणें, परदेशांतून बातमी मिळविणें, आणि राज्याचें वजन परराज्यांत राहील अशी खबरदारी घेणें, इत्यादि त्याचें कर्तव्य असे. (६) सेनापति (सर–इ–नौबत,) हा सैन्याचा मुख्य अधिकारी असे. (७) सातवा पंडितराव अथवा दानाध्यक्ष हा असून त्याला दानधर्म, धर्मसंबंधीं व जातिसंबंधीं प्रश्नांचा व तंट्यांचा निकाल करणें, धर्मकृत्यांचे दिवस नक्की करणें, अनीति व धर्मतत्वांचें उल्लंघन इत्यादि गुन्ह्यांबद्दल शिक्षा व प्रायश्चित्त देणें वगैरे कामें करावीं लागत. (८) आठवा न्यायाधीश हा मंत्रि मुलकी व फौजदारी कज्ज्यांचा निकाल, जमिनी, कुळकरणें, पाटिलक्या इत्यादि बाबतींच्या तंट्यांचा निवाडा करणें वगैरे कामें करी.

सेनापती खेरीज करून बाकीचे सर्व मंत्रि ब्राम्हण असत. राज्याच्या सर्व पत्रव्यवहाराचें काम कायस्थप्रभु कारकुनांकडे असे. ह्यांत चिटणीस व मुनशी हे हुद्दे वरच्या पायरीचे होते. खलिते,

सनदा व तहनामे ह्यांच्यावर राजाच्या सहीशिक्क्याखालीं ह्या आठी मंत्र्यांच्या सह्या व शिक्के होत असत. असें अष्टप्रधानमंडळ जरी होतें तरी राज्याचीं सर्व सूत्रें महाराजांच्याच हातीं असत व त्यांच्या आज्ञेनें सर्व कारभार चालत असे.

शिवाजी महाराजांनीं वंशपरंपरा हुद्दे व अधिकार चालविण्याची पद्धति बंद केली. वंशपरंपरापद्धति राज्यकारभाराला तसेंच राज्याच्या मजबुतीला व चिरस्थायीपणाला विघातक आहे (आणि पुढें हीच वंशपरंपरापद्धति मराठा साम्राज्याच्या नाशाला कारण झाली) ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं कर्तबगारी व लायकी ह्यांच्या अनुरोधानें नेमणुका करण्याची पद्धत चालू केली. कोणीही मनुष्य मग तो मोठा अमलदार असो किंवा यःकश्चित् शिपाई असो, तो नालायक आहे असें आढळतांच त्याला ते अधिकारावरून दूर करून त्याच्या जागीं दुसऱ्याची नेमणूक करण्यास कधींही मागेंपुढें पाहात नसत. ह्यामुळें प्रत्येक जण आपल्या कार्यांत विशेष दक्षता ठेवून आपल्या अंगीं कार्यक्षमता प्राप्त व्हावी म्हणून झटत असे. तसेंच महाराजांनीं आपल्या सैन्याला व सैन्यांतील अधिकाऱ्यांना जमिनीच्या नेमणुका बांधून देऊन त्यांच्याकडून कामगिरी घेण्याची पद्धतही मोडून टाकून, अधिकाऱ्यांपासून थेट शिपायापर्यंत सर्वांना पगार देण्याची पद्धत सुरू केल्यामुळें त्यांच्याजवळ नेहमीं जय्यत तैयार लश्कर असे. सैन्याची शिस्तही उत्तम प्रकारची राहात असे. महाराजांच्या ह्या योजनेमुळें त्यांना नेहमीं उत्तम कारभारी व सेनानायक मिळत व त्यामुळें मुलकी व लश्करी हीं राज्यव्यवस्थेचीं

दोन्हीं अंगें मजबूत राहात असत. ह्या पद्धतीला पुढील राज्यकर्त्यांनीं फांटा दिला व त्याच्या परिणामीं कमजोरपणा, अव्यवस्था, अंतः-कलह, मत्सर इत्यादि दुष्ट भावनांचा प्रादुर्भाव होऊन शेवटीं राज्याचा लय झाला.

शिवाजी महाराजांनीं राज्यकारभारपद्धतीप्रमाणें जमीन महसुलाच्या पद्धतींतही कोणाचें अनुकरण केलें नव्हतें. त्यांनीं आपल्या स्वतंत्र विचारानें जमीन महसुलाची योजना तयार करून अमलांत आणिली होती. त्यांनीं सर्व जमिनीची मापणी करवून जमिनीच्या मगदुराप्रमाणें दर बिघ्याच्या उत्पन्नाचा अंदाज काढवून उत्पन्नाच्या दोनपंचमांश हिश्याइतका जमिनीच्या साऱ्याचा दर ठरविला होता. जमीनदार वर्गाची दडपशाही मध्यस्ती दूर करून शेतकऱ्याचें हित व्हावें ह्यास्तव शेतकऱ्याचा व सरकारचा प्रत्यक्ष संबंध असावा ह्या हेतूनें जमीनदारपणा, देशमुखी व देसाइगिरी ह्या नांवाखालीं मिळणारी मिरासी किंवा राजकीय दृष्टीची सत्ता काढून टाकिली. तसेंच मोकासे चालू ठेवण्याचें किंवा नवीन देण्याचें बंद केलें. पूर्वीं मिरासदार फार प्रबळ असून शेतकऱ्यांना पिळून काढून पुष्कळ मोठा वसूल जमा करीत, व ह्या प्राप्तीच्या द्रव्यांतून किल्ले बांधून सैन्य ठेऊन फार प्राबल्य मिळवीत असत. महाराजांच्या पद्धतीनें रयतेला सुख होऊन तिचा उत्कर्ष होत गेला, व त्याबरोबरच मिरासदाराच्या दंडेलीला व त्यांच्या निरंकुश वर्तनाला चांगलाच आळा पडला. ह्यामुळें सर्व प्रजा सुखी होऊन राज्याची भरभराट होत गेली. जमिनीचा सारा वसूल कर-

ण्यासाठीं कारकून नेमण्यांत येऊन त्यांच्यावर सुमारें लाख सव्वालाख उत्पन्नाच्या दोन महालांमिळून एक सुभेदार, व त्याच्या हाताखालीं एक मुजुमदार असे. ह्या अमलदारांना वार्षिक अनुक्रमें चारशें व शंभर होन पगार मिळत असे. सुभेदाराला पालखी व अबदागिराची नेमणूक पगारा उपरांत मिळत असे. सर्व सुभेदार ब्राह्मण असून त्यांच्यावर पेश्वा देखरेख ठेवीत असे. रयतेला तगावी देण्यात येत असे. ब्रिटिश सरकाराला आपली जमीनमेहसुलाची योजना करण्यांत बऱ्याच अंशीं शिवाजी महाराजांच्या पद्धतीचा उपयोग झाला आहे, असें दिसतें.

कारकीर्दीच्या प्रारंभीं शिवाजी महाराजांजवळ फक्त १२०० पागा ( घोडेस्वार ) व २००० शिलेदार ( हे लोक आपल्या पदरच्या खर्चानें घोडे ठेऊन जरूरीच्या प्रसंगीं योग्य पगार घेऊन कामगिरी करीत ) इतकी फौज होती. जावळी जिंकल्यावर ( इ. स. १६५५ ) ती ७००० पागा, ३००० शिलेदार व १०००० मावळे पायदल इतकी, आणि अफझुलखानाच्या वधानंतर ( इ. स. १६५९ ) ७००० पागा, ८००० शिलेदार, व १२००० पायदळ इतकी वाढविली. महाराजांच्या मरणसमयीं त्यांची सेना ४५००० पागा, ६०००० शिलेदार, व १०००००० मावळे पायदळ इतकी होती. शिवाय ३२००० घोडे, ३०० हत्ती, आणि १५०० उंट, आणि सुमारें दोनशें तोफा इतकी सामग्री तयार होती.

सैन्याचा मुख्य अधिकारी सरनोबत असून त्याच्या हाताखालीं पांच हजार, व एक हजार स्वारांचे मनसबदार असत. पंचवीस

बारगीर स्वारांची एक तुकडी ह्याप्रमाणें तुकड्या करून दरेक तुकडीवर एक हवालदार, आशा पांच तुकड्यांचा एक जुमला करून त्यावर एक जुम्लादार ( जमालदार ), पांच जुमल्यांवर एक सुबादार व त्यांच्यावर एक एकहजारी, अशी रचना करण्यांत आली होती. पायदळांत नऊ पाइकांवर एक नाईक, पांच नायकांवर एक हवालदार, पांच हवालदारांवर एक जुम्लादार व दहा जुम्लादारांवर एक एकहजारी, व अशा सात हजाऱ्यांवर एक सप्तहजारी व त्यांच्यावर एक पायदळ—सरनोबत, अशी पायदळाची व्यवस्था असे.

पागा ( घोडेस्वारांच्या ) जुम्लादाराला वार्षिक ५०० होन पगार व पालखीची नेमणूक असे. त्याच्या हताखालीं एक शंभर सव्वाशें होनांच्या वार्षिक वेतनाचा मुजुमदार असे. हजाऱ्याला १००० होन वार्षिक तनखा असून त्याच्या हाताखालीं एक मुजुमदार, एक मराठा कारभारी आणि एक जमानवीस ( दप्तरी व हिशोबी काम करणारा ) असे तीन अधिकारी असत. पंच—हजाऱ्याला २००० होन वार्षिक तनखा व एक हजाऱ्याप्रमाणेंच तीन मदतनीस अधिकारी हाताखालीं असत. प्रत्येक महत्वाच्या अमलदाराच्या हाताखालीं कारकून, जासूद, हेर इत्यादि देण्यात येत असत. पायदळ जुम्लादाराला वार्षिक शंभर होन, आणि हजाऱ्याला पांचशें होन तनखा मिळे व ह्या प्रत्येकाच्या हाताखालीं एक एक सबनीस असे.

प्रत्येक किल्ल्यावर एक हवालदार, एक सबनीस व एक सरनोबत असे तीन सारख्या दरज्याचे अमलदार असत, आणि त्यापैकीं

सबनीस हा ब्राह्मण असून बाकीचे दोघे मराठे असत. ह्यांशिवाय एक कायस्थ प्रभु कारखानानवीस ( कारखानीस ) ह्या हुद्याचा एक अमलदार असे त्याच्याकडे किल्ल्यांतील सर्व सामग्री व कारखाना ह्यांच्या व्यवस्थेचें व हिशेबाचें काम असे. मोठ्या किल्ल्यांवरील सरनोबतांचा हुद्दा अधिक मोठा व त्यांना अधिकारही ज्यास्ती होते. किल्ल्याच्या सरहद्दीवर पाहरा करण्यासाठीं रामोशी वगैरे जातीचे लोक ठेवण्यांत येत असत. किल्ल्याच्या रक्षणाचें काम सुरळीत चालावें व दगलबाजीचा प्रकार घडूं नये एवढ्यासाठीं दरेक किल्ल्यावर भिन्न भिन्न जातींचे तीन अमलदार नेमण्याची योजना महाराजांनीं मोठ्या चाणाक्षपणानें केली होती.

महाराजांनीं आपल्या स्वतःच्या अलौकिक बुद्धिचातुर्यानें ज्या अनेक योजना केल्या होत्या त्यांपैकीं त्यांची आरमारी सैन्याची योजना ही एक महत्वाची होय. महाराजांनीं नुसतें लढाऊ आरमारच नव्हे परंतु व्यापारी नौकाही बांधवून आरमाराचीं हीं दोन्हीं अंगें ऊर्जितावस्थेस आणिलीं होतीं. महाराजांना आरमारी लढायांत म्हणण्यासारखें यश आलें नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि मराठ्यांना लढाईचें हें साधन केवळ नवेंच असल्यामुळें, आणि जमिनीवरील युद्धकलेंत ते जसे अनेक शतकेंपर्यंत वहिवाटलेले होते तसे नौकायुद्धांत ते वाकब नव्हते, त्यांना ह्या कलेच्या ओनाम्यापासून सुरवात करावयाची होती, ह्या कारणामुळें जमिनीवरील युद्धक्रियेंत ते जसे लवकरच अजिंक्य झाले तसे आरमारात होणें शक्य नव्हतें, हें उघड आहे. हेंच महाराजाच्या आरमारी अपयशाचें कारण होय.

तथापि महाराजांच्या आरमारानें जरी हवी तशी सरशी मिळविली नव्हती तरी तें शत्रूंपुढें केवळ नादान किंवा निर्बळ कधींही न होतां, शत्रूंच्या आरमाराशीं बरोबरीनें टक्कर मारण्यास समर्थ होतें, ह्यांत शंका नाहीं.

शिवाजी महाराजांचें एकंदर आरमार बरेंच मोठें होतें, असें दिसतें. सभासदाच्या म्हणण्याप्रमाणें एकंदर आरमारी जहाजांची संख्या ४०० होती, तर तत्कालीन इंग्रजांच्या नोंधीप्रमाणें ती १६० च होती, असें समजतें. ह्या एकंदर आरमाराचे दोन काफिले केलेले असून त्यांपैकीं एकावर "दरिया सारंग" व दुसऱ्यावर "मइ नायक" असे दोन मुख्य अमलदार असत. प्रत्येक काफिल्यांत "गुराब" (दोन डोलकाठ्यांचें तोफखान्याचें जहाज) "तरांडी", "शिबार", "पगार" "तिरकटी" "मचवा" इत्यादि लहानमोठीं लढाऊ जहाजें असत, व त्यांना महान् विभूतींचीं तसेंच प्रसिद्ध स्थळांचीं नांवें दिलेलीं होतीं. कोकणच्या किनाऱ्यावरील कोळी, भंडारी वगैरे प्रख्यात दर्यावर्दी जातींच्या साहसी लोकांची शिवाजी महाराजांनीं आपल्या आरमारी सैन्यांत भरती केली होती. पुढें कांहीं मुसलमान नावाडी लोकानासुद्धां त्यांनीं आपल्या आरमारांत ठेविलें होतें. ह्यांमध्यें दौलतखान प्रसिद्ध असून तो एका काफिल्याचा मुख्य अधिकारी होता. लढाऊ जहाजांशिवाय महाराजांनीं व्यापारी जहाजेंही बांधविलीं होतीं व अरबस्तान, इराण, आफ्रिका इत्यादि देशांशीं व्यापार चालविला होता.

अशा महान् विभूतीनें आपल्या लोकोत्तर बुद्धिसामर्थ्यानें व अपूर्व पराक्रमानें अनेक संकटांना व अडचणींना तोंड देऊन विजय संपादून स्वराज्य स्थापिलें, त्याचा विस्तार केला, राज्यकारभाराची व सैन्याची उत्तम पद्धतशीर योजना केली, आपल्या युक्तिकौशल्यानें महान् बलवान् मोगल बादशहाला धुडकावून, विजापुरच्या अदिलशाहाला धाब्यावर बसवून, गोळकोंड्याच्या सुलतानाला आपला अंकित करून आपल्या नांवाचा वचक बसविला, सर्व महाराष्ट्राला जागृत करून महाराष्ट्रीयांना स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें, असें असतांनाही शिवाजी महाराजांनीं स्थापिलेलें राज्य चिरस्थायी कां झालें नाहीं, पुरतीं शंभर सव्वाशें वर्षेंही तें कां टिकलें नाहीं, असा साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो.

शिवाजी महाराजांनीं स्थापिलेल्या ह्या मराठा साम्राज्याचा जो इतक्या लवकर ऱ्हास होऊन नाश झाला, त्याला मुख्य कारण महाराजांची अल्प आयुर्मर्यादा हें होय. महाराजांनीं जें राज्य संपादन केलें त्याचा पाया मजबूत करण्याला त्यांना अवकाशच मिळाला नाहीं. राज्याला मजबुती यावी ह्यासाठीं ते प्रयत्न सुरू करतात न करतात तोंच त्यांच्यावर अकालिक मृत्यूनें घाला घातला ! त्यांचें बहुतेक सर्व आयुष्य शत्रूंशीं लढण्यांत गेलें त्यामुळें शांतीनें आपलें राज्य चिरस्थायी करण्यास त्यांना संधीच मिळाली नाहीं. शिवाय त्यांचा पुत्र संभाजी हा दुराचारी व व्यसनी निघाल्यामुळें व त्यांच्यानंतर पन्नास साठ वर्षेंपर्यंत म्हणजे बाजीराव पेश्वा उदयास येईपर्यंत महाराष्ट्राला योग्य व समर्थ नेता उत्पन्न न झाल्यामुळें मराठा

साम्राज्याचा पायाच ढिला होऊन गेला. पुढें जरी त्याच्यावर भव्य इमारत उभी झाली तरी सुद्धां मजबूत पायाच्या अभावीं ती जितकी लवकर विशाल झाली तितकीच लवकर ढांसळली.

ह्या अकालिक ऱ्हासाला दुसरींही आनुषंगिक कारणें होतीं. त्यांत मुख्य हें कीं, जरी महाराजांच्या प्रयत्नांनें व प्रेरणेनें स्वधर्म जागृति झाली तरी तिचें पर्यवसान ऐक्यांत न होतां जातिभेदांत व जातिवैमनस्यांत झालें. महाराजांनीं हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें खरें, परंतु त्याचें जातिभेददूषित स्वरूप पूर्वीं होतें तसेंच, किंबहुना त्याहूनही अधिक जोरानें, प्रादुर्भूत होऊन दृढ व विस्तृत झालें. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांसारख्या स्वजनांना स्वातंत्र्य देणाऱ्या कर्मवीर विभूतीला ह्या बाष्कळ जातिभेदाच्या खुळानें सशास्त्र वैदिक विधीनें राज्याभिषेक करून घेण्यांत अडचण उपस्थित व्हावी, व ती दूर करण्यासाठीं त्यांना आपल्या क्षत्रियत्वाबद्दल पुरावे शोधण्याची पाळी यावी, ह्याहून अधिक शोचनीय ती स्थिति कोणती? महाराजांनीं स्वधर्माचा उद्धार केला परंतु त्यांतील हा भयंकर दोष ते दूर करूं शकले नाहीं. उलट महाराजांच्या ह्या धर्मोद्धारानें व विजयी स्वराज्यस्थापनेनें समाजाला पूर्व स्थिति प्राप्त होऊन जातिभेदाला उलट अधिकच ऊत आला. ह्या सामाजिक जातिभेदाचा प्रत्याघात राजकीय परिस्थितीवर तत्काल होऊन जातिमत्सर व प्रांतिक वैमनस्य वाढत गेलें. हा देशस्थ, तो कोंकणस्थ, हा कायस्थ, तो दैवज्ञ, हा देशचा मराठा, तो कोकणी मराठा, अमुक जात उच्च, अमुक हलकी, अशा विलक्षण व विपरीत भावना उत्पन्न झाल्या. राष्ट्रीय

ऐक्याला असा मत्सरजनक जातिभेद विघातक आहे, ह्या अत्यंत महत्त्वाच्या तत्वाकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं. महाराजांचें स्वराज्याचें ध्येय मूळच्या धर्मव्यवस्थेच्या पायावर रचलें गेल्यामुळें स्वराज्याच्या उत्पत्तीबरोबर त्याच्या लयाचें बीज पेरलें गेलें. कित्येक वर्षें जरी ह्या स्वराज्याचें मंदिर विस्तृत व सुंदर होत गेलें तथापि त्याच्या पायाला ही जातिमत्सराची भयंकर कीड प्रारंभापासूनच लागल्यामुळें व तिला पेश्वाईत विशेष पुष्टि मिळाल्यामुळें हें स्वराज्यमंदिर नष्ट झालें, ह्यांत आश्चर्य कोणतें ?

ह्या स्वराज्याच्या अल्पायुपणाला महाराजांच्या पश्चात् पुन्हां दाखल झालेली परंपरापद्धतिही कारण झाली. जरी शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्यव्यस्थेंत परंपरापद्धतीला फांटा दिला होता, तथापि त्यांच्या पश्चात् ती लवकरच दाखल झाली. एकादा मनुष्य मोठा कार्यधुरंधर व बुद्धिशाली असला तरी त्याच्या पुढील पिढ्या त्याच्या इतक्याच योग्यतेच्या निघणें अशक्य आहे. उलट महान् शूर वीरांचे व श्रेष्ठ कर्तबगार पुरुषांचे वंशज बहुधा असमर्थ, बुद्धिहीन, नादान निघाल्याचींच उदाहरणें पुष्कळ आहेत. हे परंपरापद्धतीचे दोष शिवाजी महाराजांच्या लक्षांत येऊन त्यांनीं ती बंद केल्याचें प्रत्यक्ष उदाहरण असतांही त्यांच्या वंशजांनीं व पुढें सत्ताधीश झालेल्या पेश्व्यांनीं ती मोडून टाकण्याच्या ऐवजीं तिला अधिकच दृढ केली. ह्यामुळें लहान मोठे जहागिरदार, संस्थानिक, मीरासदार, मोकासदार, उत्पन्न होऊन लवकरच यादवी माजली व तिच्यामुळें कसे परिणाम घडले, तें सर्वांस ठाऊकच आहे.

शिवाय हें जें स्वराज्य स्थापिलें गेलें त्याचा प्रारंभ व त्याच्या प्रसाराची सर्व भिस्त लूटफाट व खंडणीच्या नांवाखाली चौथ उधरविण्याच्या मिषानें जनसमाजापासून पैसे उकळविण्यावर होती. प्रारंभीं असले कांहीं प्रकार तत्कालीन परिस्थितीच्या दृष्टीनें कांहीं अंशीं क्षम्य होते. परंतु त्याला आळा घालण्याचा पुढें प्रयत्न व्हावयास पाहिजे होता तो कोणीं केला नाहीं. त्यामुळें हिंदुस्थानच्या इतर भागांतील लोकांना अनुकूल करून घेण्याच्या ऐवजीं ह्या लुटारूपणामुळें ते साहजिकपणेंच मराठ्यांशीं प्रतिकूल झाले. ह्यामुळें मराठे इतर भागांतील प्रजेचे मित्र होण्याच्या ऐवजीं शत्रू झाले. मराठ्यांविषयीं इतर भागांतील लोकांना सहानुभूति उत्पन्न झाली नाहीं, व होणेंही शक्य नव्हतें. ह्या लुटीच्या भीतीनें व्यापारावर जबरदस्त परिणाम होऊन व्यापार कमी होत गेला. आणि ह्यामुळें ही लुटारूपणाची प्रवृत्ति नुसत्या मराठ्यांच्याच नव्हे परंतु सर्व देशाच्या हानीला कारण झाली.

ह्या लुटारू प्रवृत्तीबरोबरच परराज्याशीं केलेले दोस्तीचे तहनामे फार सबळ कारणाशिवाय संधी साधून खुसपट काढून मोडण्याची प्रवृत्ति विशेष असल्यामुळें मराठ्यांच्या वचनावर व करारमदारांवर फारसा कोणाचाही विश्वास बसेनासा झाला. वेळीं अवेळीं वाटेल तेव्हां तहनाम्यांना धाब्यावर बसवून युद्ध सुरू करणें, स्वारी करणें, वाटेल तो प्रदेश निष्कारण लुटून उध्वस्त करणें, ह्या गोष्टी राज्यचालनाची मुख्य अंगेंच होऊन बसल्यासारखी स्थिति झाली. यांत लफंडावाच्या कारस्थानाची भर पडली. पुढें ह्या सर्व गोष्टी

विकोपास जाऊन बडे बडे सरदार स्वतंत्र होऊन बसले व एकमेकां-विरुद्ध कारस्थानें करूं लागले. ह्याचें पर्यवसान अंतःकलहांत होऊन इंग्रजांनीं त्याचा पूर्ण लाभ घेऊन एकामागून एकाचा अशा रीतीनें सर्वांचा पाडाव केला.

शिवाजी महाराजांच्या व विशेषतः त्यांच्या मागून जे राज्याधिकारी झाले त्यांच्या राज्यव्यवस्थेंत एक मोठीच उणीव होती. मराठ्यांनीं ऐक्याच्या दृष्टीनें समाजघटना करण्याकडे तर लक्ष दिलें नाहींच, परंतु लोकशिक्षण व राज्याची आर्थिक, औद्योगिक व कलाकौशल्याविषयक उन्नति करण्याचाही प्रयत्न केला नाहीं. ज्या राज्यानें देशाच्या सांपत्तिक स्थितीच्या अभिवृद्धीकडे दुर्लक्ष केलें तें चिरस्थायी व्हावें कसें? मुसलमानी अमल जरी जुलमी होता तथापि तो राजकीय दृष्ट्याच तसा होता. त्यांच्या अमलाखालीं उद्योगधंदे व कलाकौशल्य ह्या गोष्टींना उत्कृष्ट उत्तेजन मिळाल्यामुळें उद्योग व व्यापार ह्यांची वृद्धि झाली. मुसलमानी अमलांत चित्रशिल्पादि कला तर अत्यंत ऊर्जितावस्थेला पोहोंचल्या होत्या. मराठ्यांकडून ह्या सांपत्तिक स्थितीच्या वृद्धीच्या साधनांना उत्तेजन तर मिळालेंच नाहीं, परंतु त्यांच्या लुटारू, कारस्थानी व कुटिल राजनीतीनें त्यांना जबरदस्त धक्का बसून त्यांचा उलट ऱ्हासच झाला. दिल्लीच्या तुर्क, अफगाण किंवा मोगल बादशाहांनीं जगाला थक्क करून सोडण्यासारख्या अनेक भव्य व सुंदर इमारती, असंख्य विहिरी, तलाव, धर्मशाळा, मोठमोठे रहदारीचे व व्यापाराला सोइस्कर असे रस्ते, शेतीला उत्कर्षकारक मोठमोठे कालवे बांधवून व्यापार, शेती, कलाकौशल्य

यांना उत्तेजन देऊन राज्याच्या अभिवृद्धि बरोबर सांपत्तिक स्थितीचीही अभिवृद्धि केली, तसें मराठ्यांनीं कांहीं एक केलें नाहीं. मराठ्यांनीं नांव घेण्यासारखी एकादी विशाळ सार्वजनिक इमारत, एकादें भव्य राजमंदिर, एकादा रस्ता किंवा एकादा कालवा बांधविल्याचें एकही उदाहरण नाहीं. सारांश मराठ्यांची राज्यसंस्थापना राज्यव्यवस्था, व समाजघटना पायाशुद्ध, व सुव्यवस्थित न झाल्यानें, त्यांना खऱ्या राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेची, आर्थिक उन्नतीची, लपंडावरहित परंतु करारी आणि विश्वासपात्र अशा राजनीतीची जोड न मिळाल्यामुळें मराठासाम्राज्य-सूर्य लवकरच अस्तंगत झाला !

शिवाजी महाराजांना अकालिक मृत्यु आला नसता व ते आणखी पांचपंचवीस वर्षें जगते तर त्यांनीं ह्यांपैकीं बहुतेक दोष काढून टाकिले असते, असें मानण्यास पुष्कळ जागा आहे. केवळ अशिक्षित, विस्खलित झालेला, किंकर्तव्यतामूढ, परवश अशा जवळ जवळ नामशेष झालेल्या महाराष्ट्राला जागृत करून, त्याला नवजीवन व नवीन जोम देऊन तेजस्वी करून, स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन राज्यकर्त्या राष्ट्राच्या पदवीला चढविण्यास एवढ्याशा अल्पावधींत महाराज समर्थ झाले, ह्यावरून महाराजांच्या अंगीं उत्तम नेत्याला योग्य असे उपजत लोकोत्तर गुण होते, हें उघड होतें. महाराजांच्या लोकोत्तर गुणांची छाप सर्वत्र पडल्यामुळें त्या वेळचे सर्व कर्तृत्ववान् पुरुष महाराजांना येऊन मिळाले. दुसऱ्याच्या गुणावगुणांची अचूक परीक्षा करण्यांत महाराजांचा हात खंडा असल्यामुळें आपल्या मंत्र्यांच्या, सेनापतींच्या, वकिलांच्या, किल्लेदारांच्या

व इतर अधिकारांवर लोकांची जी योजना केली ती इतकी अनुरूप व निर्दोष होती कीं महाराजाना अपयश असें कधींच मिळालें नाहीं, व हेंच त्यांच्या यशस्वी कारकीर्दीचें इंगीत होय राज्यांतील सर्वांशीं समान व प्रेमळ वर्तन, न्यायीपणा, सर्व धर्मांचें संरक्षण करून त्याची अभिवृद्धि करण्याची प्रवृत्ति, शेतकरीवर्गाच्या उन्नतीची कळकळ, वाखाणण्यासारखी योजना व रचनाशक्ति, व दूरदृष्टि, इत्यादि महाराजांच्या अंगीं राज्यपदाला योग्य असे उच्च गुण वसत होते, आणि म्हणून विजयश्रीचा महाराजांवर नेहमीं वरदहस्त होता. तत्कालीन उपलब्ध युद्धसामग्रीला व शस्त्रास्त्रांना, देशाच्या नैसर्गिक रचनेला व लोकांच्या स्वभावाला संपूर्णपणें अनुरूप अशी जी अत्यंत यशस्वी युद्धपद्धति शोधून काढिली तीं वरूनच महाराजांच्या ठायीं किती अचाट बुद्धिसामर्थ्य होतें, तें स्पष्ट दिसून येतें. महाराजांना अधिक आयुष्य असतें तर, किंवा महाराजांच्या पश्चात् त्यांच्या इतका महापुरुष निर्माण झाला असता तर मराठा साम्राज्य चिरस्थायी होऊं शकतें. परंतु दुर्दैवानें महाराष्ट्राला ह्या दोन्ही गोष्टींचा हवा तसा लाभ मिळाला नाहीं. महाराजांच्या पश्चात् मराठा साम्राज्याचा विस्तार होऊन तें कांहीं काल टिकलें, त्याला बहुतांशीं महाराजांनीं उत्पन्न केलेली तेजस्विता, त्यांचें आत्मतेज व त्यांची जीवंत स्मृति, त्यांच्या पराक्रमांची छाप व त्यांच्या नांवानें उत्पन्न होणारी प्रेरणा, हींच कारण झालीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या एकंदर गोष्टींवरून शिवाजी महाराज हे एक सामान्य योद्धे नसून असामान्य कर्मवीर, लोकोत्तर गुणसंपन्न नेता, महाविक्रमशाली अजिंक्य योद्धा, यशस्वी संघटनाकार्यकुशल राजा, परधर्मसहिष्णु, धर्मशील व नीतिमान् महात्मा, आणि अशा अनेक दैवीगुण व दैवीसंपत्तियुक्त एक महान् विभूति होऊन गेली. आणि इतिहासांत ज्यांना श्रेष्ठ स्थान देण्यांत येतें अशा विभूतींपैकींच ही एक विभूति होय, ह्यांत संदेह नाहीं.

REFBK-0001637

९६३७
दा. क.